जग जगत्पति एकचि होतसे, परम भागवतोत्तम हो ! तसे. ॥ २
पाहती जगचि हें गुण सा जे त्या बुधांस भगवत्पण साजे, ।
पावले भजक वास्तवभावा त्यांस 'भागवत' त्यास्तव भावा. ॥ ३
ऐश्वर्यें ज्ञान पाहे जगचि तरि अहो ! तेंचि वैराग्य आहे, ।
धर्माची मूर्ति ही हें प्रभुयशहि, तईं विश्व होऊनि राहे, ।
माया गंगाच वाहे, स्थिरचर अवघें श्रीहरीतेंचि साहे, ।
हें जाणे तो न मोहे क्रमविहित गुण स्वामिचे सा नमो हे. ॥ ४
ऐश्वर्यसामर्थ्यगुणें सुजाणा, ज्ञानत्वबोधेंचि विराग जाणा, ।
विरागहेतूस्तव धर्मसिद्धी धर्में यश श्री, असि हे प्रसिद्धी. ॥ ५
म्हणे कृष्ण पार्था, 'अलंकार हेमीं, धरीतों तसे सर्वही लोक हे मी, ।
नगीं तें न तो त्या सुवर्णी असेना पहातां असी सर्वही भूतसेना. ॥ ६
ऐश्वर्य हें सर्वहि येरितीचें पाहें' असें वाक्य जगत्पतीचें ।
गीतेंत जो दे गुरुराज विद्या अध्याय तो यास्तव 'राजविद्या.' ॥ ७

(अनुष्टुब्वृत्त.)

हा विश्वसर्प ज्यां दोरें व्यापिला स्वैअमूर्तिनें, ।
सर्व भूतें मजमधें त्या सर्पी दोर मी नसें. ॥ ८

---

१. षड्गुण. २. भक्त, सेवक. ३. पंडितांला. ४. वस्तूच्या खऱ्या तत्त्वाला, वस्तूच्या खऱ्या स्वरूपाला. ५. भावना करा, माना, समजा. ६. हें ईशाच्या गुणाचें नांव आहे. या सहा गुणांलाच षड्गुणैश्वर्य असें म्हणतात. ७. जो हें जाणतो त्याला मोह पडत नाहीं. ८. यथानुक्रम, क्रमानुसारें. ९. सहा. १०. विराग, विरक्ति ज्ञानबलानें वैराग्य, वैराग्यामुळें धर्म व धर्मामुळें यश आणि श्री असा अनुक्रम. ११. अर्जुनाला. (पृथापुत्र अर्जुन त्याला.) १२. सुवर्णी. १३. अलंकारांत. १४. प्राणिसमूह. भूतग्राम (गी० अ० ९ श्लो० ८.) १५. मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना । मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥ न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् । भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥ माझें स्वरूप अव्यक्त असून, मी हें सर्व व्यापून राहिलों आहें । माझ्या ठायीं सर्व भूतें, पण पुनः मी त्यांच्याठायीं नाहीं, आणि तीं माझ्याठायीं नाहींत, अशी ही माझी करणी पहा । माझा आत्मा हाच सर्व भूतांना आधार, हाच सर्व भूतांचा पालक, तथापि त्यांमध्यें तो नाहीं. (भगवद्गीता. अ० ९ श्लो० ४-५ पृ० १४१-१४२.) १६. नवम अध्याय. १७. या अध्यायाला 'राजविद्याराजगुह्ययोग' असें नांव आहे. १८. आपल्या निराकारपणानें, अव्यक्त मूर्तीनें.

[1]तोही न मज रज्जूंत, पाहें हे युक्ति ऐश्वरी,[2] ।
भूतीं नसोनि धरितों कीं माझी बुद्धि कल्पिते. ॥ ९
[3]पाहें माझीं शतशतें रूपें, पार्था! सहस्रशः, ।
नानाप्रकारिचीं दिव्यें[4] जीं नानावर्ण आकृती. ॥ १०

(श्लोक.)

ऐश्वर्ययुक्तचि म्हणे जग सर्व पाहे, हें पाहणें परम अद्भुत मत्कृपा हे. ।
चिच्छक्ति[5] मी, मजवरी जड विश्वरूपें[6] मद्बुद्धि दाखवि असा गुण विश्वरूपें. ॥ ११
हा ज्ञान[7] नाम गुण दाखवि विश्वरूपीं, स्थाणुत्व[8] जेंवि नर कल्पितसे स्वरूपीं; ।
सर्वज्ञता तरिच कीं स्वयमेव सारें गीतेंत येचरिति सर्वहि गुह्य सारें. ॥ १२
एवं प्रपंच अवघा लटिकाच झाला वैराग्य[9] हें सहज नित्य अपोक्षजाला; ।
कां शुंक्तिबोध[10] रजतीं[11] अनुराग[12] दावी, वैराग्य विश्वरचनाच तई वदावी. ॥ १३
मी अलिप्त[13] रचुनी रचना[14] ही कीं मला तदभिलापचि[15] नाहीं; ।
हा विराग गुण पांडुसुतातें वर्णिला कमलसंभवतातें[16]. ॥ १४

(अनुष्टुब्वृत्त.)

[17]कर्में न लिंपती मातें, कीं न कर्मफलीं स्पृहा, ।
मातें जाणे असा तोही, बद्ध कर्मी नव्हे कधीं. ॥ १५

(श्लोक.)

अधर्म तो जो करि बंधनासी तो धर्म कीं जो भवबंध[18] नासी,[19] ।
करूनि सृष्ट्यादिकही विरागी धर्मिष्ठ तो भक्तजनानुरागी[20]. ॥ १६

---

१. सर्प. २. ईश्वराची. ३. 'पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः। नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥५॥' पार्था, माझीं शतशः आणि सहस्रशः रूपें पहा. तीं नानाप्रकारचीं, प्रकाशवंत, नानावर्णांचीं आणि नानाआकृतींचीं आहेत. [गीता–अ० ११ श्लो० ५.] ४. प्रकाशमान, तेजस्वी. ५. चैतन्यशक्ति. ६. जगद्रूपरूपें. ७. हा सहा गुणांपैकीं एक आहे. ८. वृक्षत्व. ९. श्रेष्ठपणानें. १०. शिंपीचें ज्ञान. ११. रजत=रुपें. १२. प्रेम, प्रीति. १३. संबंधरहित, निराळा. १४. सृष्टि. १५. त्याची इच्छा. १६. कमलसंभव+तातें=ब्रह्मदेव+जनकें=श्रीकृष्णानें. (विष्णूनें.) १७. 'न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा। इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ १४ ॥ एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः। कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५॥' [मला कर्में बद्ध करीत नाहींत, आणि कर्मांच्या फळाची मी इच्छाही धरीत नाहीं, याप्रमाणें जो मला नीट जाणतो, तो कर्मांमुळें बद्ध होत नाहीं. याप्रमाणें जाणून प्राचीन काळच्या मुमुक्षूंनीं देखील कर्में आचरिलें, यास्तव प्राचीनांनीं यापूर्वीं आचरिलेलें कर्मच तूं प्रथमतः आचर.] (गीता–अ० ४ श्लो० १४-१५) १८. संसारपाश. १९. तोडतो, नाश करतो. २०. भक्तजनांवर अनुराग (प्रेम) करणारा.

'सत्कर्म आणि समता सदयत्वरीती' हा मुख्य धर्म निगम स्फुट हें करीती. ।
वैषम्यनिर्दयपणात्रिपा लोक सारे झाला स्वयें जगचि धर्महि तो असा रे! ॥१७
बरें कर्म जें तें यशोरूप दावी जगत्कल्पना कीर्तिही हे वदावी, ।
म्हणे, 'अर्जुना! विश्वऐश्वर्य पाहें' करी कीर्तिही सूचवूनी कृपा हे. ॥ १८

घडेना तें केलें जड जग तसें आणि गवसे
वसे ऐसें चित्तीं अनुभव जया नित्य नवसे; ।
मनीं होती तों ती अभिनव गमे कीर्ति परमा,
रमाकांताची ते मग निजयशोरूपचि रमा. ॥ १९

यशश्रीनिमित्तें धनश्रीव्ययातें करीती भरीती यशा अव्ययातें, ।
जगत्कीर्तिची श्रीच हें विश्व सारें, असारें जगीं होति तीं सर्व सारें. ॥२०

एका वाइट एक, ते प्रिय दुज्या वाटे बरी श्रीच ते,
एवं सृष्टि समस्त मायिकहि जे श्री होउनी संचेते; ।
विश्वातें धरितो रमेसहि धरी विश्वंभर श्रीधर
भूतालागिंहि जो विभूति म्हणतो गीतेंत बिंबाधर. ॥ २१

(अनुष्टुभ्वृत्त.)

अपरा कार्यरूपा हे, मूलप्रकृति ते परा, ।
चिदंशें जीव जी झाली जाणिजेतें जिणें जग. ॥ २२

(श्लोक.)

श्रीचि हें जग म्हणूनि रमा ते ईशबुद्धिसदनांतचि मांते, ।
जींत विश्व धरि त्या स्वमतीतें, ठाव हृत्कमल तोचि सतीतें. ॥ २३

---

१. मुख्य धर्माचीं तीन लक्षणें—सत्कर्म, समता आणि सदयता. २. वेद. ३. वांकडेपणा आणि निर्दयत्व यांनीं. ४. सत्कर्माचेंच रूप यश होय. ५. 'जगत्कल्पना हे किती देय दावी' असा पाठ आहे. ६. नूतनासारिखे. ७. नूतन. ८. श्रेष्ठ, उत्कृष्ट. ९. व्यय=खर्च. १०. अक्षय यशातें. ११. श्रेष्ठ. १२. संचय पावते, जमते, वाढते. १३. 'भूतांची जननी जी, लक्ष्मी तिजला उरींच वाहतसे । यास्तव कविजन म्हणती श्रीधर ऐसेंच नाम त्यास असे ॥ १० ॥' [नामार्थदीपिका—पृ० ६९.] १४. बिंबफलसदृश (पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें) अधर (ओंठ) ज्याचे तो. (श्रीकृष्ण.) १५. 'अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् । जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥' [हे महाबाहो, ही अपरा म्हणजे निकृष्ट प्रकृति होय, इजहून वेगळी जी माझी परा म्हणजे श्रेष्ठ प्रकृति, ती ऐकून घे. ती जीवरूपा, तिनें या जगताला आधार दिला आहे.] (गीता—अ० ७ श्लोक ५.) १६. चैतन्याच्या अंशानें. १७. भासते. १८. हृदयरूप कमल.

(अनुष्टुभ्वृत्त.)

मूर्ती नसोनि धरितों कीं माझी बुद्धि कल्पिते, ।
या गीतावचनें विश्व हृदयींच रमा तसी. ॥ २४
आत्मशब्दें बुद्धि जेथें भावना विश्वकल्पना ।
बुद्धि माझी मजमधें कल्पिते जग अर्थ हा. ॥ २५

(श्लोक.)

अहो! बुद्धि चिच्छक्ति सर्वेश्वराची जगत्कल्पना युक्ति जे श्रीवराची; ।
जसें विश्व बुद्धींत तैसी रमा ते सैतीच्या स्थळीं श्रीहृदब्जांत माते. ॥ २६
आपणा सुतपणें उपजाया स्त्री वरी, पति म्हणे तिस जाया, ।
जींत जीवपण ते पर माया, श्री करी जसि वधूच रमाया. ॥ २७
एवं अविद्यांशगुणेंचि माया जीवांचिया होय मती रमाया, ।
तिला खरेंसें जग पाहिजेतें सद्बुद्धिनें षड्गुण पाहिजे ते. ॥ २८
विश्वरूप परि षड्गुण दावी कीं असी भजनभक्ति वदावी, ।
आत्मवित् परम भक्त असा रे! अन्य निर्गुणउपासक सारे. ॥ २९
अध्याय हे धरियले मनिं याच भावें पार्थे मुकुंदनिकटत्वगुणप्रभावें, ।
ते द्वादशीं द्विविधही भजणार साचे जाणूनि घे कैवळ भक्तिसुधारसाचे. ॥३०

---

१. गीता–अ० ९ श्लो० ५. २. बुद्धीच्या स्थळीं. ३. आपणा (स्वतः) सुतपणें (पुत्रत्वाच्या नात्यानें, पुत्ररूपानें) उपजाया (जन्मास येण्यासाठीं) [पुरुष] स्त्री वरी (स्त्रीचा स्वीकार करतो). तिस (त्या स्त्रीला) पति (नवरा) जाया [असें] म्हणे (म्हणतो). ४. पति पुत्ररूपानें जिच्या ठिकाणीं जायते (उत्पन्न होतो) ती जाया होय. [मुक्तेश्वर–आदिपर्व–अध्याय १६ ओंवी १५७-१५८.] 'भार्यां पतिः संप्रविश्य स यस्माज्जायते पुनः । जायायास्तद्धि जायात्वं पौराणाः कवयो विदुः ॥' [महाभारत–आदिपर्व–अध्याय ७४ श्लो० ३७.] 'पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स्वमातरम्' इत्यादि मंत्र पहा. ५. याप्रमाणें. ६.-अविद्या+अंश+गुणें=अविद्येच्या अंशानें युक्त अशी (माया). माया दोन प्रकारची आहे–अविद्यांश आणि विद्यांश. अविद्यांशगुणयुक्त जें ब्रह्म त्यालाच जीवात्मा असें म्हणतात आणि विद्यांशगुणयुक्त जें ब्रह्म त्याला परमात्मा म्हणतात. ७. निर्गुणाचे भजक. ८. बाराव्या अध्यायांत. (भगवद्गीतेच्या द्वादश अध्यायांत भक्तियोगाचें निरूपण आहे.) ९. दोन प्रकारचे उपासक–सगुणरूपाचे भक्त आणि अव्यक्त निर्गुणब्रह्माचे भक्त या दोहों प्रकारच्या भक्तांमध्यें श्रेष्ठ योगी कोणते? या अर्जुनाच्या प्रश्नाचें उत्तर भगवंतांनीं बाराव्या अध्यायांत दिलें आहे. 'माझ्या ठिकाणीं मन ठेवून आणि मोठ्या श्रद्धेनें युक्त होऊन जे माझी उपासना (भक्ति) करतात ते अत्यंत श्रेष्ठ असें मी मानितों' असें भगवंतांचें उत्तर आहे. [भगवद्गीता–अध्याय १२ श्लो० १-२.] १०. ग्रास, घांस.

कळोनि स्वआत्मत्वनिर्धार साचा तदाधार या षड्गुणांच्या रसाचा, ।
जगद्भाव पाहे सुखी तोचि जाणा वदे येरिती कृष्ण पार्था सुजाणा. ॥ ३१
'भजे निर्गुणातेंचि तो क्लेश भारी अहो! पावतो' हें वदे कैटभारी; ।
निजीं निर्गुणीं षड्गुणीं विश्व पाहे बहू आवडे भक्ति त्या विश्वपा हे. ॥ ३२

अनायासें पावे स्वसुख भगवद्भक्तचि असा,
असारींही सार प्रभुगुण पहा, सावध असा; ।
असाध्या अव्यक्तासचि धरुनि आत्मज्ञ रमती
मती त्यांच्या क्लेशें उपरमति वेगें न शमती. ॥ ३३

निर्गुणत्व पहिलें समजावें, षड्गुणत्व मग हें उमजावें; ।
भक्तिनें जरि असेंचि भजावें कष्टल्याविण शुभाशुभ जावें. ॥ ३४

पहातां जगीं षड्गुणाचाच यावा मनामाजि आवेश त्याचाच यावा, ।
अहो! बोलतों स्वानुभूतीच हे मी, भरे तावितां अग्नि संपूर्ण हेमीं. ॥ ३५

ऐश्वर्य ऐश्वर्य असेंच दावी कीं स्वानुभूतीच तसी वदावी, ।
हें ज्ञान जें ज्ञानउपासकांहीं कीं जाणणे तों न उरेच कांहीं. ॥ ३६
वैराग्य वैराग्य असेंच दावी कीं जागरीं स्वप्नकथा वदावी, ।
म्हणे प्रपंचास अधोक्ष जागा तो कां स्मरे स्वाप्निकभोग जागा. ॥ ३७
वैराग्य दे यास असीच [13]ठेवी, कीं विश्व वैराग्य करूनि ठेवी. ।
इच्छी न जो मुक्तिहि वीतरागी जो भक्त वैकुंठपदानुरागी. ॥ ३८
जे सर्वसाम्यें करुणाच वाटे न चित्त चाले विषमत्व वाटे; ।
ध्यातां जगीं धर्म जगन्मयाचा होतो बरा त्याहुनि धर्म त्याचा. ॥ ३९
कर्मानुरूपें फळ ईश योजी तैंही म्हणे हा, 'मजला न [16]यो जी!' ।
न ब्रह्मरुद्रादिपदीं असोसी कीं दुःख दातृत्व न चित्त सोसी. ॥ ४०

---

१. तत्+आधार=त्याचा आधार. २. ज्ञानी. ३. 'क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् । अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥' [अव्यक्ताच्या ठायीं ज्यांचें चित्त आसक्त झालें आहे, त्यांना क्लेश फार पडतात; कारण कीं देहवान् प्राण्याला अव्यक्त गतीचें ज्ञान करून घेणें म्हणजे मोठ्या कष्टाचें काम आहे.] ४. कैटभ नामक असुराचा शत्रु. (कृष्ण.) ५. विश्वरक्षण कर्त्यास. ६. या प्रकारचा. ७. रहा. ८. शांत होती. ९. डौल. 'कावा' असाही पाठभेद आहे. १०. आपला अनुभव. ११. सोन्यांत. १२. स्थान. १३. स्थिति. १४. निरिच्छ. १५. वैकुंठपदाची इच्छा करणारा. १६. येणे. १७. हांव, इच्छा.

सर्वेंद्रियीं निरवि कीर्तिस याच वाटे
कीं [1]विश्वविश्वकर कीर्तिच याच वाटे, ।
सप्रेम गाय अवतार पवित्र वार्ता
कर्णामृतें निववि अन्यजना भवार्ता. ॥ ४१
अनुभवि मनिं आत्मा शुक्ति तो विश्व रूपें
मनचि हृदय त्यांत श्रीच हे विश्वरूपें; ।
नरसुरविधिलक्ष्मी जो तदंशी न मोजी
[2]भवविभवविरक्ता स्वात्मभक्ता नमो जी ! ॥ ४२

बुद्धीस निर्गुण दिसे अपरोक्ष साचें जें इंद्रिया विदित तें जग सार साचें. ।
प्रत्यक्ष निर्गुणिच येरिति लोक सारे पाहे स्वयें न भगवान् हरि तो कसा रे !॥
दिसे भास हा [3]निर्गुणोपासकाला करीतो जरी अन्वयें [4]ब्रह्मकाला; ।
[5]मृषा भासही षड्गुणत्वेंचि पाहे, तरे शीघ्र हा ज्यास मोठी कृपा हे. ॥ ४४
[6]भवार्णवीं यास मुकुंद तारी कृपानिधी जो [7]विविधावतारी ।
ते तों तरों पाहति साधनानें, साधी धनें वैश्य जसा धनानें. ॥ ४५
तो ज्ञान होतां सगुणा [8]उपेक्षी हा बोध आत्माच बहू अपेक्षी, ।
वर्णूनि दोघां स्वउपासकांही तारीन त्याला न म्हणेंच कांहीं ॥ ४६
[9]कर्मे समर्पुनि समस्त उपासनाही अद्वैत अन्य मजवांचुनि वास नाहीं; ।
मी थोर एक निजतारक ज्यांस वाटे तारीन त्यांस भवसागरिं पायवाटे. ॥ ४७
असा द्वादशाध्याय येथें हरी तो [10]किरीटीचिया [11]संशयातें हरीतो. ।

---

१. विश्वाच्या ठायीं विश्व (सर्व) करणारी. २. संसारांतील ऐश्वर्याविषयीं निरिच्छ अशा. ३. निर्गुण ब्रह्माची उपासना करणाऱ्या भक्ताला. ४. सर्व ब्रह्मच आहे असा भाव. ५. खोटा. ६. संसारसागरांत. ७. अनेक अवतार घेऊन प्रकट होणारा. ८. सगुण ब्रह्माकडे दुर्लक्ष करतो. ९. 'ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः । अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥ तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् । भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥७॥ मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय । निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥' [परंतु जे कर्मे आचरणारे, ते आपलीं तीं कर्मे मला अर्पित करून, सर्वस्वीं मजवर भरिभार ठेवून, अनन्य भक्तीनें माझें ध्यान करितात, आणि माझी सेवा करितात, ज्यांचें चित्त माझ्या ठायीं बांधलेलें असतें; म्हणून मृत्युयुक्त जो संसारसागर त्यापासून, हे पार्था, त्यांना मी त्वरित उचलून घेतों. माझ्या ठायींच मन ठेव, माझ्या ठायींच बुद्धि ठेव, म्हणजे देहांत झाल्यावर तूं माझ्या ठायींच निरंतर वास करशील, यांत संशय नाहीं. [गीता–अ० १२ श्लो० ६-८.] १०. अर्जुनाच्या. ११. अध्याय १२ श्लोक १ पहा.

बहू क्लेश आधीं तयाला वदोनी स्वभक्तां असें बोलतो श्लोक दोनी. ॥ ४८

(अनुष्टुभ्वृत्त.)

'मातेंचि माझुनी थोर कर्में सर्व समर्पिती, ।
तरी अद्वैतयोगेंची मातें ध्याती उपासिती. ॥ ४९
ऐसीं चित्तें मजमधें, त्यांचा मी भवसागरीं ।
पार्था! न लावितां वेळ होतों केवळ तारक. ॥ ५०
यालागीं मन सद्रूपीं स्वरूपीं बुद्धि घालिं तूं ।
मजमाजीच मग तूं प्रवेशसि न संशय.' ॥ ५१

(श्लोक.)

न बोले असें निर्गुणोपासकांला तिहीं विश्व केलें जरी ब्रह्मकाला ।
जयांला न हा तारक श्रीश वाटे स्वयत्नेंचि ते धांवती मोहवाटे. ॥ ५२
न टीका असी निर्गुणोपासकांची अशी पक्ष अर्थापुढें होय कोंची, ।
न आत्मज्ञ ते भक्त यालागिं देवा स्वकर्में म्हणे अर्पिती वासुदेवा. ॥ ५३
हे आत्मवेत्ते न जयीं गणावे ज्ञात्याहुनी थोर कसे म्हणावे? ।
कीं सप्तमाध्यायविरोध होतो ज्ञानी म्हणे थोर हरी अहो! तो. ॥ ५४
याकारणें ज्ञानगुणें समान देऊनियां यास्तव त्यास मान, ।
हे थोर त्याहीहुनि बोलताहे कीं भक्तिची शीघ्र फळे लता हे. ॥ ५५

---

१. अध्याय १२ श्लो० ६-७ पहा. २. गीता–अध्याय १२ श्लो० ६-८ यांचें हें समश्लोकी भाषांतर आहे. ३. अनन्य योगानें. ४. मिळशील. ५. तुच्छ, कच्ची. ६. आत्म्याला जाणते, आत्मज्ञानसंपन्न. ७. गीतेच्या सातव्या अध्यायांत ज्ञानी थोर असें म्हटलें आहे. [सप्तमाध्याय–श्लो० १७-१९] आणि बाराव्या अध्यायांत उपासक थोर असें निरूपण आहे, असा विरोध आहे. ८. 'तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते । प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ १७ ॥ उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् । आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८ ॥ बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते । वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥' [त्यांमध्ये ज्ञानी जो आहे, त्याचें चित्त सर्वकाळ मजकडे लागलेलें असतें, माझी मात्र भक्ति तो करितो, म्हणून तो श्रेष्ठ. ज्ञान्याला मी अत्यंत प्रिय, आणि मला तो अत्यंत प्रिय. हे सर्वही जन उत्कृष्ट, पण त्यांत ज्ञानी तर माझा आत्माच असें मी मानितों; कारण कीं, तो माझ्या ठायीं चित्त ठेवून, मलाच सर्वोत्तम गति मानून, माझा आश्रय करितो. बहुत जन्माच्या अंतीं, वासुदेव हेंच सर्वस्व, अशा बुद्धीनें ज्ञानवान् मनुष्य मला भजतो, पण असा महात्मा फारच दुर्लभ होय. [गीता–अ० १२ श्लो० १७-१९.]

हरी बोलिला येथ्थळीं अर्थवादा असें बोलती ऐक ते व्यर्थ वादा, ।
मतप्राप्तयुक्तीस जाणे हरी तो असे तर्क अध्यायअंतीं हरीतो. ॥ १६

(अनुष्टुब्वृत्त.)

'बोलिल्याच परी हें जे धर्म्यामृत उपासिती ।
श्रद्धाळू थोर मी ज्यांला भक्त ते बहु मत्प्रिय.' ॥ १७

(श्लोक.)

जसें बोलिलों अर्जुना याच रीती असी षड्गुणोपासना जे करीती ।
बहू प्रीति त्यांची मला श्रीहरी तो म्हणे अर्थवादत्व येथें हरीतो. ॥ १८
जे श्रद्धान भजतीलचि याप्रकारें हे[10] श्रद्धान करिती स्तव शास्त्रकारें, ।
कृष्णेंचि योजुनि दुज्यां स्वउपासकांची अश्रद्धधानमति सूचविलीच कांची. ॥ १९
यथोक्तशब्दांवरि अर्थवादा कोठें उरे हो अवकाश वादा? ।
टीका[11]मुखीं हा परिहार सारा, असो, वदावें किति त्या असारा? ॥ २०
उपासना हे भव[12]रोगमात्रा टाकूनियां निर्गुणतत्वमात्रा ।
उपासिती क्लेश तयांस भारी होती म्हणे[13] हें स्फुट कंठभारी. ॥ २१
येथें दिसे विषमता[14] त्रिजगत्पतीतें तेही तसेंच, परिसा समता गतीतें. ।
कल्पद्रुमें जसिच कल्पित कल्पना ही देऊनि अर्थचि तयास विकल्प नाहीं. ॥

(अनुष्टुब्वृत्त.)

'समें[15] मी सकळां भूतीं[16] न द्वेषी[17] मज न प्रिय, ।

---

१. बाराव्या अध्यायांत. २. केवळ स्तुतिपर बोलणें, प्रशंसापर अथवा गौरवपर भाषण. ३. कृष्णाचें हें भाषण केवळ प्रशंसापर होय, उपचारमय होय, खरें नव्हे असें कोणी कोणी म्हणतात. पण वामनपंडितांचें म्हणणें असें कीं भगवद्वचन अर्थवादपर नसून यथार्थ आहे. [श्लो० ५८ पहा.] ४. द्वादश अध्यायाच्या शेवटीं. ५. हरण करितो. ६. 'ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते । श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २० ॥' [पण जे माझ्या ठायीं श्रद्धा ठेवून, आणि मी हेंच सर्वस्व मानून, अमृतासारखा हितकारक असा हा धर्म मीं सांगितल्याप्रमाणें भक्तीनें आचरितात, ते मला अत्यंत प्रिय होत]. ७. अमृतासारखा मधुर मी सांगितलेला धर्म. ८. माझे आवडते होत. ९. भक्तियुक्त श्रद्धा ठेवणारे. १०. 'ते श्रद्धान वदुनी तव शास्त्रकारें' असा अन्य पाठ आहे. ११. टीकेच्या आरंभीं. १२. संसाररूप रोगाचा परिहार करणारी मात्रा. १३. गीता–अध्याय १२ श्लो० ६-७. १४. भिन्नता, भिन्नभाव. १५. 'समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः । ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥' [मी सर्व भूतांशीं समबुद्धीनें वागतों । मला द्वेष्य कोणी नाहीं, आणि प्रियही कोण, नाहीं. परंतु जे मला भक्तीनें वागतात, ते माझ्याठायीं आहेत, आणि मी त्यांच्याठायीं आहें]. १६. प्राण्यांविषयीं. १७. शत्रु.

परि जे भजती प्रेमें मी त्यांत मजमाजि जे.' ॥ ६३
'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्' ।
हेंही गीतेंतेंचि वदे यासि वैषम्य हो कसें? ॥ ६४

(श्लोक.)

'जे जैसे भजति त्यांस तसा रे! मी भजें मज समानचि सारे ।
यागुणेंचि कमलोद्भवतातें होइजे सुलभ भागवतातें ॥ ६५
ऐश्वर्य जे ध्याति तयांस देव स्वअंश तो दे प्रभु वासुदेव, ।
अनीश्वरत्वा सग ठाव नाहीं अनीश हे नेणति भावना ही. ॥ ६६

(अनुष्टुभूवृत्त.)

कष्टी अधिक ते होती अव्यक्तीं चित्त योजितां, ।
अव्यक्तगति ते देहीं दुःखें पावति यास्तव. ॥ ६७

(श्लोक.)

जरी निर्गुणीं बुद्धि योजूनि घाली न ऐश्वर्यशक्ती स्वचित्तीं निघाली, ।
नव्हे ईश तो देहधारीच साचा, न ये स्वाद श्रद्धामृताच्या रसाचा. ॥ ६८
म्हणे त्यास, 'देही हरी याच भावें असे भक्त तो ईश्वरत्वप्रभावें; ।
जरी निर्गुणाभ्यास दोघां समान स्वभक्तां जसा दे न दे त्यांस मान. ॥ ६९
यागुणेंचि म्हणतो निजभक्तां होय तारक अरे! अविभक्तां ।
कीं तयांत विभुशक्ति निघाली निर्गुणींच मन आणुनि घाली ॥ ७०
बोधमात्रचि जयासहि आगळा ईशभक्त म्हणती अजागळा, ।
विश्व ईश्वर असें कसें कळे पावले न तरि काय हो! कळे ॥ ७१
सर्वाकृती कल्पुनि ईश आहे न जाणतां हें विषयाग्नि आहे, ।
तो बोधही पूर्ण कसा म्हणावा जीहीं उगा भासचि हा गणावा. ॥ ७२

---

१. गीता—अध्याय ४ श्लो० ११ पहा. समश्लोकी टीका:—'जे जसे भजती मातें मी तसा पाळितों तथा । पार्था! मनुष्य सकळ माझ्या मार्गीच वर्तती ॥.' २. हें 'ये यथा मां' इत्यादि अर्धाचें भाषांतर आहे. ३. विष्णूनें, ब्रह्मदेवाच्या पित्यानें. ४. भगवद्भक्तासी. ५. 'क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् । अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥' [अव्यक्ताच्या ठायीं ज्यांचें चित्त आसक्त झालें आहे, त्यांना क्लेश फार पडतात; कारण की देहवान् प्राण्याला अव्यक्त गतीचें ज्ञान करून घेणें म्हणजे मोठ्या कष्टाचें काम आहे]. ६. अव्यक्तास भजणारे. ७. अव्यक्त ब्रह्माची उपासना केली तर. ८. अव्यक्त ब्रह्माच्या उपासकांस. ९. विषयरूप अग्नीची ज्वाळा.

जो आपणा प्रभु न कल्पित विश्वरूपें तों केंवि शुक्तिच वरी जड विश्व रूपें ? ।
पाषाणगर्भकठिणत्व जनेंद्रियांसी ठावें न कल्पक वदा तरि कोण यासी ? ॥ ७३

ईशास जों ज्ञानगुणें भजेना, तों ज्ञान तें छिद्रचि जेंवि [१]जेना, ।
यालागिं याला बहु कष्ट भारी म्हणूनि बोले प्रभु कैठभारी. ॥ ७४

उगेंचि मिथ्या जग हे पहाती वैराग्य दे आणुनि ताप हातीं, ।
वैराग्यशक्ती प्रभुतें भजेना, वैराग्यता [२]दाभण लाभ [३]जेनां. ॥ ७५

जेव्हां विवेकबळ, तेंच घडी विरागी चित्त क्षणाउपरि त्या विषयानुरागी, ।
तें नावरे म्हणुनि त्यासचि कष्ट भारी यालागिं होति म्हणतो मधुकैटभारी. ७६

वैराग्य षड्गुणपणीं कळलें जयाला माझें, तया श्रम घडे न मनोजयाला ।
गीतेसर्वेच हरि सूचवितो स्वबाचा श्लोक प्रमाण अजि मागति तेचि वाचा. ७७

(अनुष्टुभवृत्त.)

'कर्में न लिंपती मातें कीं न कर्मफलीं स्पृहा, ।
मातें जाणे असा तोही बद्ध कर्मीं नव्हे कधीं.' ॥ ७८

(श्लोक.)

स्पृहाअभावें स्वविराग दावी, हे शक्ति सांशक्तिमध्ये वदावी, ।
मी या गुणें कर्मविमुक्त साच ऐशा मला लक्षिल तो तसाच. ॥ ७९

हे गोड गोष्टि सहजें जसि चाखवीली, ऐश्वर्यशक्ति नवमीं स्फुट दाखवीली; ।
हे शक्तिची जसि फलश्रुति हे वदावी ऐश्वर्य बोधफळ तेंच तयास दावी. ॥ ८०

म्हणे कृष्ण ऐश्वर्ययुक्तीस पाहें पहातांचि होणार ऐसी कृपा हे ।

---

१. जुरणुसाला, लोंकरी वस्त्राला. २. लोंकरीच्या वस्त्राला दाभण टोंचण्यासारखें वैराग्य विफल होय. ३. मेंढा, बकरे, इत्यादिकांच्या लोंकरीस खळ लावून जें वस्त्र करितात तें, त्या सारिखें जें (विपर्यलाभादि) त्याला. ४. जेव्हां विवेकाचा प्रभाव असतो तेव्हां वैराग्य उत्पन्न होतें, पण विवेकाचा जोर कमी झाला म्हणजे मन उलट खातें आणि विषयाकडे वळतें, असें झालें म्हणजे त्याला भारी क्लेश होतात. ५. अंतःकरणाच्या जयाला, मन जिंकण्याला. ६. 'न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा । इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बद्ध्यते ॥.' [गीता—अध्याय ४, श्लो० १४.] मला कर्में बद्ध करीत नाहींत आणि कर्माच्या फळाची मी इच्छाही धरीत नाहीं, याप्रमाणें जो मला नीट जाणतो, तो कर्मामुळें बद्ध होत नाहीं. ७. इच्छा. ८. सदा. ९. नवव्या अध्यायांत (गीतेच्या). अध्याय ९ श्लोक ४-१०, व १६-१९ पहा. १०. 'मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना । मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् । भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥.' [गीता—अध्याय ९ श्लो० ४—५] माझें स्वरूप

असें पाहणारांस भूतें न भूतीं असे तो न तीं त्यांत हे स्वानुभूती. ॥ ८१

सगुणसा अपरोक्ष भजे असें तरि तदंशचि देतचि तो असे ।
न भजतां सगुणा मन नावरे विवश कर्णधराविण नाव रे. ॥ ८२

जे पाहती स्थिरचरात्मक हा पसारा, पूर्वोक्त धर्म भगवद्गुणरूप सारा, ।
ते धर्म टाकितिहि अन्य तरी सदेवां विघ्नें तया करवती न कदापि देवां. ॥८३

(अनुष्टुभ्वृत्त.)

'एका मातें शरण ये सर्वधर्मास टाकुनी ।
संचितें क्रियमाणें हीं मी नाशीन, भिऊं नको.' ॥ ८४

(श्लोक.)

एकीं अनेक जग त्या मज वासुदेवा एका अशा शरण येशिल देवदेवा, ।
टाकूनि अन्यसुरधर्म तथीं भयातें हें मांडितील नव्हतां क्रतुलाभ यातें. ॥ ८५

विघ्नें जरी करिति इंद्रियदेवसेना, मी रक्षणार तुज धाक कधीं असेना, ।
कीं पातकें सकळ कर्ममयें असारें नाशीन मी, भिऊं नको निजबोधसारें. ॥ ८६

जरी टाकिले धर्म सर्वा सुरांचे, क्रतूकामधेनूचिया वासुरांचे ।
भजे विश्वधर्मात्मका वासुदेवा, मनीं देखतां उद्धवे त्रास देवां. ॥ ८७

न हा लाभ त्यां निर्गुणोपासकांला करीती जरी अन्वयें ब्रह्म काला, ।
म्हणूनीच ते पावती कष्ट भारी असें अर्जुनातें वदे कैटभारी. ॥ ८८

अव्यक्त असून, मी हें सर्व व्यापून राहिलों आहें. माझ्या ठायीं सर्व भूतें, पण पुनः मी त्यांच्याठायीं नाहीं, आणि तीं माझ्याठायीं नाहींत, अशी ही माझी ईश्वरी करणी पहा. माझा आत्मा हाच सर्व भूतांना आधार, हाच सर्व भूतांचा पाळक, तथापि त्यांमध्यें तो नाहीं.

१. नावाड्यावांचून. कर्णधार=सुकाणूं धरणारा. कर्णधारावांचून नौका ज्याप्रमाणें आवरतां येत नाहीं, त्याप्रमाणें सगुणोपासना केल्यावांचून मनोजय व्हावयाचा नाहीं. २. जग. ३. 'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥.' [गीता—अध्याय १८ श्लो० ६६.] कोणताही धर्म असो, तो जर माझ्या सांगण्याच्या आड येतो, तर तो हे सोडून, आणि माझ्या एकट्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवून चाल, मी तुला सर्व पातकांपासून मुक्त करीन, शोक करूं नको. ४. संचित आणि क्रियमाण पाप. ५. एकाच्या ठिकाणीं अनेक जगतें असणाऱ्या अशा मला देवदेवा वासुदेवाला शरण येशील. ६. देवांस यज्ञादिक अन्य मार्गांनीं तृप्त करण्याचा धर्म. ७. यज्ञलाभ. ८. आत्मज्ञानशक्तीनें. ९. क्रतुरूप (यज्ञरूप) कामधेनूच्या वत्सांचे=यज्ञ हाच कामधेनु, तिचे वत्स जे देव त्यांचे, देव हे यज्ञांतील हविर्भागांवर अवलंबून असणारे होत. १०. निर्गुण ब्रह्माची उपासना करणाऱ्यांला.

निर्दयत्व विषमत्व असेना निर्मिली असि चराचर सेना, ।
विष्णुधर्म जन हा अवलोकीं तो दयाळु सम मानवलोकीं. ॥ ८९
कृपेचा जो सिंधू निखिलजनबंधू अधिपती
तयाचा जो धर्म स्थिरचर जया सर्व जपती, ।
तयां सर्वां भूतीं सहज करुणा पूर्ण उकळी,
उठे कीं अंशत्वें हरिच दिसतो त्यास सकळीं. ॥ ९०
उगा सर्वभूतीं परब्रह्म पाहे, तयाहूनि तो थोर [2]ज्याला कृपा हे; ।
स्वदुःखासुखातुल्य जो सर्वभूतीं कृपाळू प्रभूचीच होतां विभूती. ॥ ९१

(अनुष्टुब्वृत्त.)

'[1]सर्वभूतीं [3]स्वदृष्टांतें जो पाहे मज अर्जुना! ।
सुखा दुःखासही योगी तो थोर मज संमत. ॥'[4] ९२

(श्लोक.)

जगाच्या पटाची धरूनी [5]दैसोडी जगद्वस्त्ररूपास तंतूस सोडी, ।
हिमें साधनें पावतो व्यर्थ कंपा न तो लाधतो [6]वासुदेवानुकंपा. ॥ ९३
कीर्तनश्रवण विष्णुयशाचें नाशितें भजन विघ्नपिशाचें, ।
आत्मता कळलिया यशरूपें विश्वशुक्तिवरि त्या जड रूपें. ॥ ९४
ते आत्मता कळलिया श्रवणादिरीती टाकूनि निर्गुणचि एक अहो! धरीती; ।
तें चित्त होउनि न वश्यहि कष्ट भारी क्लेशी तयांस म्हणतो मधुकैटभारी. ९५
[7]श्री जे चराचर नदीच अगाध वाहे तारूं तिचा भजति त्याप्रति [8]माधवा हे; ।
यालागिं मी त्वरित भागवतांस तारीं ऐसें म्हणे हरिच [9]वृष्णिकुलावतारी. ॥९६

(अनुष्टुब्वृत्त.)

'[10]मी देव, माझी [11]त्रिगुणा हे माया तरवे न जे ।
मातेंचि जे भजति, ते मायेतें तरताति या.' ॥ ९७

---

१. सर्व. २. ज्या भक्ताला. ३. सर्व प्राण्यांच्या ठायीं. ४. 'आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥,' [गीता—अध्याय ६ श्लो० ३२.] अर्जुना, आपणाला जसें सुखदुःख, तसेंच इतरांना सुखदुःख अशा दृष्टांतानें जो सर्वत्र सारखेपणा पाहतो तो योगी श्रेष्ठ मानिला आहे. ५. दशी धरतो व वस्त्र टाकतो, सगुणोपासना टाकून निर्गुणोपासना करतो. ६. वासुदेवकृपा. ७. माया. ८. भगवद्भक्तांला. ९. यादवकुलोत्पन्न कृष्ण. १०. 'दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥,' [गीता—अध्याय ७ १४.] ही अति दिव्य आणि त्रिगुणात्मिका माझी माया म्हणजे विलक्षण शक्ति फार दुस्तर आहे. जे मला अनन्यभावानें भजतात ते या मायेला तरून जातात. ११. सत्वरजस्तमोगुणयुक्ता.

(श्लोक.)

मायानदीच्या प्रभुतारका या उपेक्षुनी पाहति विश्वकाया, ।
ते पावती यास्तव कष्ट भारी गीतेंत बोले प्रभु कैंठभारी. ॥ ९८

विहितभजनमूळें यत्न भक्तांजनांहीं
श्रम तरि म्हणतो कां श्रीमहाराज नाहीं, ।
वदतिल तरि ऐका प्रश्न सद्भाव यो जी
अधिकतर तयां हा शब्दही देव योजी. ॥ ९९

बहुत अधिक त्यांला लागती कष्ट भारी,
अधिकतर म्हणूनी बोलतो कैंठभारी, ।
न धरिति भवसिंधूमाजि ते कास याची
धरितिल तरि चिंता त्यांसही कासयाची ? ॥ १००

पडति उभयवर्गी पोहणी तत्समानें
तरि गिरिधर तारूं तें स्वबोधाभिमानें, ।
बहुत अधिक त्यांला यास्तव क्लेश भारी
म्हणउनि म्हणतो जी ! ये स्थळीं कैंठभारी. ॥ १०१

ब्रह्मीं ब्रह्मत्व वांटे, सगुणपण असे, द्वैत तेथें न वाटे, ।
मायासंकल्प फाटे, स्थिरचर लटिकें होउनी ही न दाटे; ।
अज्ञानाचेच कांटे वरि परि फणसीं षड्गुणाचेच सांटे,
जो अव्यक्तींच आटे सुखफळ परि तें साधितां ऊर फाटे. ॥ १०२

उपसंहार.

(श्लोक.)

असी काढी गीता मथुनि हरि 'गीतार्णवसुधा'
सुधारा हे गंगा करु अमृतसंतृप्त वसुधा, ।
सुधा ब्रह्मांडीं हा सुपथ रचिला वामनपणीं
जगाच्या उद्धारा हरि करितसे षड्गुणपणीं. ॥ १०३

---

१. विश्वरूपाला. २. फार. ३. कमर, आश्रय, आधार. ४. या श्लोकांत 'टे' अक्षराची आवृत्ति वारंवार झाली आहे म्हणून हें 'अनुप्रास' नामक अलंकाराचें उदाहरण होय. [साहित्यशास्त्र—निर्णयसागर छापखान्यांतील आवृत्ति २, पृ० ६६.] ५. गीतारूप सागरांतील अमृत. ६. अमृतानें संतुष्ट. ७. पृथ्वी.

१८. [1]चरमगुरुमंजरी.

(श्लोक.)

[2]चरमगुरु मुकुंद श्रीपति श्रीहरी तो
चरमपणजडत्वें भ्रांति जेव्हां हरीतो, ।
[3]चरमपरमबोधें जेंवि [4]आत्मत्व दावी
चरमतनुमुखें ते रीति वाटे वदावी. ॥ १

गुरुत्व सारें विधिच्या पित्याचें समस्त हें रूप तथापि त्याचें ।
जो तो गुरुत्वें पदवीच दावी जरी अपूर्णत्व किं तें न दावी. ॥ २

परि चरमगुरुत्वें वारितो गर्भवासा
चरमगुरु म्हणावा वास्तव [5]श्रीनिवासा ।
चरमगति गुरू तो लावितो ज्यास वाटे
चरम परमबोधें त्या जगद्ब्रह्म वाटे. ॥ ३

[6]चरमगुरु सभाग्या भेटला लौकरी तो
चरम तनु तयाची श्रीगुरू ते करीतो ।
चरम परमबोधें द्वैत सारें हरीतो
चरम गुरु [7]मुकुंद श्रीपती श्रीहरी तो. ॥ ४

जडीं [8]ब्रह्माद्वैतप्रद गुरु म्हणावा [9]चरम तो
[10]अपूर्णांचा शिष्य स्थिरचरजडत्वींच रमतो, ।
जडें नाना पाहे [11]श्रुती म्हणति तों तों मरतसे
न जातां पूर्णातें शरण मरती पामर तसे. ॥ ५

---

१. या प्रकरणांत 'उपादानां'तील कांहीं श्लोक आले आहेत. एका हस्तलिखित पोथींत ज्या अनुक्रमानें श्लोक लिहिले होते, तसेच छापले आहेत, 'उपादानां'तील श्लोक गाळिले नाहींत. २. चरम+गुरु=अखेरचा, उत्कृष्ट+उपदेष्टा. ३. शेवटील उत्तम ज्ञानानें. ४. 'तो तत्व' असा अन्य पाठ. ५. श्रीवासा. ['ज्याच्या वक्षस्थानीं श्रीलक्ष्मी नित्य करीतसे वास। यास्तव झालें आहे नाम श्रीवास हें अशें ज्यास ॥ २ ॥' [नामार्थदीपिका–पृ० ६८.] ६. 'चरमगुरुस या! ज्या भेटतां लौकरी तो' असा अन्य पाठ आहे. ७. 'भक्तांस मुक्ति देतो म्हणऊनि मुकुंद नाम हें त्याला । घाला मुक्त्यर्थ तुम्ही नित्य नमस्कार त्याच देवाला ॥ १५ ॥' [नामार्थदीपिका–पृ० ५८.] ८. जड आणि ब्रह्म एक होय असें म्हणणारा गुरु. ९. हा गुरु सर्वांत शेवटचा (श्रेष्ठ) होय. १०. ज्याचें ज्ञान पूर्ण नाहीं अशा गुरुच्या. ११. 'मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति' इत्यादि श्रुति. ["श्रुति=ज्याच्या योगानें धर्म ऐकूं येतो (समजतो) ती श्रुति, असा 'श्रुति'शब्दाचा मूलार्थ आहे. वेदमंत्र म्हणण्याच्या वेळेस पाठकाचे चित्ताची एकाग्रता राहून अर्थानुसंधान रहावें म्हणून पुस्तकावरून पठण करण्याचा नि-

नानात्व अज्ञ अवघेचि सदा पहाती
त्यांला असेचि यम दंड धरूनि हातीं ।
हे गोष्टि तों प्रगट जाणति लोक सारे
ठावेंचि तें कथिल वेदहि तो कसा रे! ॥
म्हणोनी हा अर्थ श्रुति कथिल हे गोष्टि न घडे
वदे आत्मज्ञानी विषय म्हणतां तत्व नुवडे, ।
कळे आत्मा तोचि स्थिरचरजगीं तो न गवसे,
जडें पाहे नाना तरि मरणवक्रांतचि बसे. ॥ ७
जया जें आद्यंतीं इतरपण त्यासीं नग बसे,
सुवर्णी स्वर्णत्वें स्फुरतचि मधीं हे नग बसे; ।
जगाचे आद्यंतीं जग नग तयावीण नकळे,
गुरू तो जो दावी उकलुनि असा पावन कळे. ॥ ८
न होतें हें कांहीं गुणमय तयीं ब्रह्मचि असे,
तयापासूनी हें जग म्हणति वेदागम असे, ।
सुवर्णापासूनी उपजत तदैक्यें नग बसे.
पहातां या रीती अवसरचि भेदा न गवसे. ॥ ९

पेध शास्त्रकारांनीं केला आहे. ऐकून म्हणणें यावरून वेदास श्रुति हें नांव पाडलें, व 'श्रुति'शब्दावरून प्राचीन काळीं लेखनकला भरतखंडांत नव्हती, अशीं अनुमानें यूरोपांतील विद्वान् करतात तीं बरोबर नाहींत. या प्रमाणेंच वेदार्थाचें स्मरण करून त्यांत प्रतिपादित केलेल्या धर्मांचें ऋषींनीं विस्तारानें ज्यांत कथन केलें आहे, असे जे ग्रंथ त्यांचें नांव स्मृति. असा 'स्मृति'शब्दाचा अर्थ प्राचीन संस्कृत ग्रंथकारांनीं केला आहे. याकरितां स्मृति म्हणजे केवळ स्मरणानें पढण्याचे ग्रंथ असा अर्थ करून स्मृतिकालींही भरतखंडांत लेखनकलेचा अभाव होता असें म्हणणें निराधार आहे. कारण स्मृतींमध्यें न्यायसभेंत मानण्याचीं प्रमाणें सांगितलीं आहेत, त्यांत लेख प्रमाण धरलें आहे." व्युत्पत्तिप्रदीप.]

१. न आढळे, न सांपडे. २. अनेक रूपानें. ३. मृत्युमुखांत. ४. जन्मकाळीं व अंतकाळीं, उत्पत्तिसमयीं व लयसमयीं. ५. अलंकार. ६. 'जगातें' असा अन्य पाठ आहे. ७. पवित्र युक्तीला. ८. आहे. 'ब्रह्मणः सर्वभूतानि जायंते परमात्मनः । तस्मादेतानि ब्रह्मैव भवंतीत्यवधारयेत् ॥' [अपरोक्षानुभूति–श्लोक ४९.] सर्व जड भूतें परमात्म ब्रह्मापासून उद्भवतात, तेव्हां तीं ब्रह्मच होत असें समजावें. ९. द्वैताला.

[1]सुवर्णापासूनी उपजति अलंकार जितुके,
सुवर्णत्वें लोकीं मिरवति न [2]संदेह तितुके; ।
जग ब्रह्मोत्पन्न श्रुति म्हणति [3]कीं भेद नवडे
सुवर्णा मातीचे [4]श्रुति वदति दृष्टांत उघडे. ॥ १०

[5]उपादानीं ब्रह्मीं श्रुति म्हणति कीं भेद नघडे
सुवर्णा मातीचे श्रुति वदति दृष्टांत उघडे, ।
उपादानें कार्यें दिसति म्हणतां विश्वरचना
[6]पहावी ब्रह्मत्वें तरि सकळतीं वेदवचना. ॥ ११

सुवर्णावांचूनी दिसति न अलंकार जितुके
सबाह्यस्वर्णत्वें स्फुरति नग सोनेंचि तितुके; ।
श्रुतिप्रोक्तन्यायें श्रुतिच अवघें ब्रह्म म्हणती,
असें दावी त्याची तरिति गुरुवर्यांत गणती. ॥ १२

[8]उपादान मातीच जैसी घटातें, उपादान तंतूच जैसा पटातें, ।
विनाब्रह्म येना जग प्रत्ययातें, उपादान [9]तें नेमिलें सत्य [10]यांतें. ॥ १३

उपादानीं कार्यें उदय लय पावोनि असती,
उपादानीं कार्यें अवयवमयें सर्व दिसती, ।
उपादाना कार्या अणुभरिहि न द्वैत गवसे
सुवर्णीं स्वर्णत्व त्यजुनि नग कैसा मग वसे? ॥ १४

---

१. 'सुवर्णाज्जायमानस्य सुवर्णत्वं च शाश्वतम् । ब्रह्मणो जायमानस्य ब्रह्मत्वं च तथा भवेत् ॥.' [अपरोक्षानुभूति–श्लो० ५१.] ज्याप्रमाणें सुवर्णापासून उत्पन्न होणाऱ्या अलंकाराचें सुवर्णत्व शाश्वत (नित्य) असतें, त्याप्रमाणें ब्रह्मापासून होणाऱ्या जडभूताचें ब्रह्मत्व तसेंच शाश्वत होय. २. तितुके अलंकार लोकीं सुवर्णत्वें (सुवर्णाच्या भावानें) मिरवति–[यांत] संदेह न–असा अन्वय. ३.. 'कां ब्रह्म न घडे' असा अन्य पाठ आहे. ४. 'श्रुतिविदित' असा अन्य पाठ आहे. ५. सकळ ब्रह्मांडाचें जें आदि कारण (उपादान) ब्रह्म त्याच्या ठिकाणीं. 'उपादानं प्रपंचस्य ब्रह्मणोऽन्यं न विद्यते । तस्मात्सर्वः प्रपंचोऽयं ब्रह्मैवास्ति न चेतरत् ॥.' [अपरोक्षानुभूति–श्लो० ४५.] प्रपंचाचें आदि कारण ब्रह्माविना अन्य नाहीं, तेव्हां हा सर्व प्रपंच ब्रह्मच आहे, अन्य कांहीं नाहीं. ६. 'पाहावी ब्रह्मत्वें तरि रसिकता वेदवचना' असा अन्य पाठ आहे. ७. मूळ कारण. ८. 'घटनाम्ना यथा पृथ्वी पटनाम्ना हि तंतवः । जगन्नाम्ना चिदाभाति ज्ञेयं तत्तदभावतः ॥' [अपरोक्षानुभूति–श्लो० ६४.] 'घटनामें जशी पृथ्वी, पटनामेंचि तंतुही । जग नामें तसा आत्मा असे आत्मा, नसे जग ॥.' ९. तें ब्रह्म. १०. जगातें.

नगाच्या सबाह्यांतरीं मात्र दावी, नगीं ते उपादानसत्ता वदावी, ।
सबाह्यांतरीं हेम जैसें नगातें सबाह्यांतरीं ब्रह्म तैसें जगातें. ॥ १५

स्फुरे ज्याणें, आणी स्फुरणचि जयावीण न घडे,
असे अंतर्बाह्य प्रगट दिसतां तत्व उघडें, ।
जडीं आत्मा ऐसा परि विरळ ऐसें अनुभवी
जड द्रष्टा मात्र, स्फुट वदति भेदज्ञहि भवीं. ॥ १६

दसोडी जे देखे तिस न वळखे बाळक पटीं
कळोनीहि स्वात्मा अकळ नकळे विश्वकपटी, ।
दसोडी पासोडी रचुन उरली प्रौढ सम जे
जडीं आत्मा ऐसा परि विरळ सर्वज्ञ समजे. ॥ १७

जडें तत्वें देहीं गुरु निरसतां तें उरतसे,
जडीं त्या चैतन्याविण जग न कांहीं स्फुरतसे; ।
न पावे या बोधेंकरुनिहि तिये पावनकळे
जडालंकारीं जों निजकनक तें व्याप्त नकळे. ॥ १८

शरीरीं या एका जड निरसतां जें उरतसे,
स्वचित्सिंधू तोचि स्थिरचरतरंगीं स्फुरतसे; ।
चिदंब्धीमध्यें त्या स्वतनुसह भूतें गवसती,
गुरू जो तो शिष्यां धरि अनुभवें विश्ववसती. ॥ १९

चिदात्मत्वें दावी गुरुवर जडें सर्व शरणा
गुरुत्वाची सीमा हरि करितसे त्याच चरणा; ।

---

१. ज्या तत्वाच्या योगानें जगत् स्फुरण पावतें, जें जगताच्या स्फुरणाचें कारण आहे व जें स्फुरणरूप कार्य आहे. २. 'नगीं' असा अन्य पाठ आहे. ३. असा अनुभव घेणारे फार विरळ. ४. पहाणारा, तटस्थ वृत्तीनें जगताच्या घडामोडीकडे पाहणारा. ५. दशी. ६. जगद्रूप कपट करणारा (मायावी). ७. फार थोडे. ८. देहांतील जड तत्वें गुरुनें घालविलीं असतां. ९. जें उरतें त्याशिवाय जगतांत दुसरें कांहीं नाहीं, फक्त चैतन्य उरतें, त्यावांचून अन्य कांहीं उरत नाहीं. १०. पावनकळा=चैतन्यकळा. ११. जडरूप अलंकारांत. १२. तरंग=लाटा; तरंग जसे समुद्राचे विकार होत, पण त्यापासून भिन्न नव्हत, तसेंच हें स्थिरचर जगत् चिद्रूप आत्म्याचा विकार होय, म्हणजे ती एकरूप होत. १३. चिद्रूप सागरांत. १४. आकारास पावलेलीं (साकार) पंच महाभूतें. १५. तोच गुरु श्रेष्ठ होय, जो शरणागत सर्व शिष्यांला जड भूतें चिदात्मस्वरूपानें प्रतीतीस आणून देतो. १६. त्याच्या चरणाला गुरुत्वाची सीमा हरि करतो=तो गुरु सर्व श्रेष्ठ असें समजतो.

'पहासी तूं पार्था! स्थिरचर चिदब्धींच लैहरी,
असें ज्ञान ज्ञानी वदतिल' म्हणे आपण हरी. ॥ २०
नैमस्कारीं सेवें करुनि भजतां, प्रश्न करितां
प्रकारें या पार्था! निजगुरु म्हणे संत वरितां, ।
तुतें सर्वज्ञत्वें प्रकटचि जयां ब्रह्म दिसतें,
स्वबोधातें देती प्रथम वदती तत्त्व तुसतें. ॥ २१
असद्देहात्मत्वें मग तुज असा मोह न पडे,
परिच्छिन्नत्वाचा तदुपरिच कीं कंद उँपडे; ।
चिदात्मा जो आधीं तुज निज शरीरींच गवसे,
पहासी त्यांमध्यें स्थिरचर जसें सर्वहि वसे. ॥ २२
ज्याचा असा शरण आणि गुरु असा रे! तो ज्ञान ये रिति वदे उपदेश सारे; ।
लोकैद्वयें करि जगद्गुरु जें जयांत ज्ञानप्रसंग जग दीसत आत्मयांत. ॥ २३
उदंड कैंमाळोकीं जड अजड तत्वें निवडिती,
शरीरात्मभ्रांती श्रुति अनुभवेंही दवडिती; ।
परंतु स्वात्मत्वीं सकळ जग दावी स्वशरणा
गुरुत्वाची सीमा हरि करितसे त्याच चरणा. ॥ २४
दिसे एक सर्वत्र आत्माच सारा, दिसे त्यांत जेव्हां जडाचा पसारा, ।
मृषा हीं जडें चित्समुद्रीं तरंगीं दिसों लागती तेधवां अंतरंगीं. ॥ २५

---

१. हे पृथापुत्रा! अर्जुना! २. लाटा, तरंग. ३. 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥३४॥ यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव । येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥ [गीता अ० ४.] तूं ध्यानांत ठेव, कीं ज्ञानी तत्त्वजाणते जे आहेत, त्यांना दंडवत् नमस्कार केल्यानें, पुनः पुनः प्रश्न केल्यानें आणि त्यांची सेवा केल्यानें तुला या ज्ञानाचा ते उपदेश करितील. [परंतु तें ज्ञान एथें तुला श्रमावांचून मिळत आहे.] हे पांडवा, हें ज्ञान प्राप्त झाल्यावर तुझ्या मनामध्यें पुनः असल्या वेड्या कल्पना उत्पन्न होणार नाहींत, आणि सर्व भूतें तूं आपल्या ठायीं आणि माझ्या ठायीं अभेदपणानें पाहशील. (सुबोधचंद्रिका.) ४. 'निजगुरुपणें' असा अन्य पाठ आहे. ५. 'उघडे' असाही पाठभेद आहे. ६. 'अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः । सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥ यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन । ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥ (सुबोधचंद्रिका.) जरी कदाचित् तूं सर्व पाप्यांपेक्षां अत्यंत पापी असलास, तरी तूं ज्ञानरूप नौकेच्या योगानें सर्व पापसमुद्र अनायासें तरून जाशील. अर्जुना, जसा प्रदीप्त केलेला अग्नि काष्ठांचें भस्म करून टाकितो, तसा ज्ञानरूप अग्नि सर्व कर्मांचें भस्म करून टाकितो. [गीता अ० ४.] ७. भूलोकीं.

भावें अशा हरि म्हणे, 'जड भाग सारा तूं आत्मयांत अवलोकिसि हा पसारा;
कीं आत्मभाव कळतां तुज अंतरंगीं चित्सिंधु देखसिल तोचि जडातरंगीं.' २६

अशीं देखशी आपणामाजि भूतें, तयीं व्यापका त्याच मातें विभूतें, ।
पहासी निजात्मत्वभावें विशेषें, असे मीच हें सर्वभूतीं अशेषें. ॥ २७

आत्मयांत म्हणती जरि भूतें तीं खरीं गमति काय विभूतें, ।
चित्समुद्रलहरीच कळाया सूचवी स्ववचनांत कळा या. ॥ २८

गणावीं जरी हीं खरीं सर्व भूतें, तरी भिन्नता व्यापका ये विभूतें; ।
असल्या जगीं ब्रह्म जो भिन्न मानी, खरा मूढ तो [1]ब्रह्मशब्दाभिमानी. ॥ २९

[3]सत्याश्रयाविण [4]विवर्त नसे असत्य जें आंत बाह्य उघडें निज एक सत्य; ।
सत्या [5]मृषासि जरि भेद वदे [6]असाधू मिथ्या नगासि कनकासिहि भेद [7]साधू.॥ ३०

[8]अधिष्ठान बाह्यांतरीं जें असावें विवर्तें तयाच्या प्रकाशा दिसावें; ।
गुरूतें जडीं ब्रह्म ऐसें पुसावें, न दावूं शके त्या गुरूसी रुसावें. ॥ ३१

'ब्रह्म सर्वं खलु' निश्चित साच स्पष्ट हा श्रुतिसुखार्थ असाच ।
वामनीं गुरुमुखें कळला हो! सर्वदा अनुभवें फळला हो. ॥ ३२

[10]जरी सर्व ब्रह्म श्रुतिविहित हें केंवि घडतें?
जडत्वीं चैतन्य स्थिरचर विकारीं [11]विघडतें, ।
असे सर्वांमध्यें म्हणुनि म्हणती सर्वहि [12]असें,
श्रुतींचे स्पष्टार्थ त्यजुनि कथिती कल्पक असें. ॥ ३३

सर्वीं ब्रह्म असे, न सर्वहि असे, ऐसें घडे जेथवां,
[13]सर्वीं व्योम असे, न सर्वहि असे, ऐसें घडे तेथवां; ।
एवं व्योमचि सर्व तो नर म्हणे जो भ्रांतिफांसां पडे,
प्रामाण्य श्रुति मस्तकास वदतां ऐसें कसें सांपडे? ॥ ३४

---

१. अपरोक्षानुभूति—श्लोक ७०-८६ पहा. यांत मूढदृष्टीचें वर्णन आहे. २. 'शब्दबोधाभिमानी' असा अन्य पाठ आहे. ३. सत्स्वरूप ब्रह्म. ४. भोंवरा, विकार, जन्मपरंपरा. ५. असत्याला. ६. पाखंडी. ७. संपादन करो. ८. आदिकारण, उपादान. सुवर्ण हें अधिष्ठान आणि वळ्यादि अलंकार हे त्याचे विवर्त (विकार) होत; तंतु हें अधिष्ठान व वस्त्र हा विवर्त. मार्ती अधिष्ठान आणि घट विवर्त होय. [अनुभूतिलेश—श्लो० १८९.] ९. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' इत्यादि श्रुतिवचन. [अनुभूतिलेश—श्लो० १८९. छांदोग्य उपनिषद् ३—१४. १—हें सर्व निश्चित ब्रह्म—असा याचा अर्थ आहे.] १०. 'जडीं' असा अन्य पाठ आहे. ११. हें सर्व जर ब्रह्म आहे, तर तें जडरूप विकार कां पावतें? १२. अस्तित्वास पावतें. १३. सर्व वस्तुमात्रामध्यें व्योम (आकाश) व्यापक आहे, पण व्योम हें सर्व वस्तुजात नव्हे, यास्तव व्योम हेंच ब्रह्म असें जो भ्रांतिमूढ असतो तो म्हणतो.

उत्पत्ति हेमींच[1] जशी नगातें[2] प्रवेशही येच रिती जगातें, ।
ब्रह्मींच दोन्ही घडतां प्रकार, ब्रह्म स्वयें सर्वहि निर्विकार. ॥ ३५
दृष्टांत सूचवुनि येरिति मृत्सुवर्णीं ब्रह्मीं प्रपंचलयउद्भव[3] वेद वर्णीं; ।
होऊनि शांत करितीच उपासनाही ऐसें वदे श्रुति, विकल्प ययास नाहीं. ॥ ३६
'पुरुष एव इदं' म्हणतां श्रुती, गुरुमुखें करिती सफळ मृती ।
अनुभव स्वजनासह वामनीं, गुरुमुखें फळला वरवा मनी. ॥ ३७
हें ब्रह्म सर्व खलु निश्चित वेदवाणी बोले अशी अनुभवाचिच त्यास वाणी; ।
तें ब्रह्म सर्व न घडे म्हणऊनी वाचा बोलोनि भंग करिती श्रुतिवैभवाच्चा.॥ ३८
'सर्वीं ब्रह्म असो[4], समस्त न असो,' तें ब्रह्म कैसें वदा?
कीं साचें अथवा असत्य म्हणतां सर्वीच या सर्वदा; ।
साचें सर्व म्हणेल त्यास सहसा अद्वैत तें अंतरे,
तें मिथ्या म्हणतांच साधत असे सर्वैक्यसिद्धांत रे! ॥ ३९
खरें नीर नाना असत्या तरंगीं असत्या नगीं हेम बाह्यांतरंगीं; ।
विना व्यापक व्याप्य आकार सारे, न कांहीं नव्हे, सर्व आत्मा कसा रे! ॥ ४०
मुखें व्याप्य मिथ्या म्हणे बोध मानी असत्यांत त्या व्यापक ब्रह्म मानी; ।
निषेधी पुन्हा ब्रह्म सर्वत्र वाणी, नसे मूर्खतेची तयामाजि वाणी. ॥ ४१
सर्व ब्रह्मपणा न मान्य करिती, अद्वैत तें बोलती,
ब्रह्म व्यापक सत्य कारण असे वर्णूनिही डोलती; ।
विश्वव्याप्य असत्य कार्य म्हणती इत्यादिकें भूषणें,
सर्व ब्रह्म न मानितां, सकळ तीं होती तयां दूषणें. ॥ ४२
सत्या व्यापक कारणास अनृता व्याप्यास कार्यास जी,
बोला एकचि युक्ति योजुनि अशी कीं द्वैत दोघां सजी; ।
[6]नीर क्षीर खरींच दोनिहि जगद्व्योमोपमाही खरी,
सर्व ब्रह्म न मानितां जग मृषा बोले वृथा वैखरी. ॥ ४३

---

१. सुवर्णामध्यें. २. अलंकारातें. ३. स्थिति, रक्षण. ४. निश्चित आहे. ५. खोटें आहे. ६. 'व्याप्य-व्यापकता मिथ्या सर्वमात्मेति शासनात् । इति ज्ञाते परे तत्त्वे भेदस्यावसरः कुतः ॥' [वामनकृत अपरोक्षानुभूति–श्लो० ४६.]='व्याप्य व्यापक हे मिथ्या सर्व आत्मा अशा श्रुती । तत्व ऐसें समजतां जडभेदा तुरे उरी. ॥' [समश्लोकी अपरोक्षानुभूति.] ७. कमीपणा. ८. जें ब्रह्म आहे तें सर्वव्यापक आहे. ९. खोट्या, मिथ्या. १०. उदक. ११. जगदाकाशोपमा. १२. वाणी.

या अर्थांतर कल्पने करुनियां प्रामाण्य भक्तांस्तव
स्पष्टार्थ श्रुति साधिते खलु पदें कीं ब्रह्म हें वास्तव; ।
सर्वत्व प्रतिपाद्य होय अशि ही सर्वाद्ययोपासना
बोले हे श्रुति 'तज्जलानि' म्हणतां द्वैत त्यजी वासना. ॥ ४४
तज्जानि तल्लानि च तज्जलानि तदेव सर्वाणि च केवलानि ।
त्यापासुनी जन्म तयाच माजी प्रवेश दोरीच भुजंगमा जी. ॥ ४५
आतां रज्जु विवर्त सर्प लटिक्या व्योमेंचि तो व्यापिला,
आम्ही कोरुनि युक्ति काढुनि जरी तो पक्षही स्थापिला; ।
कार्य व्याप्य नव्हे न कारण तया व्यापूनि कार्या जसें
सर्व ब्रह्मपणास सर्व गवसे दृष्टांत वेदीं असे. ॥ ४६
रज्जु व्यापक सत्य कारण असे, व्याप्या भुजंगाकृती,
त्यातें कार्य मृषाचि कीं जड असें ज्ञानी पहाती कृती ।
सोनें व्यापक सत्य कारण असे व्याप्या नगांभीतरी,
तें मिथ्या नगकार्य चिज्जड असें कां हो! न माना तरी? ॥ ४७
पाणी व्यापक सत्य कारण असे व्याप्या तरंगाकृती
मिथ्या आणिक कार्य चिज्जड असें ऐक्यें पहा ती कृती; ।
हे दृष्टांत न अस्मदादिरचना शास्त्रें श्रुती बोलती
श्रीव्यासादि मुनींद्र याच उपमा देतां सुखें डोलती. ॥ ४८
श्रुती सर्व ब्रह्म स्फुट वदति तें जे रिति घडे,
प्रतीतीतें येना तिळ नयन तेथोनि विघडे; ।
प्रतीतीतें येना म्हणुनि विघडेना म्हणतसा,
गुरू नाहीं केला तुम्हि अनुभवी ब्राह्मण तसा. ॥ ४९
जडावेगळें अंश चैतन्य पाहें गणी पूर्ण अद्वैत बोधी कृपा हे ।
नसे ब्रह्म सर्वत्र ठावें भवार्ता, म्हणोनी म्हणे हे मृषा सर्व वार्ता. ॥ ५०
न वदती तिं चिदात्मक लक्षणें जडपणीं त्रि वदेच्चि विलक्षणें ।
जड चिदैक्य न मानिति मागुती त्यजिति कामदुघा परमागती. ॥ ५१

---

१. 'सर्वस्य पिंडब्रह्म तज्जलानि तिषात उपाधिताः' असें श्रुतिवचन आहे. २. सर्वव्यापी आकाश हें ब्रह्म आहे हा पक्ष. ३. सर्पाचे आकार. ४. अन्य. ५. 'व्यापक' असा अन्य पाठ. ६. अलंकारांमध्यें. ७. आमच्या कल्पनेनें रचिलेले हे दृष्टांत नाहींत, तर श्रुतिशास्त्रांतील आहेत. ८. 'सुवर्णी मातीचे श्रुति करित दृष्टांत उघडे' असा अन्य पाठ.

न वेदापुराणांत दृष्टांतवाणी असी ते जगीं शंकराचार्यवाणी ।
वदे कारणत्वेंचि दृष्टांत नाना तुरे ज्यापुढें शाब्दिकांचा तेनाना. ॥ ९२

दृष्टांत देतां न करीच वाणी श्रीशंकराचार्य अतींद्रवाणी ।
दृष्टांत तो त्यांत जलादिकांहीं संक्षेप त्यातें वदिजेल कांहीं. ॥ ९३

प्रपंचाचें उपादान विना ब्रह्म असेचिना ।
कार्य ब्रह्मचि कीं तेव्हां दुजें कांहीं न बोलवे. ॥ ९४

तरंगाच्या आकृतीनें पाणीच स्फुरतें जसें, ।
पात्ररूपें स्फुरे तांबें ब्रह्मांडीं आत्मता असी. ॥ ९५

घटनामें जशी पृथ्वी पटनामेंचि तंतुही ।
जगनामें तसा आत्मा असे आत्मा नसे जग. ॥ ९६

उपमनीं निजबोध यये रिती अपरोक्षानुभवार्थहि ये रिती ।
जनचि हा न कळूनिहि भांडतो गणिति सज्जन संतहि भांड तो. ॥९७

बळें हातीं माती कळश धरितां सांपडतसे,
पहातां केयूर स्फुट कँनक दृष्टी पडतसे; ।
प्रतीती येरीती विविध घडतां ब्रह्म गंवसे
शिशू नेणो तंतू परि पटपणीं तंतुचि वसे. ॥ ९८

नगीं दृष्टी मुष्टी कनक तुसतें सांपडतसे
उपादानत्वें तें म्हणउनिच ठायीं पडतसे ।
असे सर्वा वृत्ति प्रतिति हिच दृष्टी न गवसे
म्हणोनी ब्रम्हीं हे जग म्हणती हेमीं नग वसे ॥ ९९

हेमापासुनि होति जे नग तयां प्रत्यक्ष हे हेमता,
ब्रह्मापासुनि विश्व या अनुभवें याळा असी ब्रह्मता; ।

---

१. कमताई, तोटा. २. चर्चा. ३. हा श्लोक 'अपरोक्षानुभूति' टीका यांत ४४ वा आहे. ४. हा श्लोक 'अपरोक्षानुभूतीं'त ६२ वा आहे. ५. हा श्लोक 'अपरोक्षानुभूतीं'त ६३ वा आहे. ६. अलंकारविशेष. केयूर="हा एक दंडामध्यें घालण्याचा दागिना आहे. हा बाजुबंदाच्या आकाराचा असून त्याच्या दोन्ही तोंडांस सिंहाचें किंवा दुसऱ्या जनावराचें तोंड करून बसवितात. हा कधीं कधीं जडावाचा केलेला असतो. त्याला गोंडा नसला म्हणजे 'अंगद' म्हणतात." (देशी हुन्नर–पृ० ४७ पहा.) ७. सोनें. ८. 'प्रीतीनें' असा अन्य पाठ. ९. 'सुवर्णाज्जायमानस्य सुवर्णत्वं च शाश्वतम् । ब्रह्मणो जायमानस्य ब्रह्मत्वं च तथा भवेत् ॥' [अपरोक्षानुभूति–श्लो० ५१.]

ऐशा स्वानुभवें निजाद्वय सुखें सर्वज्ञ ते डोलती,
श्रीमच्छंकरभाष्यकारहि[1] असे शास्त्रीं तयां बोलती. ॥ ६०

जग नगा म्हणती जरि नश्वर[2], श्रुति म्हणे कनकोपम[3] ईश्वर; ।
तसि न शंकित शंकरवैखरी[4] कनक शाश्वतता वदते खरी. ॥ ६१

आकार जाय परि शाश्वत हेम राहे, प्रत्यक्ष गोष्टि न कळे कसि पामरा हे ?।
तैसीच आकृति घडे विघडे न कांहीं, हेमत्व हें निवडिलेंच शुकादिकांहीं.॥ ६२

हिरॅण्य म्हणतां स्वयें सुकृत शुद्ध वाचा हरी
मनासविल संशय प्रभुच उद्धवाचा हॅरी; ।
दिसे कृत तरी असे अकृत शाश्वतीं हेमता
अगा! सुकृत येरिती असि असे जगीं ब्रह्मता. ॥ ६३

यथास्थित स्वर्ण नगीं गणोनी, 'यथा हिरण्यं सुकृतं' म्हणोनी; ।
दावी हरीही सुकृतार्थ साच, श्रीशंकराचार्य वदे असाच. ॥ ६४

कनक शाश्वत होउनी आकृती, म्हणुनी शंकरही वदतो कृती ।
सकळ साम्य न दे उपमा परी, कनक सूचवि यां बहुतापरी. ॥ ६५

शिष्यास नश्वरपणेंच असत्य वाटे, ब्रह्मैक्य द्वेषुनि असे भरती कुवाटे, ।
नासूनि हेम नग नाश दिसे सुवर्णीं, हें तत्त्व पूर्ण गुरुराजचि एक वर्णी.॥ ६६

झालेंचि नश्वर तरी जडता असत्य, जो जो असत्य नग आश्रय त्यास सत्य; ।
चित्स्वर्ण जो जडनगीं गुरु सत्य दावी, त्यालाचि पूर्ण गुरुची पदवी वदावी.॥ ६७

घडे मोडे माया, घडत घड मोडी न कनकीं,
न मोडे हेमत्व क्वचिदपि खरें हें वचन कीं. ।
दहीं होतां जैसें त्वरित अति दुग्धत्व विघडे,
घडेना मोडेना कनक नग मोडे नग घडे. ॥ ६८

दुग्धासी ठेवुनि दहीं जरि दुग्ध दावी, माया तयांत तविकारण ते वदावी, ।
शक्तीविणें न विघडे निज दुग्धभाव, हेमीं तसा नगपणीं न दिसें अभाव.॥ ६९

---

१. श्रीमच्छंकराचार्यहि. २. नाशवंत. ३. सुवर्णासारखा. ४. शंकराचार्यांची वाणी. ५. हा श्लोक पुढील संस्कृत श्रुतीची टीका आहे:—'यथा हिरण्यं सुकृतं पुरस्तात्पश्चाच्च सर्वस्य हिरण्मयस्य । तदेव मध्ये व्यवहार्यमाणं नानापदेशो रहमस्य तद्वत् ॥.' ६. कृष्ण. ७. हरण करी. ८. घडामोड ही सोन्यास घडत नाहीं, तर नगास घडते; त्याप्रमाणें ब्रह्मास विकार घडत नाहीं, तर मायेला विकार घडतो, ब्रह्म अविकारी आहे, पण माया विकार पावते.

मोडोनि लागे नग जेंवि वाटे, गेलें तसें हेम असें न वाटे; ।
मोडे म्हणावें जरि तत्प्रसंगीं, न जाय कां हेम तयाच संगीं? ॥ ७०
ऱ्हस्व हाटक न आणि न लंभ, दोंसही कनक तें अवलंभ; ।
ऱ्हस्व लंभहि सुवर्ण गणावें, कीं मृषा द्विविध रूप म्हणावें. ॥ ७१
तें ऱ्हस्व मात्र जरि हाटकरूप वाटे, तें लागलेंच जयिं लंभपणांत वाटे, ।
तें ऱ्हस्वहि न म्हणवे अथवा न लंभ, दोंवेगळेंच म्हणतां नलगे विलंभ. ॥ ७२
हेमीं मृषा दीसति दोन्हि भाग, कीं होय ना हेमिपणीं विभाग ।
सहडे खुळा वर्तुळ भेद जाती, रूपेंच इत्यादि तुटोनि जाती. ॥ ७३
नगा एकाचे ते दिसति तुटतां चारि तुकडे,
न भेद स्वर्णत्वीं, समचि मिरवे जें चहुंकडे; ।
न ते चारी स्वर्णें नग न म्हणवे चारि शकलें,
घडेना मोडेना कनकपण इत्यादि उकलें. ॥ ७४
म्हणुनि शाश्वतता कथि शंकर, सुवृतता कथि शंकर शंकर; ।
जड चिदैक्य असें वदती श्रुति, कथुनियां उपमा भरिते श्रुती. ॥ ७५
ब्रह्म सर्व म्हणती श्रुति स्मृति, पूर्ण सद्गुरु वदे अशी स्मृती; ।
हें घडे न म्हणऊनि भांडतो, आणि अद्वयचि देव भांडतो. ॥ ७६
-व्याप्य आणि जग कार्य असत्य, ब्रह्म सर्वगत कारण सत्य, ।
ब्रह्म सर्व म्हणतांचि घडावें, अन्यथा सकळ हें उघडावें. ॥ ७७
दिवांधाच्या दृष्टीं दिसति रविरश्मी न उघडे,
न सर्व ब्रह्मत्वीं तसि उघडही दृष्टि रघडे, ।
अपूर्णौं पूर्णत्वें म्हणति सकळ ब्रह्म न घडे,
विना सर्वात्मत्वस्फुरण परिपूर्णत्व विघडे. ॥ ७८
स्वयें ब्रह्म हें सर्व दृष्टांत नाना वृथा तों अविद्यावृतांचा तनाना, ।
दिसे सर्वही ज्यास आत्माच सारा न बोलेल गोष्टी अशा तो असारा. ॥ ७९

---

१. 'असे ते स्वर्णत्वें समचि परि भ्रांतीच ठकले' असाही पाठ आहे. २. सर्वव्यापी. ३. घुबडाच्या. [दिवांध=घूक, घुबड. 'अथ शक्राख्यो दिवांधो वक्रनासिकः । हरिनेत्रो दिवाभीतो ...वान्दी पीयुघर्वेरी ॥ काकभीरुर्नक्तचारी' इति त्रिकांडशेषः.] ४. सूर्याचे किरण. घुबडाला सूर्याचे किरण दिसत नाहींत—ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें ज्याला सर्वात्मतेचें स्फुरण झालें नाहीं, त्याला ब्रह्माच्या ठिकाणीं सर्व पदार्थ दिसत नाहींत. ५. आवरणरहित; मोकळें, स्पष्ट. ६. 'अपूर्तें' असा अन्य पाठ आहे. ७. सर्वत्र आत्मा पसरला आहे असें स्फुरण. ८. अज्ञानी लोकांच्या. ९. नीरस, निःसत्व, व्यर्थ.

चिदंशास देहामधें भिन्न पाहे, अपूर्णा गुरूची तयातें कृपा हे; ।
गुरू जो न सर्वत्र आत्मत्व दावी गुरुत्वाचि सीमा कसी ते वदावी ? ॥८०
असें प्रस्तुतीं पंडुपुत्रास देवें क्रमें बोलिलें हें पहावें सदैवें; ।
गुरु तोचि कीं स्वात्मयामाजि सारा चिदैक्येंचि दावी जडाचा पसारा. ॥८१

अशा भावें पार्थाप्रति हरि वदे कीं जड जगा,
पहासी आत्मत्वीं वदसिल असें ज्ञान तुज, गा ! ।
असत्यें सत्यांत स्फुरति नग अन्यत्व न घडे,
पुढें गीतेमध्यें प्रगटहि असे शब्द उघडे. ॥ ८२

चतुर्थी वदे ज्ञान हें वासुदेव, स्वयें ज्ञेय बोले पुढें देवदेव ।
द्विधा ज्ञेय तें जो स्वशिष्या न दावी, गुरुत्वासि सीमा कशी ते वदावी. ॥८३
अगा ! ज्ञेय तें सांगतों सव्यसाची ! तया जाणतां मुक्ति ते दिव्य साची; ।
वदोनी असें आदिपर्यंत दावी अनिर्वाच्य सत्ताच ते तों वदावी. ॥ ८४
परब्रह्म आधीं असें देवदेवें असें बोलिलें ज्ञेय जें वासुदेवें ।
म्हणे तें अनादि स्वसत्तादि भावें तया विश्व होणें अनादि स्वभावें. ॥ ८५
अनादित्व जैसेंचि सत्ता स्वरूपा अनादित्व तैशीच त्या विश्वरूपा ।
अशी ब्रह्मता दो प्रकारें वदावी म्हणोनी द्विधा ज्ञेयही देव दावी. ॥ ८६

चतुर्थी अध्यायीं गुरुनमनसेवाविधि हरी
वदे, तेथें भूतें सकळ निज चित्सिंधुलहरी ।
पहासी तूं ऐसें कथितिल म्हणे ज्ञान तुज गा !
वदे येथें ज्ञेय स्फुट कर पदादी सह जगा. ॥ ८७

---

१. चैतन्याचा अंश जो जीव झाला. २. 'असो' असा अन्य पाठ आहे. ३. सगळा. ४. 'अशा आत्मत्वीं तें वदतिल' असा अन्य पाठ आहे. ५. 'अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् । एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ११ ॥ ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते । अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥ [भगवद्गीता—अ० १३] परमात्मा तोच अंशत्वेंकरुन आपण असें ज्ञान सर्वदा चित्तांत वागविणें, तत्त्वज्ञानाचें प्रयोजन जो मोक्ष तो सर्वांत श्रेष्ठ असें समजणें, याला ज्ञान म्हणजे जाणायाचें साधन असें म्हटलें आहे । याहून जें वेगळें तें अज्ञान । जें ज्ञेय म्हणजे जाणायाला योग्य, जें जाणल्यानें मोक्ष मिळतो, तें मी सांगतों । त्याला आदि नाहीं, तें सर्वोत्कृष्ट ब्रह्म । आहे आणि नाहीं या दोन्हीं लक्षणांत येत नाहीं असें जें म्हणतात तें तें । (सुबोधचंद्रिका.) ६. अर्जुना.

म्हणे 'सर्वतः पाणिपादं' म्हणोनी जडोर्मीस चिल्लहरूपें गणूनी, ।
वदे, केवळ ब्रह्म बाराविंयांत जगद्रूप हें ज्ञेय तेराविंयांत. ॥ ८८

जसें पाणिपादादि हें सर्व कांहीं म्हणे ज्ञेय वर्णीतसे व्यापकांहीं, ।
जरी ऊर्मि हे तोयरूपें वदावी तरी आकृती व्याप्य हा भाव दावी. ॥ ८९

म्हणे 'सर्वमावृत्य' या गूढभावें मनीं बिंबवी सन्निधानीं स्वभावें, ।
मृषा भाग तो व्याप्य हा सूचनांही, करूनी वदे मागुती भेद नाहीं. ॥९०

चतुर्थी वदे व्यापकीं व्याप्य भूतें, वदावें तया ऐक्य वाटे प्रभूतें, ।
सुवर्णा नगा ऐक्य दावी कृतीतें, पुन्हा व्याप्यताही मृषा आकृतीतें. ॥ ९१

मृषा भोगही त्याचपासूनि होतो, म्हणोनी असे सर्व आत्मा अहो! तो; ।
कळे ब्रह्म कीं सर्व तेव्हां असाच, स्फुरे सर्वदा बोध अद्वैत साच. ॥ ९२

तेरावा जो श्लोक तेराविंयाचा बोले आत्मा सर्वगोसांविंयांचा ।
वेदप्रोक्त ज्ञेय तें जो न दावी, त्याची येथें काय वार्ता वदावी? ॥ ९३

जे जडीं अजड वैभव दावी, तेंचि एक गुरुमूर्ति वदावी; ।
अक्षर क्षेरचि एकं कळाया वेदशास्त्रहि वदेच कळा या. ॥ ९४

जडावेगळा कोण आत्मा न मानी म्हणे द्वैत हें इष्ट भेदाभिमानी, ।
असा बोधही भेद फांसा भवाचा, वदे येरिती शंकराचार्यवाचा. ॥ ९५

देहादिक ब्रह्मचि सर्व वाटे, तो लागला अद्वयबोधवाटे; ।
म्हणोनि देहात्मविवेकरीती बोलोनिही तुच्छ पुन्हा करीती. ॥ ९६

आत्मा नव्हे जड शरीर असा प्रकार बोलोनियां प्रथम शंकर भाष्यकार ।
झाले सशंक बहु कीं निजलाभ वार्ता वाटेल हेंच परिपूर्ण जनीं भवार्ता. ॥ ९७

नये सर्वही ब्रह्म हें प्रत्ययातें, नसे तोंवरी ज्ञान हें सत्य यातें; ।
कळे सर्वही ब्रह्म तेव्हां भवाचा, तुटे पाश बोले असी वेदवाचा. ॥ ९८

---

१. सर्व ठिकाणीं हस्त व चरण ज्याला, असा. (सर्वव्यापी—असा भाव.) 'सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् । सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥ [भगवद्गीता—अ० १३.] त्याला सर्वत्र हात आहेत, सर्वत्र नेत्र, सर्वत्र पाय आहेत, सर्वत्र मस्तकें, सर्वत्र मुखें आहेत, सर्वत्र कान आहेत, आणि त्रैलोक्यामध्यें सर्व जें आहे त्या सर्वांला तें व्यापून राहिलें आहे । (सुबोधचंद्रिका.) २. जड लहरीस. ३. गीतेच्या बाराव्या अध्यायांत 'भक्तियोगा'चें प्रतिपादन केलेलें आहे. ४. तेराव्या अध्यायांत. ५. लहरी, लाट. ६. 'मृषा भागहो' असा अन्य पाठ आहे. ७. 'तेथें' असा पाठभेद. ८. अविनाशी. ९. नश्वर. १०. युक्ति. ११. वेदवाणी.

पर अवर म्हणावें थोर लहान सारें
सुरनृपपशुशरीरें सर्व सारें असारें, ।
पर अवर असे जें ब्रह्म तें ब्रह्म पाहे
मन अनुभवि जेव्हां श्रीगुरूची कृपा हे. ॥ ९९

दिसे ऐसें जेव्हां परअवरहृद्ग्रंथि सुटती
दिसे ऐसें तेव्हां परअवरसंदेह तुटती; ।
दिसे ऐसें जेव्हां परअवरकर्मक्षय घडे
दिसे ऐसें तेव्हां चरमगतिचें द्वार उघडे. ॥ १००

श्रुती ब्रह्मज्ञानें करुनि म्हणती मुक्ति जितुक्या
अशा सर्वाद्वैतें स्फुट करिति तात्पर्य तितुक्या; ।
दुहावें जेथूनी मथन वरि सर्वानुभव दे
न हें बोलोनीही परि नर उगें गोघृत वदे. ॥ १०१

परि प्रथम पायरीवरिच ठेविती जो पदा;
क्रमें चरमपायरीवरुनि तो चढे त्या पदा; ।
चढेल म्हणती तया धरुनि भावना अंतरीं,
स्वरूप कळतां असा वदति मोक्ष वाक्यांतरीं. ॥ १०२

कसा मोक्ष अद्वैतबोधाविनाहीं विना बोध अद्वैत सर्वत्र नाहीं; ।
म्हणोनीच जें ब्रह्म सर्वत्र मानें न वेदांतवाक्यें दुजीं त्यासमानें. ॥ १०३

आत्मा जडांत सकळांत अतर्क्य वाटे,
श्रुत्यर्थ यावरुनि लाविति अन्यवाटे; ।
त्याचें नसे नवल तो कुमताभिमानी
तैसेंचि हें वदति अद्वयबोधमानी. ॥ १०४

असे सर्वांठायीं म्हणुनि म्हणती सर्वहि असें
जड ब्रह्माद्वैत श्रुतिविहितही मोडिति असें; ।

---

१. शेवटचें. २. 'भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः । क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन्दृ… परावरे ॥' [मुं. उप. २.२.८] याचें भाषांतर असें:—कार्यकारणात्मक तें परब्रह्म (परावर) पाहि… असतां, ह्याच्या (मनुष्याच्या) हृदयांतील ग्रंथि (अविद्या आणि तिजपासून होणाऱ्या वासना) तुट-तात, सारे संशय जातात आणि सारीं कर्में क्षय होतात. (षड्दर्शनचिंतनिका–पृ० २१०.) ॥ ३. देव राजे यांचीं शरीरें. ४. लहान मोठा, चांगला वाईट हा हृदयांतील भेद. ५. अखेरच्या गतीचें. ६. अखेरच्या पायरीवरून.

अशाच्या[1] शिष्यांला कसि जड चिद्द्वैतरचना[2]
कळे साक्षात्काराविण[3] विफळता वेदवचना. ॥ १०५

नहो[4] सर्व सर्वी तया व्यापकाच्या, न जो प्रत्ययप्राप्त तो बोध काचा ।
असी गोष्टि तों त्यासही मान्य साची वदों तत्प्रतीति स्वयें मानसाची[5]. ॥ १०६

प्रतीति जसि आपुले तनुमधें स्वयें सांपडे
सचेतनअचेतनीं जरि ठसाच ऐसा पडे; ।
जडोर्मि[6] मग ते दिसे निज चिदंबुसत्ता[7] खरी
जडैक्य न घडे असी म्हणु निघेल कां वैखरी[8]? ॥ १०७

मना व्यापक ब्रह्म होतांचि ठावें, जड द्वैत ठाणें समूळीं उठावें, ।
दिसे सत्य पाणी असत्या तरंगीं उरे द्वैत कैसें तया अंतरंगीं. ॥ १०८

प्रतीति आहे म्हणऊनि वाणी वदेल शब्दीं न करूनि वाणी[9], ।
परंतु मानूनि मृषा[10] जडाला, न ब्रह्म मानी तरी तो बुडाला[11]. ॥ १०९

जो खरें जड म्हणेल असाधु द्वैतता श्रुतिविरुद्ध असाधु, ।
ब्रह्म सर्व न गणोनि जडाला, जो म्हणे अनृत तोचि उडाला. ॥ ११०

कीं ठाव कीं व्यापकता म्हणोनी बोले जईं व्याप्य मृषा म्हणोनी, ।
तेव्हां अधिष्ठानविवर्तसिद्धी रज्जूचि कीं सर्प असी प्रसिद्धी. ॥ १११

एवं जईं व्यापकता कळावी जडैक्यता निश्चित आकळावी ।
जो हें घडेना म्हणतो स्ववाणी त्याला असे व्यापक बोधवाणी. ॥ ११२

तरंगीं जळ व्यापकत्वें कळावें तयीं ऊर्मि मिथ्यत्व तें आकळावें ।
मग व्यापकत्वासि मिथ्या म्हणावें वृथा शब्दपांडित्य तें तों गणावें. ॥ ११३

असा सर्वस्वाचा निगम[12] न तया स्वानुभव दे
असे सर्वां देहीं विदित नसतां कल्पुनि वदे; ।
जडोर्मीं व्यापी जो चिदुदधि[13] निजात्माचि समजे
स्वसर्वब्रह्मत्वीं पुरुष मग कां तो न उमजे? ॥ ११४

नै[14] ज्या सर्व ठावें न सर्वत्व ठावें न ज्या द्वैत[15] ठावें कसें हो! उठावें? ।
जडावेगळा जो स्वदेहींच पाहे अपूर्णा गुरूची तयातें कृपा हे. ॥ ११५

---

१. 'अशा या' असा अन्य पाठ आहे. २. चैतन्यरूप भेदरहित रचना. ३. प्रत्यक्षानुभव. ४. 'नव्हे' असाही पाठ आहे. ५. मनाची. ६. जड तरंग. ७. चैतन्यरूप उदकाची सत्ता. ८. वाणी, वचन. ९. कमीपणा. १०. असत्य. ११. 'उडाला' असाही पाठ आहे. १२. वेद. १३. चैतन्यसागर, ज्ञानसमुद्र. १४. 'नसे' असा अन्य पाठ. १५. भेद.

गुरु स्वात्मता जो स्वशिष्यास दावी अहो! काय ते एकदेशी वदावी? ।
स्वदेहांत आत्माच या प्रत्ययातें दिसावेंच सर्वत्र तें सत्य यातें. ॥ ११६

ऐका[1] स्वदेहींच जसा कळावा तैसाचि सर्वत्रहि आकळावा ।
तरीच आत्मा कळला म्हणावा तो आत्मवेत्ता[2] गुरु हा गणावा. ॥ ११७

चिज्जडाद्वय[3] जसें उडवीती, व्यापकत्वहि तसें बुडवीती; ।
ते गुरू म्हणुनि केंवि म्हणावे? वेषें[4] मानुनिच सत्य गणावे. ॥ ११८

मृषा व्याप्या तेव्हां म्हणति लटिकें व्यापकपण,
स्व आचार्यत्वा ते मिरविति असे एक कृपण; ।
न यां[5] चित्सिंधूता स्थिरचर तरंगांत दिसती,
वदावें हें तेणें, इतर वदती गोष्टि हसती. ॥ ११९

स्वदेहींच आत्मत्व ये प्रत्ययातें, न सर्वत्र तैसें दिसे सत्य यातें, ।
असे प्राप्ति एकाच देहात्मयाची नसे सर्वथा भेटि सर्वात्मयाची. ॥ १२०

'[6]ममैवांशो जीव' प्रभु म्हणतसे पांडुतनया,
चिदंशज्ञानी तो करित निजदेहीं जतन या; ।
जसे नाना भानू[7] प्रतिघटजळीं भिन्न दिसती,
अहंसत्वीं तैसे प्रतितनु[8] चिदात्मे गवसती. ॥ १२१

जया[9] ज्योतिरूपें रवी नीरभेदें दिसे भिन्न भेटे पुन्हा तें अभेदें; ।
असा क्षेत्रभेदी असे वासुदेव श्रुती बोलती जाणती हें सदैव. ॥ १२२

सचेतनतनूमधें वसति चित्प्रकाश द्वय
स्वरूप सचराचरीं विषयवर्ज तें अद्वय; ।
तदंशचि चिदंश[10] ते जग तरू फळें भक्षिती,
तयां जड निषेधुनी जन अपूर्ण ते लक्षिती. ॥ १२३

---

१. 'ऐसा' असा पाठभेद आहे. २. आत्मज्ञ. यांत 'गुरु' कोणाला समजावें हें सांगितलें आहे. ३. 'चिज्जडाजड असें' असा अन्य पाठ आहे. ४. 'वेषधारक तयांस' असा अन्य पाठ. ५. 'जया चित्सिंधूच्या स्थिरचर तरंगाच दिसती' असा अन्य पाठ आहे. ६. 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥ (गीता—अ० १५) माझाच सनातन अंश जीवलोकीं जीवाचें रूप धारण करितो, आणि प्रकृतीमध्यें लीन असलेलीं पांच इंद्रियें आणि मन यांना ओढून घेतो । (सुबोधचंद्रिका). ७. प्रत्येक घटांतील उदकांत सूर्य जसे भिन्न भिन्न दिसतात, तसा मी प्रत्येक देहांत भिन्न असा दिसतों. ८. प्रत्येक देहांत. ९. 'यथा ह्ययं ज्योतिरात्मा विवस्वानापो भिन्ना बहुधैको नुनत् । उपाधीनां क्रियते भेदरूपो देवः क्षेत्रस्था ये मे प्रोष्यात्मा' इत्यादि. १०. ज्ञानांश.

तया जो या देहीं निजतनुनिरासें समजला,
गमे त्याला झालें अधिगत परब्रह्म मजला; ।
पुसेना कीं ब्रह्म श्रुति म्हणति सर्वत्र वसतें,
मला कायाऐक्यें अनुतनुचमध्यें गवसतें. ॥ १२४

तयातें तो नेणें मुख म्हणतसे जो प्रतिमुखा,
मुखा नेणें जेंवि प्रतिमुखपणें जाणत मुखा; ।
मिळे सर्वात्मत्वीं मति मग न तो अंश गवसे,
तटस्पर्शें नीर प्रतितट न नीरीं न गवसे. ॥ १२५

द्विधा चैतन्याचा अनुभव नसे तो न समजे,
पहाती सर्वज्ञ स्थिरचर जगामाजि सम जे; ।
स्वकर्माचें भोगी कृत फळ गुणीं तोंवरि वसे,
अशेषात्मध्यानीं इतरपण त्याचें न गवसे. ॥ १२६

जया बंध भोक्तृत्व याही भवार्ता तयालागिं मोक्षाचिही लाभवार्ता, ।
जया रोग आरोग्य त्याला प्रसिद्ध श्रुतिप्रोक्त सिद्धांत हा क्षिप्रं सिद्ध.॥१२७

भोग यास्तवचि चित्प्रतिबिंबीं भेद ऐक्यहि तया निजबिंबीं, ।
ब्रह्म तें म्हणुनि जो गुरु दावी भोक्तृता तरि तया न वदावी. ॥ १२८

गुरूच्या मुखें आयके ब्रह्म कानीं पदीं दुःख त्यातेंचि त्या कंटकानीं; ।
तयावीण भोक्ता दुजा सांपडेना परब्रह्म तों भोगफांसा पडेना. ॥ १२९

'उत्क्रामंतं स्थितं वा' म्हणउनि हरि हा श्लोक बोलें स्ववाचे
कां देखे ज्ञानचक्षूकरुनि अनुभवी भोग आशा जिवाचे; ।
ज्ञानी सर्वात्मवेत्ते निजतनुच भवीं भोगितां अंश सारे,
साक्षित्वें जो पहातो तुझि इतरपणें तो पहाना कसा रे? ॥ १३०

तुम्हां ब्रह्म वाटे तया भोग सारे, दिसेना तुम्हांलागिं तोही असा रे! ।
अशा संकटें प्राकृतग्रंथकारीं मनीं मानिला भोग नानाप्रकारीं. ॥ १३१

न भोक्तृत्व ब्रह्मीं, प्रकृति जडवर्गास न घडे
चिदंशातें भोक्ता म्हणुनि म्हणतां तत्व उघडे, ।

---

१. प्राप्त, मिळालें. २. पाणी. ३. लवकर. ४. 'उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥१०॥[गीता–अ०१५] तो एका देहांतून दुसऱ्या देहीं जात असतां, किंवा एकाच देहीं स्थिर असतां, किंवा इंद्रियांनीं युक्त होऊन विषयांचें सेवन करीत असतां, त्याला मूढ जन पाहत नाहींत; ज्यांना ज्ञाननेत्र आहेत ते मात्र पाहतात । (सुबोधचंद्रिका.)

'ममैवांशो जीव' प्रभु म्हणतसे वेदहि असें
मनातें मानावें तरि जडगुणा मौन्यचि असे. ॥ १३२
जरी ब्रह्म येतें तुम्हा प्रत्ययातें पहाते अभोक्तेपणें सत्य यातें, ।
पहातां तुम्ही ब्रह्म माना जयाला म्हणे अंशभोक्ता महाराजयाला. ॥ १३३
असा अंश जो भोग त्याच्या अदृष्टीं तया पाहती ते जया ज्ञानदृष्टी, ।
विसुंडास तो भोगितां सांपडेना म्हणे कृष्ण जो भोग फांसा पडेना. १३४
वदे आतां भेदें प्रकृति हरि आठांतचि मनें
स्वयें भोक्तृत्वीं जो प्रकृति न गणी पक्षिगमनें, ।
घडेना भोक्तृत्व प्रकृति जडवर्गास हरि तो
असा सत्राध्यायीं अतिविशद संदेह हरितो. ॥ १३५
भोक्तृत्व याच परि भोग म्हणाल नाहीं
भोक्तृत्व केंवि घडणार तयाविनाहीं; ।
पद्यामधें पुढिल याच पहा हरी तो
संदेह भोक्तृविषयीं अवघा हरीतो. ॥ १३६
प्रकृतिमाजि तिचे गुण भक्षितो प्रकृतिनें प्रकृतीस अपेक्षितो, ।
प्रकृतिनें प्रकृतींतचि धांवतो विविध देह म्हणूनिच पावतो. ॥ १३७
टीकेंत विस्तार विचार साचा संक्षेप हा याच सुधारसाचा, ।
न सर्वथा भोग अनात्मयातें, भोक्तृत्व हा भोग चिदात्मयातें. ॥ १३८
म्हणे श्रुति शरीर हें रथ चिदंश आत्मा रथी,
इह द्विविध इंद्रियें फिरवि बुद्धि हे सारथी, ।
हयांसम न दोर हे विषय ज्यामधें तोलती,
तयांसहित भोक्तृता कुशळ आत्मया बोलती. ॥ १३९

१. 'पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान्गुणान् । कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २१ ॥' (गीता—अ० १५.) प्रकृतीच्या ठायीं पुरुष राहतो, आणि प्रकृतीच्या गुणांचा उपभोग घेतो। म्हणून ज्या ज्या गुणांशीं त्याची संगति घडेल त्या त्या प्रमाणें उच्च नीच योनींमध्यें तो जन्म पावतो । (सुबोधचंद्रिका.) २. वामनकृत 'यथार्थदीपिका' नामक टीकेंत. ३. 'आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु । बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च । इंद्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् । आत्मेंद्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः । (क. व. ३.४.) आत्मा रथांत बसणारा असें जाण. शरीर हें रथच. बुद्धि ही सारथी असें जाण. मन ही आसनी. इंद्रियें हीं घोडीं. त्या घोड्यांना विषय हे मार्ग. पंडितजन शरीर, इंद्रियें आणि मन इतक्याला मिळून भोक्ता असें म्हणतात. ४. ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें. हे त्या रथाचे घोडे व बुद्धि हा सारथि. ५. ज्ञानी.

मनीसी पदें प्रस्तुती वेदवाणी वदे त्यांस ज्याला नसे बुद्धि वाणी, ।
मनीषी असें बोलती कीं जनात्मा असे भोग भोक्ता न आत्मा अनात्मा. १४०
न आत्मया बंधु न मोक्ष कांहीं, न इंद्रियांतें मन आदिकांहीं; ।
आत्म्यास गीता निगमीं प्रसिद्ध भोक्ता तया होइल सर्व सिद्ध. ॥ १४१

प्रगट करि मनीषी शब्द येथें विचार,
श्रुतिविण वदणें ते सर्व वेडे विचार, ।
धरुनि निगम दीजे बोलणें युक्तिसिद्ध
त्रिभुवन करि त्यातें मान्य ऐसें प्रसिद्ध. ॥ १४२
श्रुति तरि म्हणते कीं आत्मया भोग साच
स्फुट मननविचारें अर्थ साधे असाच, ।
असुखमय सुखाचा रोग हा ज्या भवार्ता
सुमति गणति त्याला मोक्षआरोग्यवार्ता. ॥ १४३
मनासि जे भोगति भोग सारे, त्यांला पुसों मोक्ष मना कसा रे? ।
ते बोलती कीं तरि कोण बद्ध म्हणाल आत्मा तरि तें अबद्ध. ॥ १४४
जया भोग हा रोग हा बद्धवार्ता चिदंशा तया मोक्ष आरोग्यवार्ता, ।
ममांशा जयाला म्हणे चक्रपाणी विवेकाब्धिचें या बहू खोल पाणी. ॥ १४५
कळे निःशब्दत्वें स्फुरण उरणें कारणपणें,
दिसे चित्सिंधूचें उचड जळऊर्मींत लपणें; ।
चिदंगीं स्वांशाचें स्वकृतफळभोगींच फिरणें,
सदा तो विवेक्यें तरि जितेंचि दुःखाब्धि तरणें. ॥ १४६
चिदंशज्ञें सर्वत्व नेणें कदापी स्वअज्ञान शौर्यें तयीं एक दापी; ।
म्हणे इंद्रियातीतआत्मस्वरूपीं न देखों जगद्रूप कांहीं अरूपीं. ॥ १४७
स्वरूपीं त्या आत्मा जग सकल आकाशसुमना
प्रतीतीमध्यें त्या बुडवुनि असों नित्य सुमना; ।

---

१. 'शुद्ध' असा अन्य पाठ आहे. २. माझा अंश जो जीव त्याला. ३. ज्ञानसागराचें. ४. जिवंतपणीं. ५. ज्ञाता. ६. आकाशपुष्प, खपुष्प. [हा शब्द कोणत्याही पदार्थांचा अभाव दाखविणारा आहे.] 'एष वंध्यासुतो याति खपुष्पकृतशेखरः । मृगतृष्णाम्भसि स्नातः शशशृङ्गधनुर्धरः ॥' म्हणजे—हा वांझेचा पोर, मृगजळांत न्हाऊन, आकाशसंबंधी बागेंतील फुलांचा तुरा खोचून आणि सशाच्या शिंगाचें धनुष्य हातांत धरून जात आहे, [असें मीं आपल्या नजरेनें खरोखर पाहिलें] या भाषणांत एकही शब्द खरा नाहीं, इत्यादि उदाहरणम्. [नामलिंगानुशासन–पृ० २०.]
७. उत्तम मनाला.

अविद्या तों गेली अज्ञड निज सत्ताच कळली,
वदे गोष्टी ऐशा चतुर परि विद्या न फळली. ॥ १४८
बुद्धीस ज्या जग दिसोनि नसे स्वरूपीं,
सत्यत्व तीस उरलें दृढ विश्वरूपीं; ।
विक्षेपशक्ति उरलीच तिची अविद्या,
ठावा न सर्वगत तो म्हणवे न विद्या. ॥ १४९
नसोनी सर्वत्व स्वसुख जरि देहींच असतें,
तुझें तें स्वाज्ञान स्वतनुभरि बोधें निरसतें; ।
स्वदेहीं देहाचा स्वकृतफळभोक्ताच कळला,
अगा! ब्रह्मज्ञानद्रुम अजुनि नाहींच फळला. ॥ १५०
जें जयास दिसतें उपनेत्रें, तें तयासि दिसतें उपनेत्रें, ।
काय तें गगनपुष्प म्हणावें? व्योमपुष्प जगीं केंवि गणावें? ॥ १५१
इंद्रियें धरुनिही उपनेत्रें देखसी जग अगा! मतिनेत्रें, ।
त्याविणें जग दिसे न मतीतें व्योमपुष्प म्हणुही भय तीतें. ॥ १५२
खपुष्प झालें मग विश्व सारें देहादिकें ही लटिकीं असारें, ।
चित्सिंधु देखे न जडा तरंगीं तों ते जड भ्रांतिच अंतरंगीं. ॥ १५३
चिद्रज्जुळी वळखि विश्वपणीं तसा घू तो केवळीं मग खपुष्प म्हणोनि साघू ।
चैतन्य सर्व गत हें न दिसे भवार्ता त्याला खपुष्प जग हेंचि खपुष्प वार्ता १५४
चिदंबुत्वें पाहे स्थिर चर जडोर्मी बुडबुडे
चिदब्धीमध्यें त्या जग जड समूळीं तरि बुडे, ।
तरंगाचीं रूपें जळ निवडितां व्योमसुमनें
खपुष्पत्वें बापा! मग जग पहावें स्वसुमनें. ॥ १५५
स्वांशत्वें कृष्ण बोले श्रुतिगणसलिलीं भिन्न आत्मार्क भेदें
भोक्ता भिन्ना उपाधीप्रति म्हणत असें अंशअंशीं अभेदें, ।
अंशातें ज्ञानचक्षू करुनि अनुभवी भोग काळीं पहाती

१. ज्ञानचक्षूनें. २. आकाशसंबंधीं पुष्प. (हा शब्द कोणत्याही पदार्थाच्या अभावाचा ज्ञापक.) ३. चैतन्याच्या उदकपणानें. ४. जडलाट. स्थिरचर सृष्टीला लाटा व बुडबुडे मानी. ५. आकाशपुष्प असें. (स्वसुमनें या शब्दाचें विशेषण.) ६. आत्मा हाच सूर्य (अर्क). पाण्याच्या उपाधीनें सूर्यबिंबें भिन्नभिन्न दिसतात, तसे जीव हे शरीराच्या उपाधीनें भिन्न आहेत.

'भुंजानं वा' म्हणोनि प्रभु म्हणत असे अंश सैद्रश्मि होती. ॥ १५६

गुरू दावी देहीं शरण तनुमध्येंच समजे,
न देखे चित्सत्ता स्थिरचर जगामाजि सम[3] जे; ।
कृतार्थ ज्ञानें त्या म्हणति गुरु सर्वज्ञ न करी
धनाच्या आशेनें अधन अधनस्थान नुकरी. ॥ १५७

शशी जातां अस्ता, भ्रमर कुमुदामाजि गवसे
तया मंदाराचा कुसुमरसही केंवि गवसे? ।
शशी जिज्ञासूचा गुरु करुनि अल्पज्ञ बुडवी
सपूर्णत्वें गाजे मग जड चिदद्वैत उडवी. ॥ १५८

तृप्त एक न करी मधुपानें पुष्प हें वरियलें मधुपानें, ।
आणिका शरण त्यासम जाया योग्य शिष्यसमता समजाया. ॥ १५९

वदे जो गायत्री प्रथम गुरु तो एक असतां
नव्हे द्रोही, ज्ञानी करुनि गुरु तो तत्व पुसतां, ।
अपुर्ता तोही जो जग नग उपादान उघडे
न दावी कां तेव्हां गुरु न करणें पूर्ण नुघडे. ॥ १६०

परब्रह्मनामें चिदंशास दावी असो ते किती भिन्न वार्ता वदावी? ।
निषेधूनि देहा अहंप्रत्ययातें गुरू सांगतो ब्रह्म तें सत्य यातें. ॥ १६१

बुडविती शरणासह आपणा निखिल मानित तत्व अहंपणा, ।
गुरु शिळा असि गाढ गळां पडे, तरि भवाब्धि थडी कसि सांपडे? ॥ १६२

न वाटे स्वदेहात्मता सत्य यातें असें बोधुनीयां अहंप्रत्ययातें, ।
म्हणे केवळ ब्रह्म हें सर्व सारें जडाच्या मनीं बोधतो सर्व सारें. ॥ १६३

भोक्ता असा ब्रह्म म्हणोनि पाहे संपूर्ण मानी गुरुची कृपा हे, ।
तों दुःख भोक्तृत्वहि त्यासी वाटे भरे सुमार्गी तरि आड वाटे. ॥ १६४

कुपथ अति नता कीं ब्रह्म आत्म्यास वाटे,
जड अंजड विवेकें लागती ज्ञानवाटे[12]; ।

---

१. 'उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥१०॥' (गीता अ० १५). भावार्थः—तो एका देहांतून दुसऱ्या देहीं जात असतां, किंवा इंद्रियांनीं युक्त होऊन विषयांचें सेवन करीत असतां, त्याला मूढ जन पाहत नाहींत; ज्यांना ज्ञाननेत्र आहेत ते मात्र पाहतात. (सुबोधचंद्रिका.) २. उत्तम किरण. ३. चित्सत्ता. ४. चंद्र. ५. सांपडे. ६. पुष्परसाच्या प्राशनानें. ७. भ्रमरानें. ८. पैलपार. ९. तत्व. १०. बिंवतो, भरतो. ११. उत्तमप्रकारें. १२. हा समास चिंतनीय आहे.

म्हणति निखिल आत्मा चिज्जडातें अहंता,
नवल कलियुगीं हे दाखवी कंसहंता. ॥ १६५

शरीरीं फिटे आत्मता तामसाची, सरे इंद्रियां स्वात्मता राजसाची; ।
धरूनी उरे सात्विका मीपणातें जडीं ना लते मानितो आपणातें. ॥ १६६

शाखा सशब्द निरसूनि शशांक दावी
सत्ता स्वशब्द निरसूनि असी वदावी; ।
ते आत्मता गणिति सात्विक मीपणातें
बोधें अशा म्हणविती गुरु आपणातें. ॥ १६७

असो; या प्रसंगांत कां दंभवार्ता जड ब्रह्म दावी गुरू तो भैवार्ता, ।
जडीं व्यापकत्व स्वशिष्यास दावी कसी पूर्ण ऐक्यार्थता ते वदावी ? ॥ १६८

अशब्दाच्या शब्दाविण गुरु जरि स्वानुभव दे,
अविद्या नासेना जरि जड जगीं त्यास न पदे; ।
चिदंशज्ञानें त्या कसि निजअविद्या निरसते,
जड ब्रह्माद्वैताविण विकळ विद्याचि दिसते. ॥ १६९

दिसे सर्वांठायीं तरिच निज चिद्ब्रह्म गवसे,
चिदात्मत्वें एकें निजतनुमधें अंशहि वसे; ।
न तो चारी वाचा प्रकृतिहुनि तोही पर असे,
न देहाबाहेरी प्रतिति तनुमध्यें बहु असे. ॥ १७०

कळे ब्रह्म तेव्हांच ते ब्रह्मविद्या अहंदेह हे भावना ते अविद्या; ।
परब्रह्म ज्याला म्हणे वेदवाचा घडावा बरा बोध त्या वैभवाचा. ॥ १७१

'सत्य ज्ञान अनंत' वेद म्हणती तीं लक्षणें ज्या कळे
तेंचि ब्रह्म परंतु शब्दचि तिहीं शब्दां न तें आकळे, ।
तेव्हां त्रिश्व विलक्षणें विविधही हीं लक्षणें साधिती
कीं मिथ्या जड अंतवंत जग हें ऐसें गुरू बोधिती. ॥ १७२

---

१. 'शाखांत शब्द निरसूनि' असाही एक पाठ आहे. २. चंद्र. ३. संसारपीडिताला. ४. नाहींशी होते. ५. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी अशीं चार वाचांची नांवें आहेत. ६. 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सो श्नुते सर्वान् कामान् त्सह ब्रह्मणा विपश्चिता ।' [ब्र० उ०]. याचा भावार्थः—ब्रह्म हें सत्य, ज्ञान आणि अनंत आहे. हृदयरूप, उत्तम आकाशरूप गुहेमध्यें ठेवलेलें जें तें जो तो जाणतो. चतुर ब्रह्मासहवर्तमान तो सर्व भोग अनुभवितो. ७. सत्य, ज्ञान आणि अनंत या तीन शब्दांत. ८. नाशवंत, नश्वर.

सत्य ब्रह्म, मृषा प्रपंच परि तो सत्याचिगें नाकळे,
ज्ञानीं लक्षण हें द्वितीय गुरुच्या बोधें अहो ! तें कळे. ।
तें तों सर्व अनंत हें गुरु वदे यालागि तीं लक्षणें,
तेव्हां श्रीगुरुराज दाखवि जयीं पाहे कृपाईक्षणें. ॥ १७३

उपसंहार.

(श्लोक.)

चरम गुरुपदाची कीर्ति लोकीं कळाया
परमपरमबोधें दाखवी तो कळा या, ।
चरममुख जयाचें शेषशायी हरी तो
चरमकुमतवादा वामनात्मा हरीतो. ॥ १७४

कर्मतत्व.

अध्याय पहिला.

फलतत्व.

(श्लोक.)

वंदोनियां स्थिरचरात्मक वासुदेवा ध्यानीं फणींद्रशयना जगतात्मदेवा, ।
'श्रीकर्मतत्व'जनसत्वविशुद्धकारी दिव्य प्रबंध रचितों भवबंधहारी. ॥ १

---

१. कृपाकटाक्षानें. २. या 'कर्मतत्व' नामक प्रकरणाचे आठ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायांतील विषयाचा उल्लेख त्या त्या अध्यायाच्या चरम श्लोकांत केला आहे. पहिल्या अध्यायांत 'फलतत्व' (श्लोक ५५), दुसऱ्यांत 'यज्ञतत्व' (श्लोक ३६), तिसऱ्यांत 'भोगतत्व' (श्लोक ४८), चवथ्यांत 'भोक्तृतत्व (श्लोक ५५), पांचव्यांत 'आत्मतत्व' (श्लोक ७१), सहाव्यांत 'वेदतत्व' (श्लोक ११६), सातव्यांत 'जीवतत्व' (श्लोक ५३) आणि आठव्यांत 'अनुभवतत्व' (श्लोक ८७) याप्रमाणें या आठ अध्यायांतील विषय आहेत. वामनानें भक्ति आणि अद्वैतमताभिरुचि यांस अनुसरून या प्रकरणांत श्रुतिप्रमाणानें तत्वविचार केला आहे. 'कर्मतत्व' नामक वामनकृत एक संस्कृत प्रकरणही आहे. ३. चराचरवस्तूंचा आत्मा, स्थावरजंगम सृष्टिव्यापक. गीतार्णव–श्लो० ६-११; चित्सुधा–श्लो० २०पहा. ४.'ज्यामाजी सर्व भूतांचा वास । ज्यांत सर्व भूतें तो जगन्निवास । वासुदेव *****. ॥ यथार्थदीपिका–अ० ७ ओं० ७५७. ५. सर्पश्रेष्ठ जो शेष त्यावर शयन करणारा. ६. जगताचा आत्मरूप देव अशा. ७. या मंगलाचरणरूप श्लोकांत वामनानें या प्रकरणाचें 'कर्मतत्व' असें नांव सांगून त्यांतील कथाभागाचेंहि थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. हा प्रकार वामनाच्या इतर प्रकरणांतही दिसून येतो. ८. जनांच्या सत्वगुणाची किंवा म-

[1]ज्याचें मुख [2]द्विज असें [3]'पुरुषाख्य'सूक्तीं [4]त्याचेंच कीं वदन वामन हे [5]तदुक्ती ।
विश्वात्मते करुनि तो दुसरें असेना; ग्रंथासि यासि करणार दुजा दिसेना. ॥२
[6]जो [7]सर्वबुद्धिगत [8]चित्प्रतिबिंबरूपें तो [9]भक्तहृद्गत अनंत निजस्वरूपें ।
त्याच्या मुखेंचि उपदेशुनि [10]आत्मविद्या जीवांचिया [11]हरि मुकुंद [12]अनाद्यविद्या. ॥३
जो [13]श्रीगुरु प्रगटला मलयाद्रिदेशीं केलें कृतार्थ करुणार्द्र [14]कटाक्षलेशीं, ।

नाची शुद्धि करणारा. सत्वगुणाची जी अत्यंत शुद्धि ती ईश्वरप्राप्तीस कारण होय. ती शुद्धि ज्याच्या योगानें प्राप्त होईल असा. ९. श्लोकांची रचना, उत्तम ग्रंथ. १०. संसारबंध दूर करणारा.

१. ज्या ईश्वराचें. २. ज्या परमपुरुषाचें मुख द्विज (ब्राह्मण) आहे असें 'पुरुषसूक्तां'त वर्णन आहे. 'पुरुषसूक्ता'ची द्वादशी ऋचा अशी आहे:—'ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः' प्रजापतीच्या मुखापासून ब्राह्मणजातिविशिष्ट पुरुष उत्पन्न झाला—असा याचा अर्थ. ज्यापेक्षां द्विज हें प्रजापतिमुख आहे त्यापेक्षां वामनाची जी उक्ति ती त्या परमात्म्याचीच होय. हें 'कर्मतत्व' प्रकरण त्या परमात्म्यानेंच लिहिलें, मी (वामनपंडित) केवळ निमित्त होय. 'द्विज' या शब्दांत प्रथम तीन वर्णांचा समावेश होतो, परंतु प्रकृत स्थलीं 'ब्राह्मण' या अर्थी योजिला आहे. या शब्दाचे तीन अर्थ आहेत:—"सुन्दरीवृत्तेन सोदाहरणा द्विजशब्दाऽर्थाः त्रयः 'द्विजराजशिरोमणेर्भिदां द्विजराजशालिनश्च यः ॥ कलयेन्मनसापि, पात्यतेऽन्तक-भृत्यैः खलु तद्विजावलिः ॥ १ ॥' इति कोशावतंसः ॥ म्हणजे द्विज (विप्र-ब्राह्मण) त्यांचा राजा चंद्र हा आहे शिरोमणि (शिरोभूषण) ज्याचें असा महादेव, आणि द्विज (अंडज-पक्षी) त्यांचा राजा गरुड हाच ध्वज (चिन्ह) त्यानें शाली शोभणारा असा महाविष्णु ह्या दोघांची भिदाभेद जो कोणी (वैष्णवादि) मनानें सुद्धां करितो, त्याची द्विज-(दंत-दांत) त्यांची आवलि (पंक्ति-बत्तीशी) अंतकयम त्याचे भृत्य(चाकर) ह्यांनीं खरोखर पाडली जाते. म्हणजे हरिहर हे परस्पर एकरूप आहेत, त्यांचा भेद मानूं नये, हें तात्पर्य." नामलिंगानुशासन—पृ० १०५.] ३. पुरुषसूक्तीं. ४. त्याचें भाषण. ५. तो ईश्वर जर विश्वाचा आत्मा आहे, तर ग्रंथ करण्यासही कारण तोच आहे, अन्य असण्याचा संभव नाहीं. वामनपंडिताच्या ठिकाणीं ईश्वराशीं भिन्नभाव नाहीं—असा भावार्थ. ६. मुकुंद. ७. सर्वांच्या बुद्धीस व्यापून असणारा. ८. चैतन्यरूप जो ईश्वर त्याच्या प्रतिबिंबानें (ईश्वररूपानें) सर्वांच्या बुद्धींत राहणारा. ९. भक्त—हृत्—गत=भक्ताच्या हृदयीं वास करणारा. १०. आत्मज्ञान. ११. हरण करी. १२. अद्वैतबोध; अनादि अशी अविद्या (अज्ञान), आत्मस्वरूपाची विस्मृति. १३. या श्रीगुरूंची हकीकत पंडितांनीं स्वकृत 'निगमसार' नामक ग्रंथाच्या पहिल्या अध्यायांत दिली आहे. (ओव्या—६-१३.) १४. करुणायुक्त अशा अल्पदृष्टीनें.

दावूनि पादकमळें हृ[1]दयाभिरामें सच्चित्सुखात्मक शरीर तयाचि ने[2]मिं. ॥ ४
ध्यानीं दिसे प[3]रमहंस मुनींद्रवेषें चित्तीं स्फु[4]रे ज[5]ड विशेषनिषेधशेषें, ।
तो ग्रंथ हे सकळही रचितो मुरारी, हे वामनाकृति उगीच निमित्तधारी. ॥५
मा[6]रूनि दावुनि मुखीं कुरुदुर्जनातें यु[7]द्धीं निमित्त करि मागुति अर्जुनातें, ।
हें 'कर्मतत्व'हि तसें रचिलें मुकुंदें दावूनि वामन मनीं च[8]रणारविंदें. ॥ ६
कर्[9]में मृषा सकळही परि [10]भोग देती देखोनि स[11]र्प लटिका भ[12]य कंप होती, ।
दृ[13]ग्भ्रांति जावुनि दिसे जरि र[14]ज्जु दृष्टी हे होय सर्वहि मृषा म[15]ग कर्म सृ[16]ष्टी. ॥७

---

१. हृदयाला आनंद देणाऱ्या २. सच्चिदानंद नांवानें. ३. परमहंस–तपाकरितां ज्यानें इंद्रियदमन केलें असा संन्यासी. कुटीचक, बहूदक, हंस आणि परमहंस असे भिक्षुजनाचे चार प्रकार आहेत. एकापेक्षां दुसरा, दुसऱ्यापेक्षां तिसरा श्रेष्ठ, असा यांच्या माहात्म्याचा अनुक्रम आहे. ['चतुर्विधा भिक्षवस्ते कुटीचकबहूदकौ । हंसः परमहंसश्च यो यः पश्चात स उत्तमः ॥.'] ४. निगमसार–अध्याय १ ओवी ४३ पहा–'अंतर्यामीं आम्हीच उरलों । निषेधिला क्षर भाग.' ५. जड आणि भेदरूप जें विश्व याचा निरास करून जो शेष राहिला त्यानें. क्षर भाग वेगळा केला असतां शेष राहणारें जें चैतन्यस्वरूप त्या रूपानें. ६. कौरव पूर्वींच मारलेले होते असें श्रीकृष्णानें विश्वरूपदर्शनसमयीं अर्जुनास आपलें मुख उघडून दाखविलें होतें. "दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसंनिभानि । दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ॥ २५ ॥ अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसंघैः । भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥ २६ ॥ वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति दंष्ट्राकरालानि भयानकानि । केचिद्विलग्ना दशनांतरेषु संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ॥ २७ ॥ यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवंति । तथा तवामी नरलोकवीरा विशंति वक्त्राण्यभिविज्वलंति ॥ २८ ॥" याचा भावार्थः–"हे देवांच्या देवा, हे जगतामध्यें भरून राहणाऱ्या, प्रलयकालच्या अग्नीसारखीं प्रदीप्त आणि भयंकर दाढांनीं विक्राळ, अशीं तुझीं मुखें पाहतांच, मला दिशा समजेनातशा झाल्या, मला सुख वाटत नाहीं, मजवर कृपा कर ॥२५॥ हे धृतराष्ट्राचे सर्व पुत्र आणि हे राजांचे समुदाय, आणि भीष्म, द्रोण, तसाच हा कर्ण, आणि आम्हांकडील मुख्य मुख्य योद्धे ॥ २६ ॥ हे, दाढांनीं विक्राळ अशा तुझ्या भयंकर मुखामध्यें त्वरेनें शिरत आहेत । कित्येक तुझ्या दातांच्या मध्यें सांपडले आहेत, आणि त्यांच्या मस्तकांचा तेणेंकरून चुराडा होऊन गेला आहे, असें दृष्टीस पडतें ॥२७॥ जसे नद्यांचे मोठमोठे प्रवाह समुद्राकडेसच धांव घेत असतात, तसे हे मृत्युलोकींचे वीर या तुझ्या सर्वतः प्रज्वलित मुखामध्यें धांवा घेत आहेत॥ २८ ॥" [भगवद्गीता–अध्याय ११ सुबोधचंद्रिका]. ७. 'युद्धीं निमित्त' असा अन्य पाठ. ८. पदकमळें. ९. मिथ्या, खोटीं, अद्ध, सत्य आणि जग मिथ्या यावरून कर्मेंही मिथ्याच–असा भाव. १०. प्रारब्धरूपानें मिळणारें कर्माचें फळ. ११. रज्जूचे ठिकाणीं सर्पाची भ्रांति होते ती. १२. 'भयभीत' असाही पाठ आहे. १३. दृक्–भ्रांति=नेत्रांची भ्रांति. १४. दोर. १५. ज्ञान झाल्यानंतर. १६. कर्मफलरूप सुखदुःखें.

[1]ब्रह्मात्मता नकळतां [2]कृत कर्म [3]साचें याकारणें [4]त्रिविध रूप असे तयाचें, ।
जें कर्म आणिक अकर्म विकर्म रूपें जीवांसि [5]बंद्ध करि होउनि पुण्य पापें. ॥८
तें [6]कर्म जें स्वविहितें करणें स्वशर्में जीं पातकें [7]अकरणें तितुकीं [8]अकर्में, ।
होतीं विकर्म निगमीं तितुकीं [10]निषिद्धें [11]हीं बाधती त्रिविधही सुखदुःखबंद्धें. ॥ ९
[12]सत्कर्म पुण्य परि [13]बंद्धकता न सोडी, [14]लोखंड पाप, [15]तरि पुण्य [16]सुवर्णबेडी ।
पुण्यांत पातक, सुखांतहि [17]दुःख अंतीं [18]दोन्ही अहो! त्यजियलीं करितांचि संतीं.॥

---

१. ब्रह्म–आत्मता=ब्रह्म आणि आत्मा एक आहे असें न कळतां. [नामसुधा–अ० ३ चरण २ श्लो० २७-२८ पहा. काव्यसंग्रहग्रंथमाला–वामनपंडितकृत स्फुटकाव्यें, भाग पहिला–पृ० २३४] २. प्राण्यानें केलेलें पापपुण्य. ३. खरें. प्राण्यानें केलेलें पापपुण्य सुखदुःखादिक भोगांस कारण होतें–असा भाव. ४. कर्म, अकर्म आणि विकर्म हीं कर्मांची तीन रूपें होत. कर्म–वेदविहित कर्म; अकर्म–अविहित कर्म; विकर्म–निषिद्ध कर्म. या तीन कर्मांच्या व्याख्या श्लो० ९ पाद १।२।३ यांत पहा. ५. 'बंध' असाही पाठ आहे. ६. जीं कर्मे आचरण्याविषयीं वेदाची आज्ञा आहे तीं आचरण करणें हें 'कर्म' होय. ७. न करण्यानें. (वेदांनी अवश्य सांगितलेलीं कर्में न करणें याला 'अकर्म' म्हणतात.) ८. "किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः । तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात ॥ १६ ॥ कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः । अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥१७॥ कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः । स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत ॥ १८ ॥" याचा भावार्थ:–"खरोखरीं कर्म म्हणजे काय, आणि अकर्म म्हणजे काय, याविषयीं विद्वान् देखील घोंधळांत पडले आहेत, म्हणून तुला कर्म काय तें सांगतों, तें जाणल्यानें तूं दुःखापासून सुटशील. ॥ १६ ॥ कर्मही जाणलें पाहिजे, विकर्म म्हणजे शास्त्रविरुद्ध कर्म कोणतें, हेंही जाणलें पाहिजे, आणि अकर्म म्हणजे कर्मापासून मुक्त राहणें तें कसें, हेंही जाणलें पाहिजे, कर्माचें ज्ञान फार गहन आहे. ॥ १७ ॥ स्वधर्मानें नेमलेलें जें कर्म तें अकर्म, म्हणजे तें करून न केल्यासारखें होय, त्यापासून कर्माचा दोष लागत नाहीं, आणि सामान्यलोकांच्या मतें, कांहीं न करणें हें अकर्म असें जरी आहे, तरी या अकर्मामध्येंही कर्म घडतें. हें जो जाणतो, तो सर्व मनुष्यांमध्यें बुद्धिमान्, तो सर्व कर्में आचरीत असतांही योगी होय ॥१८॥" [गीता अ० ४ पृ० ७४-७५ पहा–सुबोधचंद्रिका.] ९. वेदांनी. १०. निषेध केलेलीं, वर्जिलेलीं. ११. 'हें बांधती त्रिविधही सुखदुःखबंधें' असाही पाठ आहे. १२. सत्कर्माचें फल जरी पुण्य आहे तरी तें जीवाला बंधन करावयाला सोडीत नाहीं. पुण्य हें सुवर्णाच्या बेडीप्रमाणें आहे, म्हणून कर्मफलाचा त्याग करणें उचित होय. १३. बाधा, क्लेश, (बाधण्याचा, पीडा देण्याचा धर्म.) १४. पापाचें फळ हें लोखंडाच्या बेडीप्रमाणें आहे. १५. 'तसि' असा अन्यपाठ. १६. हा समास चिंतनीय आहे. १७. नामसुधा–अ० ३ चरण ३ श्लो० १३।१४।१५ पहा. [काव्यसंग्रहग्रंथमाला–वामनपंडितकृत स्फुटकाव्यें, भाग पहिला–पृ० २३८ पहा.] १८. पाप आणि पुण्य यांचीं फलें, यांच्या फलाची इच्छा.

कर्में करी[1] भगवदर्पणरूपधर्मीं[2] कर्मांत[3] तो कुशळ[4] देखतसे अकर्म[5], ।
कर्मेंच तीं नव्हति बद्धकता न जेव्हां नेदीच मृत्यु विष तें म्हणवे न तेव्हां.॥ ११
वेदोक्त[6] कर्म न करूनि अकर्म जोडी, तें तों अकर्म करि पातकरूप बेडी, ।
कर्मीं[7] अकर्मपण कर्मकता[8] अकर्मीं जाणूनि वर्तति अभिज्ञ[9] मुकुंदधर्मीं[10]. ॥ १२
गीतेमधें[11] प्रतिपदीं[12] जगदात्मदेवें[13] केला असा विशद[14] निर्णय वासुदेवें, ।
कृष्णार्पणें करि अकर्म[15] मुकुंदधर्में त्यांवेगळीं[16] सकल बंधनरूप[17] कर्में. ॥ १३
नित्यासही[18] फळ[19] असे पितृलोक वेदीं, स्वर्गादि[20] काम्यफलबंध[21] अनेक[22] भेदीं; ।

---

१. निष्काम बुद्धीनें कर्म करून तें कृष्णार्पण करावें अशा विधीनें. २. कर्में केलीं असतांही. ३. कर्मकर्ता. ४. कल्याण पावतो, क्लेश पावत नाहीं. ५. कर्म कृष्णार्पण केलें यामुळें कर्त्यास अकर्म घडलें, त्याचे योगानेंही. ६. वेदप्रतिपादित. ७. श्लो० ११ पूर्वार्धाप्रमाणें. ८. श्लो० १२ पूर्वार्धाप्रमाणें. ९. ज्ञाते, ज्ञानी. १०. भागवतधर्मी. "सर्वांत थोर नारायण । म्हणोनी या भावें स्मरोनी समर्पण । स्वकर्मांचें करणें हें प्रथम लक्षण । भागवत धर्मांचें. ॥१॥ हे भागवत धर्मपदवी । जनक रायास नव योगियांत कवी । श्रीमद्भागवतीं बोलिला बरवी । या श्लोकें करोनी. ॥ २ ॥ एकादशस्कंध श्लोक–'कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वानुसृतस्वभावात्। करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥' श्लोकार्थ–कवी म्हणे भागवतधर्म । राया पुसतोसी तरी सकळ कर्म । नारायणाकारणें समर्पावें हें वर्म । भागवत धर्मांचें. ॥ ३ ॥ काया वाचा मन इंद्रियें बुद्धी । ज्या ज्या करितां ज्या ज्या कर्मांची समृद्धी । अथवा अहंकारेंही कर्मसिद्धी । अनुसरला संस्कार त्यात्तव. ॥ ४ ॥ ऐशा ज्या ज्या करितो क्रिया । त्या त्या नारायणाकारणें जनकराया । अर्पण कराव्या नारायणदेवा । सर्वांत थोर ऐसें स्मरोनी. ॥ ५ ॥" [वामनपंडित–यथार्थदीपिका–अध्याय ९ ओव्या २६९-२७३.] ११. "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥४७॥ योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय । सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥४८॥" याचा भावार्थ–"कर्माच्याच ठायीं तुझा अधिकार, फलाच्या ठायीं कदापि नाहीं । फलाच्या हेतूनें कर्म करणारा असा तूं होऊं नको, पण कर्म न करण्याचीही आवड धरूं नको । ४७ । धनंजया, योगयुक्त होऊन, मीपणा सोडून कर्मांचें आचरण कर । सिद्धि आणि असिद्धि या दोहोंच्या ठायीं समबुद्धि ठेव । या समबुद्धीलाच योग म्हणतात । ४८ ।" [गीता अ०२ पृ०३९-४० सुबोधचंद्रिका.] १२. प्रत्येक पदांत, जागजागीं, पुष्कळ ठिकाणीं. १३. जगत्–आत्म–देव. जग आहे आत्मा ज्याचा अशा परमेश्वरानें. १४. स्वच्छ, स्पष्ट. १५. 'अकाम' असा अन्य पाठ. १६. कृष्णार्पण न केलेलीं १७. सुवर्णाच्या बेडीप्रमाणें. १८. नित्य करावयाचें जें (स्नानादिकर्म) त्यालाही. १९. नित्य करावयाचीं जीं स्नानसंध्यादिक कर्में त्यांस पितृलोकप्राप्ति हें फळ वेदांत सांगितलें आहे. २०. पुण्यकर्म केलें तरी मुक्ति मिळत नाहीं, आणि स्वर्गादि प्राप्ति होत नाहीं. २१. जीं नित्य कर्में नव्हत तीं 'काम्य' कर्में होत. या काम्य कर्मांनीं स्वर्गप्राप्ति पुत्रप्राप्ति इत्यादि फळें मिळतात. २२. जसे काम्य कर्मांत अनेक भेद आहेत तसे फलांतही आहेत, फळें अनेक प्रकारचीं आहेत.

निष्काम[1] आणिक सकाम[2] समान बेडी वस्तु[3] स्वयें स्वगुण[4] तो सहसा न सोडी.॥१४
भक्षूनियां[5] विष जसा मरणा न इच्छी कर्मे करूनि फळ कर्मठही न वांच्छी, ।
याकारणें[6] नव्हति बद्धक तींच कर्में जीं ईश्वरार्पण अकाम करी स्वधर्में. ॥ १५
वैद्याचिया करिं दिल्ह्या बचनाग होतो प्राणापहारगुण[7] टाकुनि दिव्य होतो, ।
कर्में स्वयें सहज जीं भवबंधरूपें[10] कृष्णार्पणें फळति मोक्षफळ स्वरूपें. ॥ १६
मातीमधें घट दिसे न नसे विचारें, ब्रह्मीं[11] दिसे सकळ कर्म अशाप्रकारें ।
मातीमधें सहज अर्पित कुंभ जैसा ब्रह्मीं अशेषजनकर्मकलाप[12] तैसा. ॥ १७
घे मृत्तिका[13] घटमिषें[14] दधिदुग्धपाणी बुद्धींद्रियें करुनि कर्महि चक्रपाणी ।
हें सर्व अर्पित अनर्पित[15] तो न कांहीं, ऐसें तथापिहि तदर्पणसिद्धि[16] नाहीं. ॥१८
सर्वस्व[17] ने नृप तरी फळ त्यास नेदी तोचि प्रसन्न जरि, अर्पुनि तेंचि[18] वंदी ।
याकारणें वदतसे स्मृति[19] याच रीती कर्में[20] अशीं न करितां भवबंध[21] होती. ॥१९
कृष्णार्पणेंचि करणें म्हणऊनि 'यस्य स्मृत्या' असी स्मृति करी त्रिजगांत लौस्य[22], ।
कर्म स्मृती[23] करुनियां जरि सांग[24] होतें वंदोनियां तरि समर्पिति[25] कर्म त्यांतें[26]. ॥२०
ज्याच्या स्मृतीकरुनि आणिक नाम घेतां दानक्रियातप मखादिकही[27] करीतां, ।
जें न्यून तें सकळही परिपूर्ण होतें, वंदा म्हणे स्मृति समर्पुनि कर्म त्यांतें. ॥२१
याकारणें सकळ कर्म करोनि अंतीं श्लोकद्वयें विनविला हरि सर्व संतीं[28], ।
हे श्लोक दोन सकळांसहि पाठ लोकीं जेणें अलिप्तजन[29] यद्यपि कर्मपंकीं[30]. ॥२२

---

१. फळाची इच्छा धरून (सकाम) अथवा न धरून (निष्काम) जरी कर्म केलें तरी त्याचें फल प्राप्त व्हावयाचेंच व कर्म न केलें तर अकर्म होतें. सारांश कर्म हें व्हावयाचेंच. यास्तव तें निष्कामबुद्धीनें कृष्णार्पण केलें पाहिजे. २. फळाच्या आशेनें केलेलें. ३. कर्म हीच वस्तु. ४. कर्मानुरूप फळ मिळावयाचें हा गुण. ५. विष भक्षण करणाराला इच्छा नसतांही मरण येतें, तसें निष्काम कर्म करणाराला तो वांछित नसतांही कर्मफळ मिळतें. ६. या निष्काम कर्मकर्त्यांस. ७. प्राण हरण करण्याचा मारक गुण टाकून औषधि होतो. ८. 'सेव्य' असाही पाठ आहे. ९. उपजत बंधनकारक. १०. जन्ममृत्युरूप संसार पाशांत घालणारीं. ११. ईश्वराचे ठिकाणीं. १२. सर्व जीवांच्या कर्मांचा समूह. (कलाप—समुदाय.) १३. मृत्तिका दधिदुग्धपाणी घटमिषें घे—असा अन्वय. १४. घटाच्या वेषानें. १५. कृष्णार्पण न केलेलें. १६. कृष्णार्पण कर्म केल्यानें जें फळ मिळतें तें. १७. सकल धन. १८. फळ. १९. मन्वादिक मुनिप्रणीत ग्रंथ. २०. कृष्णार्पित. २१. जन्ममृत्युप्रदः मोक्षाला व्यत्यय आणणारीं. २२. नूल. या शब्दानें स्मृतीचा उत्कर्ष आणि प्रसिद्धपणा दाखविला. २३. विष्णुस्मरणानें. २४. यथासांग, परिपूर्ण. २५. अर्पण करतात. २६. कृष्णातें, सगुण ब्रह्म जो त्यातें. २७. याग. २८. साधुजनांनीं. २९. लेपरहित, कर्मफलभोगास बद्ध नाहींत असे. ३०. कर्मरूप चिखलांत.

स्मृतिश्लोक.

यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपःपूजाक्रियादिषु ।
न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम्. ॥
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर! ।
यत्पूजितं मया देव! परिपूर्णं तदस्तु मे. ॥

ज्याच्या स्मृतीकरुनि आणि तसेंच नामें जें न्यून तेंचि परिपूर्णपणासि नेमें ।
पावे, तया करिन वंदन अच्युतातें ऐसें रहस्य पहिल्यांत[1] निरूपिजेतें. ॥ २३
हें सद्य वंदन करोनि तया अनंता तत्प्रार्थना दुसरिया[2] स्मृतिमाजि आतां, ।
कीं अंगहीनहि[3] जनार्दन! देवदेवा! मत्कर्म तें सकळ हो तव पादसेवा. ॥ २४
जें मंत्रहीन हरि! हीनहि जें क्रियेनें, त्वद्भक्ति मुक्तिपथ केवळ तद्विहीनें, ।
म्यां जें असे रिति असांगहि कर्म केलें तें पूर्ण हो म्हणउनी तुज अर्पियेलें. ॥२५
स्मृत्यर्थ हा श्रुतिहि बोलति याचि उक्ती, 'यज्ञेन यज्ञमयजंत'[4] म्हणोन सूक्तीं[5] ।
यज्ञें करोनि यजिला हरि यज्ञमूर्ती तो मुख्य धर्म वदति श्रुति[6] विष्णुकीर्ती[7]. २६
गीतेंत[8] तो विशद[9] हेंचि वदे मुरारी[10] श्रीव्यास हेचि इतिहास[11]पुराणकारी[12], ।
कृष्णार्पणाविण कदापिहि मोक्ष[13] नाहीं, ते निर्गुणार्पण नव्हे सगुणीच तेही.२७
नाशील रज्जुहि[14] कसा लटिक्या[15] भुजंगा? सांगा कसा अगुण[16] न[illegible] कर्मसंगा[17]?

---

१. पहिल्या श्लोकांत. ज्याच्या स्मरणानें आणि नामोच्चारानें तप, पूजा इत्यादि कर्मांतील न्यून पूर्णतेस प्राप्त होतें त्या अच्युताला मी आतां वंदन करितों—असा प्रथम श्लोकाचा भावार्थ आहे. २. दुसऱ्या श्लोकांत. ३. यथासांग नव्हे असें—माझें कर्म. ४. यज्ञं—अयजंत. ५. पुरुषसूक्त—ऋचा १६ पहा. ['यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचन्ते यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥'] ६. वेद. ७. विष्णुस्तुतीस प्रवृत्त झालेल्या (श्रुति). ८. गीता—अध्याय २ श्लोक ४७-४८ व अध्याय ३ श्लोक ९ पहा. ९. स्पष्ट. १०. कृष्ण. ११. महाभारतालाच इतिहास म्हणतात. ['धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् । पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते. ॥'] १२. पुराणग्रंथांचा कर्ता. १३. कर्मफलापासून सुटका. १४. ज्या रज्जूचे ठिकाणीं सर्पाची भ्रांति झाली ती रज्जु. १५. खोट्या सर्पाला, सर्पभ्रांतीला. १६. निर्गुण ब्रह्म. १७. कर्म सगुण परमेश्वराच्या (मूर्तीच्या) ठिकाणीं अर्पण केलें पाहिजे. कर्म अर्पण करावयाचें तें निर्गुण ब्रह्मास करावयाचें नसून, सगुण ब्रह्माचे ठिकाणीं करावयाचें आहे. याचें कारण श्लोक २८-२९ यांत दर्शविलें आहे. याविषयीं पंडितांनीं विस्तृत प्रतिपादन आपल्या 'यथार्थदीपिके'त केलें आहे.

विद्ये[1]करोनिच मरे[2]ल अहो! अविद्या[3], तें ब्रह्मकर्म[4] हरि[5] जेथं[6] असेल विद्या[7]. ॥ २८
ब्रह्मार्पण[8] स्मृति वदे सगुणीच तेंही ब्रह्म द्विधा सगुण निर्गुण भेद नाहीं, ।
कर्मास नाश सगुणाविण होय जेव्हां, हें निर्गुणार्पण अबाधित होय तेव्हां. ॥ २९
ऐसे न निर्गुण न देवगणांत कोणी, कर्मास पात्र हरि एक रथांगपाणी[9], ।
त्यालागिंही त्यजुनि काम[10] भजेल जेव्हां, हे कर्मबंध तुटती मग सर्व तेव्हां. ॥ ३०
साधारणासि[11] विधि[12] हा जरि तीव्र भक्ती[13] प्रेमें भजोनि करि[14] काम तथापि[15] मुक्ती,
नासोनि रोगभव वैद्य[16] अपथ्य देतो अज्ञान नासुनि फलप्रद विष्णु होतो. ॥ ३१
उत्तानपादसुत[17] राज्यपदानिमित्तें सप्रेम तीव्र भजतां दृढ एकचित्तें, ।

---

१. विद्येच्या द्वारा, ज्ञानानेंच. २. नाश पावेल. ३. अज्ञान. ४. सगुण ब्रह्म. ५. कर्मांचा नाश करतें. ६. ज्या ब्रह्माचे ठिकाणीं. ७. ज्ञान. 'गीतार्णवसुधा' प्रकरणांत ईश्वराचे सहा गुण सांगितले आहेत. त्यांत ज्ञान हा एक गुण आहे. [गीतार्णवसुधा—श्लो० १-१५. पृ० ७१-७३.] सगुण ब्रह्माचे ठिकाणीं सहा गुण संभवतात, निर्गुण ब्रह्माचे ठिकाणीं संभवत नाहींत. विद्या (ज्ञान) हा गुण निर्गुण ब्रह्माचा नाहीं व निर्गुण ब्रह्माचे उपासनेनें अज्ञानाचा नाश होण्याचा संभव नाहीं. कर्मार्पण जें करावयाचें तें सगुण ब्रह्माचे ठिकाणीं केलें पाहिजे. ८. ब्रह्मार्पण असा शब्द स्मृतिग्रंथांत योजिला आहे त्यावरून निर्गुणाचा बोध होतो अशी शंका येते. त्या शंकेचें या श्लोकांत निवारण केलें आहे. ९. चक्रपाणि. (विष्णु.) 'शतांगपाणी' असाही पाठ आहे. १०. इच्छा. ११. ज्याची तीव्र भक्ति नाहीं त्याला. १२. मार्ग, विधान. १३. काम्यफलाची इच्छा धरून तीव्र भक्ति करणाराला मुक्ति प्राप्त होते असें उदाहरणद्वारा दाखविलें आहे. १४. कर्मफलाची इच्छा धरतो. ध्रुवानें राज्यलाभासाठीं तपश्चर्या केली असतां त्यास मोक्ष प्राप्त झाला. तें त्याचें कर्म काम्य होतें, तरी त्यास तें मोक्षप्रद कसें झालें या शंकेचें निवारण श्लोक ३१-३४ यांत केलें आहे. १५. सकाम भक्ति करूनही. १६. वैद्याच्या ठिकाणीं तीव्र भक्ति आहे ज्याची अशा रोग्यानें अपथ्य (अहितकर) वस्तु मागितली असतां रोगाचा नाश करून ती वस्तुही रोग्यास तो वैद्य देतो. रोग=अज्ञान. भववैद्य=संसारनाश करणारा ईश्वर. १७. ध्रुव. याची कथा भागवतांत आहे. ध्रुव हा उत्तानपाद राजास त्याच्या सुनीति नामक भार्येपासून झालेला पुत्र. या राजास सुनीति व सुरुचि अशा दोन भार्या होत्या, त्यांत सुनीति ही नावडती होती, त्यामुळें तिचा पुत्र ध्रुव हाही नावडता होता. एकदां याचा सावत्र भाऊ राजाच्या मांडीवर बसला असतां हाही बसण्यास गेला, पण हें सुरुचीला आवडलें नाहीं व तिनें त्याचा धिक्कार केला. तेव्हां हा रडत रडत आपल्या मातेकडे (सुनीतीकडे) गेला व झालेली गोष्ट तिला सांगितली, तेव्हां तिलाही फार वाईट वाटून ती म्हणाली, 'परमेश्वराची आराधना केल्याशिवाय हें ऐश्वर्य कोठून प्राप्त होणार?' तेव्हां ह्याला पश्चात्ताप होऊन लागलाच अरण्यांत जाऊं लागला, इतक्यांत मार्गामध्यें ध्रुवाला नारद भेटले. त्यांनीं 'तूं लहान [illegible], परत जा' असें सांगितलें, पण ह्यानें ऐकिलें नाहीं. नारदमुनीस याची दया येऊन त्यांनी यास एक मंत्र व भगवद्ध्यान

अज्ञान नामुनि पंद ध्रुव देउनिही नेला क्षितीहुनि पदाप्रति याचि देहीं. ॥ ३२
कामें करूनि तरल्या [4]व्रजगोपनारी ती[5]व्रस्मृती करुनि दानव[6]दै[7]त्यवैरी ।
भक्तांस हस्तगत मुक्तिहि आवडेना दास्याविणें इतर रीति तयां घडेना. ॥ ३३
देवोनि योगें मग भोगहि दे स्वभक्तां, ऐसें तथापि न[10]लगे फळ[11] हें विरक्तां; ।
सा[12]मान्य जे जन तयांस न तीव्र भक्ती ते काम्य इच्छिति तईं न घडेल मुक्ती. ॥
साधारणें त्यजुनि काम सदा मुकुंदीं कर्मार्पणें करुनियां च[13]रणारविंदीं ।
संपादणें परम दुर्लभ दास्य त्याचें यीं[14] वेगळें स्वहित आणिक त्यांसि कैंचें ?॥३६
झाला जरी जित[15]चि मुक्त न दास्य सोडी मुक्तीहुनी अधिक हे हरिदास्यगोडी ।
'आम्हींचि विष्णु भजणें कवणासि आतां?' हा ज्ञानगर्व उपजे न कदापि संतां.॥
संत स्व[16]बुद्धिमनइंद्रियकर्मधंदा नि[17]र्व्याज सेविति समर्पुनियां मुकुंदा ।
मुक्तांसही अधिक हे हरिदास्यगोडी दास्यें करोनिच तुटे गु[18]णकर्मबेडी. ॥ ३७

यांचा उपदेश केला. अल्पकाळांत यास भगवंतांनीं भेट दिली म्हणून याच्या मनांत स्तुति करावी असें वाटलें; पण सामर्थ्य नसल्यामुळें हस्त जोडून उभा राहिला. हें जाणून परमेश्वरानें त्यास सामर्थ्य दिलें, व यानें स्तुति केली. तीवरून परमेश्वर संतुष्ट होऊन 'तूं छत्तीस सहस्र वर्षें पित्याच्या मागें राज्य कर व या स्थानीं परत ये' असा वर दिला. हें सर्व वर्तमान उत्तानपाद राजास कळलें, व तो समारंभपूर्वक सामोरा येऊन ध्रुवास परत नगरास घेऊन गेला, व त्याला राज्याभिषेक करून आपण अरण्यगमन केलें—अशी कथा आहे. (भागवत—स्कंध ४ अ० ८-९.)

१. स्थान. २. स्थिर, अचल. ३. ध्रुवपदाला. ४. गोकुळांतील गौळ्यांच्या स्त्रिया. ५. द्वेषानें त्यांची स्मृति वारंवार होऊन. ६. दनूची संतति. ७. दितीची संतति. 'दानवदैत्य मारी' असा अन्य पाठ. ८. भक्तांस मुक्ति नको असतां (तिजविषयीं त्यांचे यत्न चाललेले नसतां) तीव्र भक्तीमुळें ईश्वर त्यांस मुक्ति देतो. ९. मुक्ति. १०. नको असतें. ११. भोग आणि योग. १२. तीव्र भक्ति ज्यांस नाहीं अशा सामान्य जनांनीं काम्य कर्में केलें तर तें त्यांस मुक्तिप्रद होत नाहीं. ध्रुवादिकांप्रमाणें तीव्र भक्ति ज्यांस आहे त्यांनीं काम्य कर्म केलें तरी तें त्यांस मुक्तिप्रद होतें. १३. चरणकमलीं. १४. 'या वेगळें इतर साधन त्यासि कैंचें?' असाही पाठ आहे. १५. जीवन्मुक्त. १६. बुद्धि, मन व इंद्रियें यांचा व्यापार. १७. निष्काम, अहेतुक. १८. सत्व रज आणि तम या तीन गुणांचा पाश. कर्म हें त्रिगुणात्मक आहे. 'ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप । कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥४१॥ शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥४२॥ शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् । दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥४३॥ कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् । परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति

नेणोनिही[1] जरि समर्पिल सर्व कर्मे, जाणेल[2] तत्व[3] परमेश्वरदास्यधर्मे[4]; ।
तो दास जो सकळ अर्पितसे मुकुंदा देहेंद्रियादिकृत नित्य[5] निमित्त धंदा.॥३८
जो स्वामिकार्यचि सदा करि तोचि भृत्य[6], स्वामीस तों किमपिही न दिसे अगत्य[7];
याकारणें स्वकृत अर्पिल सर्व त्याला निष्कामनें[8] करुनि तो 'हरिदास'[9] बोला. ॥
वेदोक्त[10] आचरण जें परमेश्वराज्ञा यांच्या[11] हितार्थचि निजार्थ[12] न[13] ते अनुज्ञा[14], ।
तेही समर्पुनि समस्तहि देहयात्रा[15] दास्यार्थ अर्पिति भले शतपत्रनेत्रा[16]. ॥ ४०
वेदोक्त अर्पुनि न अर्पिल देहधंदा, तो तों नव्हे परम आवडता मुकुंदा; ।
कांहीं स्वकार्यहि[17] करी प्रभुकार्य कांहीं, स्वामीस तों अतिशयें प्रिय होत नाहीं.॥
जो स्वामिकार्यपर[18] तो स्वशरीररक्षा[19] त्यांकारणेंचि[20] करितोच तया अपेक्षा[21]; ।
याकारणें विहित आणिक देहयात्रा दास्यार्थ अर्पिति भले अरविंदनेत्रा[22]. ॥ ४२

तच्छृणु ॥४५॥' [भगवद्गीता—अध्याय १८.] यांचा भावार्थ—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र—म्हणजे ब्रह्मोपदेशक, राज्यकर्ते, धनोत्पादक आणि परिचारक—यांचे जे स्वभावसिद्ध गुण, त्यांना अनुसरून त्यांचीं कर्मे निरनिराळीं आहेत. ।४१। शम म्हणजे चित्ताचें नियमन, दम म्हणजे बाह्य इंद्रियांचें नियमन, तप, शुचिर्भूतपणा, क्षमा, सरळपणा, शास्त्रज्ञान, अनुभवज्ञान, आणि परलोकाविषयीं श्रद्धा, हें ब्रह्मोपदेशकाचें स्वभावसिद्ध कर्म होय. ।४२। पराक्रम, धाडस, धैर्य, दक्षता, युद्धाला तोंड देणें, औदार्य, आणि सामर्थ्य, हें राज्यकर्त्यांचें स्वभावसिद्ध कर्म होय । ४३ । कृषि म्हणजे शेती, गोरक्ष्य म्हणजे गुरें पाळणें, आणि वाणिज्य म्हणजे क्रयविक्रय, हें धनोत्पादकाचें स्वभावसिद्ध कर्म होय । आणि परिचर्या म्हणजे सेवा करणें, हें परिचारकाचें म्हणजे चाकराचें स्वभावसिद्ध कर्म होय । ४४ । आपापल्या कर्माच्या ठायीं अभिरुचि ठेवून जो मनुष्य वागतो, त्याला उत्तम सिद्धि प्राप्त होते । आपापल्या कर्मामध्यें अभिरुचि ठेवून वागणाराला कशी सिद्धि प्राप्त होते, ती ऐक । ४५ । (सुबोधचंद्रिका.)

१. ब्रह्मस्वरूप न जाणतां ही, ईश्वराचे ठिकाणीं आत्मत्वभाव न जाणतांही. २. ब्रह्मस्तुति—चरण १ श्लो० ६० पहा. (काव्यसंग्रहग्रंथमाला—वामनपंडितकृत काव्यें—भाग १ पृष्ठ ३३४पहा.) ३. सत्य, जीवात्मा आणि परमात्मा यांचा अभेद. (नामसुधा—अध्याय ३ चरण २ श्लोक २७२८ पहा. काव्यसंग्रहग्रंथमाला—वामनपंडितकृत काव्यें—भाग १ पृ० २३४.) ४. ईश्वरभक्तीच्या योगानें. ५. कर्मे दोन प्रकारचीं आहेत, नित्य आणि नैमित्तिक. (नित्यनिमित्त हें 'धंदा' याचें विशेषण.) ६. सेवक. ७. जरूर. ८. निष्काम बुद्धीनें. ९. हरिभक्त. १०. वेदप्रतिपादित, वेदांनीं सांगितलेले. ११. आचरणाऱ्यांच्या. १२. परमेश्वरासाठीं. १३. 'नसे' असाही पाठ आढळतो. १४. आज्ञा, हुकूम. १५. देहाचा व्यापार. १६. कमलनेत्रा (भगवंताला). [शतपत्र=कमल. ज्याला शत (शंभर) पत्रें (पानें) आहेत तें=कमल.] १७. थोडें आपलें हित करणारा आणि थोडें स्वामिहित करणारा सेवक स्वामीला विशेष प्रिय होत नाहीं. १८. स्वामिकार्यदक्ष. १९. स्वदेहाचें धारण. २०. स्वामिकार्यासाठीं. २१. स्वामिकार्याचीच त्या सेवकाला अपेक्षा (इच्छा, आवड) असते. २२. कमलनेत्रा.

वेदोक्त कर्म निज आणिकही स्वधंदा अर्पील धन्य जइंपासुनियां मुकुंदा, ।
होओनि शुद्ध तइंपासुनि मोक्षमार्गा लागे [1]कृतार्थ न [2]मनी [3]स्वमनीं [4]त्रिवर्गा. ॥ ४३
जो ईश्वरार्पण करी निजसेवकर्मे, संतुष्ट होय हरि त्यावरि [5]दास्यधर्में; ।
होऊनियां प्रगट त्यासि गुरुस्वरूपें [6]ज्ञानानळें सकळ जाळिल पुण्यपापें. ॥ ४४
ज्ञानानळें करुनि [7]संचित दग्ध होतें, तेव्हां [8]अकर्तृपण तें [9]क्रियमाण होतें, ।
[10]प्रारब्ध मात्र उरतें, [11]सरतें [12]स्वभोगें तें नासल्या उपरि मुक्तिच भक्तियोगें. ॥ ४५
[13]आत्मा कळे, तरि कळे प्रियता मुकुंदीं, श्रीवासुदेवमय विश्व समस्त वंदी; ।
[14]निर्व्याज भक्ति समजोनि [15]अनन्ययोगें प्रारब्ध सारित असे सुखदु:खभोगें. ॥४६
जो वासनारहित पूर्विल कर्म भोगी, तो भक्त तो [16]जितचि मुक्त [17]परात्मयोगी; ।
[18]दग्धांबरीं दिसति तंतु जळोनि जैसे भोगार्थ हे [19]त्रिगुण [20]लिंगतनूंत तैसे. ॥ ४७
[21]भोगांसि योग्य परि [22]मोडें न तंडुलातें, ऐसेंचि मुक्तजनलिंगशरीर होतें; ।
जो वासना त्यजुनि वर्तवि इंद्रियांसी प्रारब्ध [23]भोगुनि नव्हे [24]क्रियमाण त्यासी. ४८
[25]कायामनें करुनि आणिक इंद्रियेंही कर्में करी पुरुष तीं **'क्रियमाण'** देहीं; ।
तो देह जोंवरि पडे क्रियमाण तों तें त्यानंतरें वदति **'संचित कर्म'** त्यातें. ४९
ज्या देहिंचें [26]सुकृत दुष्कृत त्याचि देहीं, नासे परस्पर बळें मग नाश नाहीं; ।
याकारणें म्हणति 'संचित कर्म' त्याला, ज्ञानानळाविण न नाश कधीं जयाला. ५०
त्या संचितांतुनिहि कर्मफलप्रदाता प्रारब्ध भोग निवडोनि करी [27]विधाता; ।

---

१. कृतार्थ मानीत नाहीं. २. मानी. ३. आपल्या हृदयांत. ४. धर्म अर्थ आणि काम या तिघांला. ५. त्याच्या सेवागुणानें. ६. ज्ञानाग्नीनें. ७. पुढें श्लोक ४९-५० पहा. ८. कर्म करणाराकडे कर्तृत्व नाहीं असें. ९. पुढें श्लोक ४९ पहा. ह्या देहांत जें कर्म करतो त्यास क्रियमाण कर्म म्हणावयाचें आणि हें कर्म पुढील जन्मीं संचित (कर्म) होतें. १०. पुढें श्लोक ५१ पहा. ११. संपतें. १२. भोगिल्यानंतर. प्रारब्ध भोगिल्यावांचून त्यास नाश नाहीं. १३. आपला व ईश्वराचा आत्मा एक आहे असें कळल्यावर त्याठिकाणीं साहजिक प्रीति जडते, कारण आत्मा हा सर्वांसच आवडता आहे. [नामसुधा–अ० ३ चरण २ श्लोक १७-२८ पहा. काव्यसंग्रहग्रंथमाला–वामनपंडितकृत काव्यें–भाग पहिला–पृष्ठ २३३ पहा.] १४. अहेतुक, निष्काम. १५. अभेद बुद्धीनें. १६. जीवन्मुक्त. १७. परमात्मा आणि जीवात्मा यांचे एकत्वाचा अनुभव ज्याला आला तो. १८. जळालेल्या वस्त्रांत. १९. सत्वरजोतमोगुण. २०. लिंगशरीरांत, सूक्ष्म देहांत. [तत्वमाला–श्लोक १३ पहा. पंच भूतांचे पांच गुण, मन आणि दश इंद्रियें मिळून सोळांचा हा लिंगदेह बनतो.]. २१. उपभोगास, खाण्याला. २२. कोंब. २३. भोगीत असतांही. २४. यानी व्याख्या ४९ व्या श्लोकांत केली आहे. २५. शरीर, मन व इंद्रियें यांहीं करून मनुष्य यावज्जीव जीं कर्में करतो त्यांस 'क्रियमाण' कर्में म्हणतात. पण देहपतन झाल्यावर त्यांस 'संचित' कर्में म्हणतात. २६. पुण्य व पाप. २७. निर्माणकर्ता, ब्रह्मदेव.

तो भोगही समयिंच्या समयींच होतो, त्या त्या स्थलाप्रतिहि ओढुनि तोचि नेतो.॥
यत्नेंविणें सहज जें सुख होय त्यासी, आयुष्य वेंचुनि बुडे जन हा प्रयासीं, ।
याकारणें [1]भगवदर्पण सर्व कर्में [2]जाणोनि मुज्ञ करिती [3]हरिदास्यधर्में. ॥ ९२
दुःखें जसीं सुख तसें निजपूर्वकर्में त्यालागिं यत्न करिती नकळोनि वर्मे; ।
वेदांतसिंधुजठरीं परमार्थ रत्नें यत्नेंचि [4]लभ्य करिती न [5]तयासि [6]यत्नें. ॥ ९३
हें [7]उत्तरप्रकरणीं जगदात्मबंधु बोलेल [8]वामनमुखें [9]करुणैकसिंधु; ।
तें 'यत्नतत्व' [10]कळल्यावरि बाह्य धंदा सांडोनि सेविति [11]मुकुंदपदारविंदा. ॥ ९४
अध्याय हा प्रथम जो '[12]फळतत्व'नामा [13]कामात्मकासि फळबंध तसा अकामा; ।
याकारणें [14]स्वनिगमोदित आणि [15]धंदों अर्पूनि वामन मनें भजतो मुकुंदा. ॥ ९५

अध्याय दुसरा.

यत्नतत्व.

(श्लोक.)

यत्नाविणें म्हणति होइल सौख्य कैसें? यत्नाविणेंचि सुख बोलति [16]एक ऐसें? ।
हें तत्वता नकळतां [17]परमार्थ कैंचा? [18]एकांत निश्चय घडेल कसा मनाचा? ॥ १
यत्नाविणें फळ कदापिहि सांपडेना, यत्नेंकरूनिहि अहो! फळ हें घडेना; ।
[19]गूढार्थ हा हृदयिं तोंवरि ऊघडेना हें 'कर्मतत्व' निजदृष्टिस जों पडेना. ॥ २
बीजाविणें फळ कदापि नये [20]द्रुमाला, तें बीज पूर्विल जयास्तव वृक्ष झाला; ।
बीजें नवीं नव्हति साधन या फळासी, तैसा [21]अलीकडिल यत्न वृथा प्रयासीं. ॥ ३
हा देहवृक्ष निजपूर्विलकर्मबीजें त्याचीण साधन सुखादिफळा न दूजें, ।

---

१. भगवदर्पण. २. पूर्वार्धांत वर्णिलेल्या गोष्टीचा बोध झाल्यामुळें. ३. भागवत धर्मास अनुसरून. ४. मिळतात. ५. परमार्थप्राप्तीस. ६. यत्नेंकरून. ७. 'यत्नतत्वा'मध्यें पुढच्या अध्यायांत. ८. वामनपंडितांच्या मुखानें. ९. दयासागर (भगवान् कृष्ण). १०. 'हें 'यत्नतत्व' कळतां मग बाह्यधंदा' असाही पाठ आहे. ११. विष्णुचरणकमलाला. १२. 'फलतत्व' हें आहे नाम (संज्ञा) ज्याचें तो (अध्याय). १३. जो कामात्मक (सकाम कर्में करणारा) आणि अकाम (निष्काम कर्में करणारा) आहे त्या दोघांसही फलबंध (फलाचें बंधन) आहे म्हणून निगमोदित (वेदविहित) कर्में आणि नित्यकर्में ईश्वरास अर्पण करतों. १४. स्वशाखापठित वैदिक कर्में. १५. नित्यनैमित्तिक कर्में. १६. येथें 'एक' याचा अर्थ 'कित्येक मनुष्य' असा आहे. १७. मोक्षलाभ. १८. एकच. १९. 'गुह्यार्थ' असाही पाठ आहे. २०. वृक्षाला. २१. या जन्मांतील.

[1]बीजें नवीं तरु फळा न निमित्त जैसीं [2]कर्में नवीं नव्हति कारण [3]या फळासी. ॥ ४
बीजें नवीं [4]नव तरू [5]सृजितील जेव्हां येती फळें मग तरूसि तयासि तेव्हां ।
बीजांतुनी न उपजे तरु, तों [6]तयाला येती फळें तरिच [7]सार्थक [8]यत्न बोला. ॥ ५
हे यत्न तों सकळही [9]क्रियमाण होती होऊनि संचित शरीर तरू [10]करीती, ।
दुःखें सुखें तरुसि त्या फळरूप येती हे यत्न या तनुतरूस फळें न देती. ॥ ६
पूर्वील यत्न फळदायक या शरीरीं हे [11]यत्न होतिल [12]पुढें सुखदुःखकारी, ।
याकारणें सकल टाकुनि लोकवंदा चित्तीं धरा दृढ मुकुंदपदारविंदा. ॥ ७
कोटी [13]अनेकविध यत्न वृथाचि गेले, यत्नाविणेंचि कितिएक कृतार्थ झाले; ।
दुःखें सुखें द्विविध हो फल पूर्वकर्में यत्नांसि 'यत्न' म्हणती नकळोनि वर्में. ॥ ८
[14]यत्नें श्रमें करुनि दुःखसमूह होती ते पूर्वपातकमुळेंचि फळासि येती; ।
[15]यत्नेंकरूनि अथवा सहजेंचि झालीं तें तों सुखें सुकृत तींचि फळासि आलीं. ॥ ९
[16]पापें प्रयत्न घडतां [17]सुकृतें सुखातें पावे प्रयत्न [18]सुखरूप [19]गमे तयातें, ।
जो पुण्यहीन करि यत्न, सुखा न भेटे, त्याला प्रयत्न अवघा अतिदुःख वाटे. १०
[20]दैवी प्रयत्न जन एक करूनि कांहीं विद्या, कळा, सुत, धनादिक याचि देहीं ।

---

१. नव्या बीजापासून जसा वृक्ष अथवा फळ येत नाहीं, जुनेंच बीज पाहिजे, तसेंच या देहरूप वृक्षाला सुखदुःखरूप फळें येण्यास कारण जुनें बीज (पूर्वजन्मींचें कर्म) होय. २. या जन्मीं केलेलीं. ३. या जन्मीं प्राप्त होणाऱ्या सुखदुःखात्मक फळांस. ४. नूतन. ५. उत्पन्न करतील. ६. बीजाला. ७. या जन्मीं फळ देणारा. ८. कर्मतत्त्व—अध्याय १ श्लो० ४९ पद्य. ९. हे यत्न क्रियमाण होतात. एक देह असतांना केलेले प्रयत्न संचित होऊन त्या देहाचें पतन झाल्यावर पुनः देहरूप शरीर उत्पन्न करतात. १०. 'वरिती' असाही पाठ आहे. ११. या जन्मीं केलेले यत्न. १२. पुढच्या जन्मीं. १३. अनेक प्रकारचे कोट्यवधि यत्न अनेक वेळां केले तरी ते सर्व फुकट जातात आणि अनेक वेळां यत्न केल्यावांचूनही कार्य होतें, याचें कारण पूर्वकर्म होय. पण हें तत्त्व (वर्म) नीटपणें न समजतां लोक या देहीं केलेल्या कर्मांस 'यत्न' म्हणतात. १४. सुखासाठीं यत्न आणि श्रम करून ही दुःखसमूह उत्पन्न होतो याचें कारण पूर्वीच्या पातकाचें मूळ फळास आलें हें होय. या देहीं सुखप्राप्तीसाठीं यत्न केला असतां श्रम होऊन जें दुःख प्राप्त होतें तें पूर्व जन्मीं केलेल्या पातकाचें फळ होय. १५. यत्न करून अथवा सहजगत्या सुख प्राप्त झालें तरी तें यत्नाचें फळ नव्हे, तर पूर्वजन्मीं केलेल्या सुकृताचें (पुण्याचें) फळ होय असें समजावें. यत्न केल्यामुळें सुखप्राप्ति होवो अगर सहजगत्या यत्नाशिवाय सुखप्राप्ति होवो, तें सुख आपण केलेल्या पूर्वजन्मांतील पुण्याचें फळ होय. १६. पापरूप प्रयत्न करीत असतांही कधीं कधीं सुख प्राप्त होतें त्याचें कारण पूर्वजन्मींचें सुकृत होय. १७. पूर्वजन्मकृत पुण्यामुळें. १८. सुखास कारण. १९. वाटे. २०. प्रयत्न दोन प्रकारचे आहेत, लौकिक आणि दैविक. व्रताचरण, शांति, जप, नवस, यज्ञयागादि अनुष्ठानें हे दैविक प्रयत्न आहेत.

पावोनियां सफळ मानिति त्या श्रमातें तेंहि [1]स्वपूर्वफळ हें न कळे तयातें. ॥ ११
[2]कोणी तपें [3]जपपुरश्चरणें विचित्रें घेऊनि वेचिति धनें अति [4]अल्पमात्रें; ।
[5]त्यांचें तयांसि न फळोनि, फळे [6]परांला, आतां प्रयत्न फळदायक कोंवि बोला?॥ १२
तें कर्म [7]सांग नव्हतां न फळे म्हणावें तेव्हां फळप्रद कसें दुसऱ्यासि व्हावें? ।
ज्याचें तयासि फळ तें जरि देत नाहीं, [8]झालें परासि फळ पूर्विल कर्म तेंही.॥ १३
[9]निष्काम तो फळ न इच्छितसे म्हणावें [11]वेंचूनि पुण्य [10]परवित्त किमर्थ घ्यावें? ।
[12]निष्काम जो [13]करुण तो परघातकर्मे कां [14]मारणादिक करील अहो! अधर्मे?॥ १४
कांहीं परार्थ जपतां धनलाभ झाला, मंत्रादिसिद्धि [15]तितुकीच गमे तयाला; ।
राज्यादि लाभ इतरासि तयाचि कर्मे कां यासि अल्प फळ हें नकळेचि वर्मे?॥ १५
याकारणें सकळ लौकिक यत्न जैसे दैवीप्रयत्नहि [16]सकाम समस्त तैसे ।
[17]निष्काम मात्र फळदायक या शरीरीं [18]जेणें प्रसन्न हरि [19]कर्मजबंधहारी. ॥ १६
जे काम्य यत्न तितुके क्रियमाण होती होऊनि [20]संचित [21]पुढें फळ यासि देती, ।
[22]त्यांमाजि लौकिक अमंगळ दैव यत्नें [23]प्रारब्धरूप [24]भवसागरसौख्यरत्नें. ॥ १७

---

१. आपण पूर्वजन्मीं केलेल्या पुण्याचें फळ. २. आचार्यद्वारा अनुष्ठान करविणारे यजमान. ३. मंत्र आपणास सिद्ध व्हावा म्हणून तदनुसार त्या मंत्राचा अमुक संख्याक जप करावा इत्यादि मंत्रशास्त्रोक्त जें अनुष्ठान तें. ४. अनुष्ठानाची फलप्राप्ति मोठी असून त्या मानानें अनुष्ठान करणारास जें धन देतात तें फारच थोडें असतें. ५. अनुष्ठानकर्त्याचें अनुष्ठान त्याला फलप्रद न होतां यजमानाला फलदायी होतें. ६. अन्याला (यजमानाला) फल देतें. ७. यथासांग, परिपूर्ण. कर्माची जीं अंगें शास्त्रांत सांगितलीं आहेत, त्या अंगांनीं पूर्ण असें, न्यूनतारहित असें ८. पुण्य घेणारास जी सुखप्राप्ति झाली त्या पुण्याचें फळ नसून पूर्वील (पूर्वजन्मकृत) कर्माचेंच तें फळ होय. ९. वासनारहित. १०. [illegible] अनुष्ठान करणारा. ११. टाकून. १२. जो निष्काम तो दयाळू असावयाचा. १३. दयाळू. 'करुनि' असाही अन्य पाठ आहे. १४. शत्रूचा नाश व्हावा म्हणून मंत्रतंत्रादिक करतात तें मारण. १५. 'तितक्या गमती तयाला' असाही पाठ आहे. १६. फललाभाच्या इच्छेनें केलेले. १७. अध्याय १ श्लोक १४ यांत 'निष्काम' याचा अर्थ सांगितला आहे. 'जों काम्यकर्म' असाही पाठ आढळतो. १८. ज्या निष्काम कर्मांच्या योगानें. १९. कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या बंधनाचा नाश करणारा हरि (भगवान्) प्रसन्न होतो. जें जें निष्काम कर्म तें तें–ईश्वरार्पण केलेलें असतें. २०. अध्याय १ श्लोक ४९-५० पहा. २१. पुढच्या जन्मीं. २२. त्यामाजि (त्या काम्य यत्नांतून) लौकिक यत्न अमंगल होत (दुःखसमूह देणारे होत) आणि दैव यत्नें (दैविक प्रयत्नाचे योगानें) प्रारब्धरूप (पुढील जन्मीं ते प्रयत्न प्रारब्धरूप होऊन). २३. अध्याय १ श्लोक ५१ पहा. २४. संसारसागरांत सुख देणारीं रत्नें.

यालागिं काम्य निगमागम याचि देहीं जे बोलती सकळ चालवणेंचि तेही ।
मानोनि रेचफळ पुण्य जनीं करावें तेणें पुढें सुख अशा करुणार्द्रभावें. ॥ १८
तें ज्यासि काम्य फळलें म्हणती पुराणीं तेंही जनांसि मुनि दाखविती शिराणी ।
काम्यें जयासि फळ सद्य तया शरीरीं तें पूर्वपुण्य नवयत्ननिमित्तधारी. ॥ १९
पुत्रेष्टि काम्य मखही करितां प्रयत्नें, वंध्यावधू प्रसवती न सुतादि रत्नें; ।
वंध्याच त्या नव्हति ज्यांस घडे प्रसूती, वंध्याच ज्या सुत तयां सहसा न होती.॥
ज्यां कां उपासकजनां कवितादिशक्ती त्यां सर्व पूर्व सुकृतेंचि सदुक्त उक्ती; ।
घोकोनि यत्न करितां फळ पूर्वकर्मे दैवी प्रयत्नहि तसा इतुकींच वर्मे. ॥ २१
घोकोनिही जन निरक्षर एक झाले तैसेच दैविकहि यत्न वृथाचि गेले; ।
जो यत्न ज्यास फळला म्हणऊनि वाटे तें पूर्वपुण्यफळ काळबळेंचि भेटे. ॥२२
दोन्हीं प्रयत्न करितां श्रम दुःखरूपें देऊनि भोग सरती निजपूर्वपापें, ।
त्यामाजि लौकिक पुढें करि पापवृद्धी शास्त्रोक्त काम्य करितां करि पुण्यसिद्धी. ॥
तस्मात् प्रयत्न सुख दोनिहि पूर्वकर्मे पापेंचि दुःख सुख तें सुकृतें स्वधर्मे; ।
जैसेंचि पापफळ दुःख उगेंचि येतें तैसेंचि पुण्यफळही उगलेंचि होतें. ॥ २४
यत्नें करोनि निजदुःख जरी निवारी, होणार दुःख न चुकेचि तरी शरीरीं; ।
सेवूनियां वन सुखें त्यजिलीं विरक्तीं त्यांलागिही न सुटती सुखरूपभक्ती. ॥२५
जे ज्ञाननिष्ठ नर ते करिती न कांहीं प्रारब्धभोगचि तयां क्रियमाण नाहीं, ।
यत्नादिरूपनिजपापफळासि तेही होऊनियां अवश भोगिति दुःख देही. ॥ २६
क्षेत्रज्ञ अज्ञ सम भोगिति पुण्यपापें अज्ञासि जोडति नवीं क्रियमाणरूपें; ।

---

१. श्रुतिस्मृति. २. निगमागम बोलती—असा अन्वय. काम्य कर्मे याच देहीं फलप्रद होत असें सांगतात तें. ३. कर्ममार्गाकडे मनुष्याची प्रवृत्ति करणें. ४. या जन्मीं फळ देणारें. ५. पुढील जन्मीं. ६. करुणेनें भिजलेलें आहे हृदय अशा भावानें, दयेनें, सदयपणानें. ७. आवड. ८. काम्य कर्मांपासून सद्यःफललाभ होतो तो पूर्वजन्मीच्या पुण्यानें होतो, सद्यःप्रयत्न केल्यानें होत नाहीं. ९. ज्या शरीरानें काम्य कर्म केलें त्या. १०. ते नूतन प्रयत्न केवळ निमित्तमात्र होत. ११. पुत्र प्राप्त व्हावा म्हणून जी इष्टि (याग) करतात तिला पुत्रकामेष्टि म्हणतात. १२. यज्ञ. १३. वांझ स्त्री. १४. कर्मीच, बहुधा. १५. अशिक्षित. १६. दैविक प्रयत्न आणि लौकिक प्रयत्न दोन्ही प्रयत्न केले असतां श्रम घडतात आणि पूर्वजन्मींचीं पापें दुःखरूपें भोग देऊन संपतात. १७. दैविक प्रयत्न. १८. आपलेआपण, उगेंच. १९. निवारण करूं पाहतो. २०. सुखदुःखाली स्पृहा न धरणारांनीं. २१. ज्ञानी. २२. श्लोक १७ पहा. २३. श्लोक ६ पहा. २४. देहादिरक्षणनिमित्त यत्नरूप. पुढें श्लोक २९ पहा. २५. ज्ञानी, ज्यास देह आणि आत्मा यांची भिन्नता बाणली आहे तो. याहून जे इतर पुरुष ते अज्ञ होत.

अज्ञ प्रयत्न करिती क्रियमाणधर्मे तें ज्ञानियासि न घडे इतुकेंचि वर्मे. ॥ २७
अज्ञानिया द्विविध यत्न घडोनि येती पूर्वार्जितें स्वदुरितें कितिएक होती; ।
त्यावेगळा करि सदां सुखलाभधंदा तो ज्ञानियासि न घडे भजतां मुकुंदा.॥२८
होणार होइल अशा दृढनिश्चयातें घेतां प्रयत्न न घडे सुखनिस्पृहातें; ।
देहादिरक्षणनिमित्तचि यत्न कांहीं लागे तयासि तरि पूर्विल पाप तेंही. ॥ २९
कर्मानुरूप सकळांसहि बुद्धि होते, ज्ञात्यासही तदनुरूपचि वर्तवीते; ।
तीचा प्रवर्तक जगद्गुरु तीस चाळी ते देह वर्तवि सुखासुखभोगकाळीं. ॥३०
यत्नादिरूप निज पूर्विल पाप भोगी त्या वेगळे न करि यत्न कदापि योगी; ।
प्रारब्धदुःखसुखही इतरांसि जैसें देहाभिमान गळतां न घडेचि तैसें. ॥ ३१
दुःखें सुखें द्विविधें दैहिकें दुर्निवारें देहाभिमानरचितें चुकती विचारें; ।
जो अज्ञ तो द्विविधही सुख दुःख भोगी जें दुर्निवार तितुक्याचि फळासि योगी.
मानापमान सुख दुःख सुतादिदेहीं द्रव्यादिलाभ अथवा धनहानि कांहीं, ।
देहात्मतेकरुनि हें सुख दुःख वाटे देहाभिमान गळतां न कदापि भेटे. ॥ ३३
देहीं क्षुधाज्वरतृषादिक दुःख येतें, स्रग्गंधभोग सुरतादिक सौख्य होतें, ।
इत्यादि दुःख सुख जें बहुता प्रकारें देहाभिमानरहितांसहि दुर्निवारें. ॥ ३४
गेलें अहंपण तथापिहि देह त्याचा ज्ञान्यासही करि मृषा फळभोग साचा; ।
बांधो शके न सुखदुःखपणें ममत्वा ज्ञान्यास हें हरि पुढें निवडील तत्वा. ॥३५

१. पूर्वार्जित पापफलरूप यत्न आणि क्रियमाणरूप यत्न. २. पूर्वजन्मीं अर्जिलीं (संपादिलेलीं, केलेलीं). ३. पापें. ४. कितीएक यत्न होती—असा अन्वय. ५. सुखप्राप्तीसाठीं यत्न: हा समास चिंतनीय आहे. ६. दृढ निश्चय केला असतां. ७. सुखाविषयीं ज्याला इच्छा नाहीं त्यातें. ८. फिरवी. ९. ती कर्मानुरूप बुद्धि. १०. ती बुद्धि सुखदुःखाचा भोग घेण्यास लाविते. ११. ज्ञानी, देहाभिमानरहित जो तो. १२. प्रारब्धभोगामुळें होणारें दुःखसुख. १३. देह हा मीच अशी बुद्धि. १४. देहसंबंधी सुखें आणि दुःखें दोन प्रकारचीं आहेत, एक दुर्निवार आणि दुसरें देहाभिमानजनित; क्षुधा, तृषा, ज्वर इत्यादि दुःखें व सुरतादिक सुखें हीं दुर्निवार होत. मानापमान, द्रव्यलाभ, हानि इत्यादि देहाभिमानजनित होत. जे ज्ञानी आहेत त्यांस हीं सुखदुःखें घडत नाहींत. १५. देहसंबंधी (श्लोक ३४ यांत वर्णिलेलीं). १६. श्लोक ३३ यांत वर्णिलेलीं (सुखदुःखें). १७. आत्मा आणि देह भिन्न होत असा ज्याला अनुभव नाहीं तो; आत्म्याविषयीं खरें ज्ञान नाहीं तो. १८. पुत्रादिकांच्या शरीरास झालेलें सुखदुःख. १९. देह हाच आपण अशा बुद्धीच्या योगानें. २०. पुष्पमाला. 'श्रीगंधलेप' असा अन्य पाठ आहे. २१. मीपण, देहाभिमान. २२. ज्ञान्याचा. २३. प्रारब्धरचित फलभोग. २४. ममतारचित अशा सुखदुःखपणें.

अध्याय हा रचियला दुसरा परेशें जे वाचिती नव्हति दु:खित येत्नलेशें, ।
वेदांतवेद्यपुरुषा भजती सुचित्तें हा 'यत्नतत्व' अभिधानकथानिमित्तें. ॥ ३६

अध्याय तिसरा.

भोगतत्व.

(श्लोक.)

जों आत्मयासि सुखदु:खविटाळ नाहीं प्रारब्धकर्मफळ तों म्हणवे न कांहीं, ।
देऊं शके न ममता सुख दु:ख जेव्हां कैसा घडेल ममतास्पद भोग तेव्हां? ॥१
हा पूर्वपक्ष दृढ वास्तव यासि जैसें स्पर्शोनि भोग न घडे वदिजेल तैसें, ।
कीं भोग होउनि सुखासुख त्यासि नाहीं जो कां ममत्व न धरी दृढ यांत कांहीं. २
बुद्धीकरोनि सुख दु:ख कळे तथापी ते भोग आदळति येउनि चित्स्वरूपीं, ।
जाणोनि दु:ख सुख बुद्धिस जें रुतेना तें आत्मयासि न घडे सुख दु:ख नाना.
गेलें अहंपण तथापिहि मीपणाचें आहे शरीर करितें सुख दु:ख साचें; ।
बाहेर ज्यां सुतधनादिकलाभहानी जाणोनि सुज्ञ सुख दु:ख मनीं न मानी ॥ ४
प्रारब्धभोगदगडीं तनु भिंति झाली, [१२]ते जों अहंममजळें [१३]मतिभिंति ओली; ।
बाहेरुनी दगड तों [१४]ढेंतती [१५]तयेशी, ते वाळली मग खड्यास धरील कैशी? ॥५

---

१. ईश्वरानें. श्लोक २ पहा. २. किंचित् यत्न करून. त्या श्रमानें यत्न करणें व्यर्थ होय असें ऐकून कोणीही यत्न करणार नाहींत—असा भाव. ३. उपनिषदांनीं जाणण्यास योग्य असा पुरुष (ईश्वर), वेदांतांत ज्याची जिज्ञासा केली आहे असा पुरुष. ४. हा अध्याय. ५. नाम. ६. यत्नाविषयींच या अध्यायांत विवेचन केल्यामुळें. ७. सुख आणि दु:ख यांचा स्पर्श. ('सुखदु:खविटाळ' हा समास चिंतनीय होय.) ८. ममत्वामुळें प्राण्याला सुखदु:खें होतात. ९. ममतेमुळें, (पुत्रादिकांच्या) ममतेनें होणारा. १०. सुखदु:ख. ११. प्रारब्धभोग हेच, दगड यांनीं तनु (देह) भिंत झाली (देहरूप भिंत झाली). ती भिंत जोंपर्यंत ओली आहे तोंपर्यंत तिला खडे (दगड) चिकटून राहतील. दगड म्हणजे सुखदु:खरूप दगड असें समजावें. अहंता आणि ममता नाहींशी झाल्यावर देहास सुखदु:ख होणार नाहीं. प्रारब्धयोग हे दगड, पंचभूतें ही माती, अहंता हें जळ, यांनीं शरीररूप भिंत रचिली आहे. श्लोक ३०-३५ पहा. विधि शरीरें कशाचीं करतो हें ३० व्या श्लोकांत वर्णिलें आहे. १२. ते—ती तनुभिंति. १३. बुद्धीला अहंकाराच्या योगानें देहच आपण असें वाटतें; यास्तव, 'तनुभिंति'ला 'मतिभिंति' असें म्हटलें आहे. १४. रुपतात, चिकटतात. १५. त्या भिंतीला.

बुद्धींतुनी जरि [1]अहंममतादि गेले, देहादिभान अवघेंच नसे विरोलें[2]; ।
धूम्रासि पेटवुनि अग्नि विझोनि जातो, तो धूम्र एक घडि त्या सदनीं [3]रहातो. ६
[4]अज्ञानभेद तुटल्यावरिही स्वचित्तीं, संस्कारशेष करि [5]पूर्विलिया प्रतीती, ।
बाहेरुनी सुतधनादिकलाभ हानी जाणोनि सुज्ञ सुख दुःख मनीं न [6]मानी. ॥७
जे [7]ज्ञानभानुकिरणीं [8]मतिभिंति वाळे [9]हे तीसें[10] लागुनि खडे पडती निराळे, ।
जे ज्ञानवर्जित [11]अहंममतार्द्रबुद्धी त्यांला खडे रुतति यास्तव भोगसिद्धी. ॥ ८
[12]पुत्रादि [13]लाभ समजोनिहि हर्ष नाहीं, [14]हानी करोनि [15]मनीं मानि दुःख कांहीं, ।
हे लाभहानि [16]कळणेंचि विटाळ [17]त्यांला, [18]प्रारब्धभोग ममतास्पद तोचि बोला.॥९
प्रारब्धभोग ममतास्पद आणिकांहीं, ऐसें रितीच परि अज्ञ [19]अभिज्ञ नाहीं; ।
राज्यादिकारण [20]पितासुतवैर जेथें आपासि दुःख न करी सुतमृत्यु तेथें. ॥ १०
तो पुत्रमृत्यु तरि पूर्विलकर्मयोगें प्रारब्धकर्म सरलें तितुक्याच भोगें; ।
ऐसेंच सर्व ममतास्पद भोगरूपें जे हर्ष शोक तितुकीं [21]क्रियमाणपापें. ॥ ११

---

१. अहंकार, ममता इत्यादि विकार जरी नष्ट झाले तरी त्यांचा संस्कार नष्ट होत नाहीं, तो कांहीं काळ राहतो, यास्तव सुखदुःख कांहीं काळपर्यंत होणारच, अग्नि विझाला तरी धूर कांहीं वेळ मागें राहतोच. 'सुज्ञ सुखदुःख मनीं न मानी'–असें चतुर्थ श्लोकाच्या चतुर्थ पादांत सांगितलें आहे. ज्याची अहंता, ममता गेली त्याचा सुखदुःखाशीं संबंधच तुटला, मग सुखदुःख मानणें अथवा न मानणें असा प्रकार राहिलाच नाहीं, असा बाध येतो त्याचें निराकरण श्लोक ६-७ यांत केलें आहे. जरी ममतादि विकार दूर झाले तरी त्यांचा देहसंस्कार असतोच असें धूम्राचें उदाहरण देऊन प्रतिपादिलें आहे. २. नष्ट झालें. ३. पाठीमागें असतो. ४. हा श्लोक सहाव्या श्लोकाचेंच रूपांतर आहे. ५. पूर्वींचा अनुभव. ६. 'आणी' असा अन्य पाठ आहे. ७. ज्ञानरूप सूर्याच्या किरणांनीं. ज्ञान='आतां ज्ञान म्हणजे जाणणें । प्रथम आपण आपणांस ओळखणें । जडनिषेधें देखणें । आपण आपणा ॥ [यथार्थदीपिका–अध्याय १० ओंवी १०४]. ८. बुद्धिरूप भिंति. ९. हे सुखदुःखरूप खडे. १०. ज्ञानसूर्याच्या किरणांनीं वाळलेल्या भिंतीला. ११. अहंकाररूप उदकानें भिजलेली. १२. 'पुत्रादि' याचा संबंध 'लाभ' [प्रथमपाद] आणि 'हानी' [द्वितीय पाद] या शब्दांकडे आहे. १३. पुत्रादि लाभ–अध्याय २ श्लोक २३ यांत सांगितल्या प्रकारचा लाभ, ज्याला 'अभिमानरचित' असें म्हटलें आहे तो. १४. पुत्रादिहानि. [अध्याय २ श्लोक २३.] १५. मानित नाहीं. १६. अशा लाभहानीपासून सुखदुःख मानणें हाच विटाळ. १७. आत्म्याला. १८. तो प्रारब्धभोग. लाभहानि कळणें हाच प्रारब्धभोगाचा धर्म, त्याला 'ममतास्पद बोला'=त्या भोगाचें नांव 'ममतास्पद' होय असें समजा. १९. अज्ञ अभिज्ञ नाहीं परि आणि कांहीं प्रारब्ध भोग ममतास्पद येणें परीच–असा अन्वय. २०. पितापुत्रांचें शत्रुत्व. २१. याची व्याख्या मागें अध्याय १ श्लोक ४९ यांत आहे ती पहा.

जे [1]शुष्क भिंति न खडे रुततील तीतें तैसें न निर्ममजना सुख दुःख होतें; ।
भिंतीमधें दगड जे रचिले तयांचा नेघे म्हणेल तरि होइल भोग साचा. ॥१२

जैसीं क्षुधाज्वरतृषादिक दुर्निवारें दुःखें तसीं न ममतारचितें विचारें; ।
तीं मानिलीं तरिच कीं सुख दुःख देती, जीं ज्ञानियासि ममता गळतां न होती ॥

भोगस्वरूप [2]इतुकें ममतास्पदाचें, कीं लाभ हानि कळणें सुख दुःख कैंचें? ।
[3]तें अज्ञ मानिति वृथा ममता धरोनी [4]प्रज्ञ [5]निर्मम म्हणोनि [6]तैया न मानी. ॥ १४

[7]बाहेरही सुतधनादिकलाभहानी जाणोनि अज्ञ सुख दुःख [8]तनूंत मानी; ।
जीं [9]दैहिकें तितुकिंही उठती शरीरीं, भिंतीसि लागति खडे [10]उभयप्रकारीं. ॥१५

हें [11]'कर्मतत्व' जरि येस्थळिं पूर्वपक्षी तर्कें करी द्विविधही फळ तुल्य लक्षी, ।
बाहेरुनी विषयही सुख दुःख देती, तैसें ममत्व सम दोनिहि कां न होती ?॥१६

[12]हा तर्क तों अनुभवासि विरुद्ध आधीं, [13]व्याधी जसी म्हणवितील तसी न [14]आधी;।
आधी विवेकें [15] करितां चुकतील जैसे व्याधी विवेक करितां चुकती न तैसे.॥१७

[16]मानी तरीच तनयादिक लाभ हानी हीं दैहिकें न चुकती जरि हा न [17]मानी, ।
या कारणें सुतधनादिक बाह्य [18]जैसें देहासि दुःख सुख तें म्हणवे न तैसें.॥१८

बाहेरुनी विषय हे जरि सौख्य देते, तेव्हां क्षुधाज्वरतृषार्त सुखीच होते, ।
[19]स्रग्गंधलेप करि शीतळ तापहर्ता [20]नेदी तथापि सुख [21]कामतृषाक्षुधार्ता. ॥ १९

---

१. वाळलेली भिंत म्हणजे अहंममतेपासून विरहित झालेली तनु. २. लाभ हानि कळणें इ-तकें. ३. सुखदुःख. ४. आत्मस्वरूप जाणणारा ज्ञानी. ५. ममतारहित. ६. त्या सुखदुःखास. ७. शरीराबाहेर, दैहिक नव्हे अशी. ८. शरीरांत; सुखदुःखदैहिक असल्याप्रमाणें. ९. देहासंबंधीं क्षुधा, तृष्णा इत्यादि. १०. दोन प्रकारांनीं, तनूंत (दैहिक) आणि बाह्य (मम-तारहित). पुढें श्लोक ३६ पहा. ११. या 'कर्मतत्व' नामक ग्रंथांत या ठिकाणीं प्रारब्धकर्मफळ-भोगाचे दोन प्रकार जरी केले आहेत, तरी त्यांचें फळ सारखेंच आहे, तनूंत असो किंवा तनूबाहेर असो. तो भोग सुखदुःख देतोच. स्रक्गंधलेप इत्यादि विषय शरीराला बाहेरूनच सुखदुःख देतात, मग 'बाह्य' आणि 'दैहिक' भोग हे दोनही समान कां नव्हेत? बाह्य आणि दैहिक सुखदुःखें समान कां नाहींत? या शंकेचा उपक्रम या श्लोकांत तिचें समाधान पुढें श्लोक १७-२० यांत केलें आहे. १२. ही शंका, हा पूर्वपक्ष (१६ व्या श्लोकांतील) हा चरण वरील शंकेच्या निराकरणार्थ आहे. १३. शरीरव्यथा, रोग, देहपीडा. १४. मानाची व्यथा. १५. म-नाचा निग्रह, विचारानें मनाचें समाधान. १६. मानिलें असतां. १७. मानिलें नाहीं तरी. १८. स्रग्गंधलेप इत्यादि विषय. १९. माळा आणि गंधाचा लेप (उटी). 'श्रीगंधलेप' असा अन्य पाठ आढळतो. २०. देत नाहीं. स्रग्गंधलेप सुख नेदी—असा अन्वय. २१. कामानें, तहानेनें किंवा भुकेनें जो पीडित त्याला.

देहासि भोग, सुख दुःख मनासि नाहीं, तें बोलेंवे न सुख दुःख तयास कांहीं; ।
गंधें फुलें अतिसुगंधसुमंदवातें, कामातुरासि विरहीं सुख काय होतें? ॥ २०

प्रारब्धकर्म वदति क्षय भोगरूपें भोगस्वरूप सुखदुःखचि पुण्यपापें ।
भोक्त्यासि भोग न कळोनिहि भोग देहीं तो भोग कीं कळलियाविण भोग नाहीं २१

भोक्त्यासि भोग न कळोनिहि भोग देहीं स्रक्चंदनें शवें अलंकृत भोग तोही, ।
आलिंगिती युवति जाळिति पुत्रें जेव्हां भोक्त्याविणेंचि मग भोग घडेल तेव्हां. ॥२२

भोक्त्यासि दुःखसुखभोग कळेल जेव्हां तो पुण्यपापमय भोग सरेल तेव्हां; ।
देहासि भोग सुख दुःख नें आत्मयासी, तेव्हां सुखासुख असे फळ याचिपासीं॥

कामातुरा सुमनचंदनसौख्य नाहीं देहीं रतिश्रम मनांत न दुःख कांहीं; ।
तेव्हां सुखासुखफळें असती स्वदेहीं, काळें फळें तरु तरूचि मधील तेही. ॥२४

---

१. देहाला मात्र भोग घडतो, पण तत्संबंधानें सुखदुःख मनाला घडत नाहीं, त्याचा परिणाम मनावर घडत नाहीं. २. म्हणवत नाहीं. ३. त्या भोक्त्याला, आत्म्याला. ४. स्मरपीडिताला. ५. 'अरे! ज्ञानवंत जरी झाला। प्रारब्धें प्रकृति लागलीच त्याला। कीं भोगें क्षय बोलिला। प्रारब्धांचा ॥ ५१४ ॥ परि जेव्हां झाला ज्ञानी । मग त्याची जे म्हणावी प्रकृति म्हणुनी । ते प्रारब्धरूपि त्यावांचूनी । प्रकृति मूळ विद्या म्हणवेना. ॥५१५॥ +++++ ॥ जीवाचेनि निवडून कर्म । शरीरें करी सगुण ब्रह्म । जरी गेला वासना भ्रम । तो प्रारब्ध-यथा काळें भोगवी. ॥ ५२८ ॥ [यथार्थदीपिका-अध्याय ३ श्लोक ३३.] ६. प्रारब्धकर्म क्षय प्रारब्धरूप जें कर्म त्याचा नाश. येथें-'प्रारब्धकर्म' आणि 'क्षय' अशीं दोन पदें योजून त्यांमध्यें 'वदति' हा शब्द व्यवधान पावला आहे, 'प्रारब्धकर्मक्षय' असें एक पद इष्ट आहे. ७. भोगापासून जर सुखदुःख झालें तरच तो भोग म्हणण्यास योग्य, सुखदुःख जर त्यापासून होत नाहीं तर तो भोगच नव्हे. ८. पुण्याचे योगानें सुख आणि पापाचे योगानें दुःख-असा अन्वय. ९. आत्म्यास; श्लोक ३ यांत दर्शविलेल्या 'चित्स्वरूप' जीवाला; मनास (श्लोक २० यांत दर्शविल्याप्रमाणें). १०. स्रक्चंदनादिक भोग. ११. सुखदुःखसंबंध. १२. प्रेत, मृत शरीर. १३. शवास अलंकार घालणें हा. १४. स्त्रिया. १५. पुत्राचें शव, मृत पुत्राचें शरीर. १६. पूर्वजन्मकृत पापपुण्यापासून उत्पन्न झालेला प्रारब्धभोग. १७. सुखदुःख भोग देहास नाहीं, आणि आत्म्यास आहे-असा संबंध. १८. आत्म्यासच. श्लोक २० पूर्वार्ध यांत देहास जो भोग तो भोग म्हणतां येत नाहीं असें सांगितलें, तेंच मत श्लोक २१।२२।२३ यांत उदाहरणांनीं व्यक्त केलें आहे. १९. देहांत कामोत्पत्ति झाली असतां कामविकल दैहिक दुर्निवार होय. २०. पुष्प. २१. अध्याय=श्लोक ४. यांत सांगितल्याप्रमाणें प्रारब्ध हें बीज व त्यापासून देह हा वृक्ष, आणि सुखदुःख हीं फळें. २२ कालगतीनें. २३. फलद्रूप (फलयुक्त) होतो. २४. वृक्ष.

दुःखें सुखें असति कर्म जयाचि देहीं बाहेरुनी विषय होति निमित्त कांहीं; ।
जैसीं जलें तरुसि येति फळें रसाळें ऐसें तथापि फळ केवळ वृक्षमूळें. ॥ २५
येथें सुखासुखफळें तनु वृक्षरूपें वृक्षांसि बीज निज पूर्वील पुण्यपापें; ।
[6]बीजानुरूपचि तरूसि फळें विचित्रें तेन्हां जळें तरुसि [7]जीवनरूपमात्रें.॥ २६
देहीं क्षुधाज्वरतृषादिक दुःख जेन्हां बाहेरुनी नव्हति कोणिहि [8]हेतु तेन्हां, ।
ऐसेंचि पुण्य फळ जें सुखनाम तेंही वृक्षामधें फळ तसीं अवघीं स्वदेहीं. ॥ २७
दुःखें सुखें असि [9]अहंपणदुर्निवारें होती [10]ममत्वरचितें, न [11]ऐसीं विचारें; ।
जें दुर्निवार तितुकें सुख दुःख देहीं बाहेरिल्या तनुसि [12]आदळतात तींही.॥ २८
याकारणें स्वसुखदुःख [13]फळेल जेन्हां, प्रारब्ध दुःखसुख देइल [14]यांसि तेन्हां; ।
भिंतीमधें दगड येरिति भोगें[15] देहीं भिंतीस आदळति जे [16]ममताख्य तेही.॥ २९
प्रारब्ध तें दगड [17]पूर्वील पुण्यपापें माती तसीं दिसति पांचहि [18]भूतरूपें; ।
तो होय [19]कर्दम [20]अहंममतादिनीरें [21]भिंती करी [22]विधि [23]तैं [24]विविधें शरीरें. ॥ ३०
प्रारब्धरूप दगडाचिमधून कांहीं [25]पुत्रादिरूप [26]उरलें [27]रचितां [28]स्वदेहीं, ।

---

१. वृक्षामधून फळ उत्पन्न होतें तसें सुखदुःख देहामधून उत्पन्न व्हावयाचें. श्लोक १६ यांतील अर्थाची स्पष्टता श्लोक २४-२७ यांत केली आहे. २. सुखदुःखाचें बीज कर्म होय. विषय हे तीं उत्पन्न होण्यास निमित्तमात्र होत. जलसेकानें वृक्षाला फळें येतात, तरी फळाचें मूळकारण जलसेक नसून वृक्षाची मूळें (अथवा बीजें) होत. ३. गोड, मधुर. ४. फळाचें कारण जलसेक नव्हे तर वृक्षमूळ होय. ५. देह. ६. बीजाला योग्य, बीजाप्रमाणें फळें येतात. ७. जळ हें केवळ जीवनप्रद मात्र होय. ८. हेतु=सुखदुःखास कारण क्षुधा तृषादिक होण्यास बाह्यकारण नाहीं, तर तें कारण देहांतच आहे, असें फळें पुष्पें यांस बाह्य कारण नसून तें वृक्षांतच असतें. ९. भोगाचें वेळीं ज्ञान्यासही अहंबुद्धी उत्पन्न होऊन जीं सुखदुःखें होतात तीं (देहिक सुखदुःखें). १०. अभिमान रचितें. ११. देहिक भागाप्रमाणें. १२. ममत्वरचितें सुखदुःखें बाहेरून देहाला आदळतात. १३. फलद्रुप होईल. मनास सुखदुःखभोग जाणवेल. १४. भोक्त्याला. १५. दैहिक भोग भिंतीमध्यें जसे दगड तसे देहांत दैहिक प्रारब्धभोग होत. १६. ममता आहे आख्या (संज्ञा, नाम) ज्यांची असे (भोग). भिंतीस बाहेरून दगड येऊन आदळतात, तसे देहास ममतास्पद प्रारब्धभोग आदळतात. १७. पूर्वजन्मीं केलेली. (अध्याय १ श्लोक ५१ पहा.) १८. पंचमहाभूतें=पृथ्वी, उदक, तेज (अग्नि), वायु आणि आकाश. १९. चिखल, गारा, भिंत घालण्यापूर्वीं कालवून तयार केलेली माती. २०. देहात्मबुद्धिरूप उदकाच्या योगानें. २१. भिंती म्हणजे शरीरें. २२. विधाता, निर्माणकर्ता, ब्रह्मदेव. २३. त्या समयीं, सृष्टिकाळीं. २४. नाना प्रकारचीं. २५. पुत्रादि प्राप्ति किंवा पुत्रादि मृत्यु अशा स्वरूपाचें ममतास्पद भोगरूप प्रारब्धकर्म. २६. शिल्लक राहिलें, भिंती रचण्यांत ज्याचा उपयोग केला नाहीं असें. २७. देहरूप भिंती रचिते वेळीं. २८. देहरूप भिंतीस दगड रचितां कांहीं उरलें.

तेंही[1] खडे वसति[2] भिंतिस काळ[3] येतां भिंतिमधील गळती निजभोग होतां.॥३१
प्रारब्ध तें दगड भिंतिमधील जैसे काळें[4]करोनि गळती फळभोग[5] तैसे; ।
धोंडे जसे गळति भोग फळोनि[6] जाती, भूतें[7] शवीं[8] उरति पांचहि जेंवि साती॥३२
लागोनि[9] जे दगड ते पडती[10] निराळे भिंतीवरील निजभोगसमाप्तिवेळे, ।
ज्या कां न सोडिति खडे ममतार्द्रभिंती ते संचितें[11] इतरभिंतिस हेतु होती. ३३
ते भिंतिचा निजधणी क्रियमाण[12]रूपें हे पूर्व भिंति पडतां[13] कृतपुण्यपापें, ।
आणीक[14] भिंति करितां ममतार्द्रचित्तीं जे रूतले दगड कारण[15] तेथें[16] होती.॥ ३४
ऐसींच दैहिक[17]सुखार्थ करोनि कार्यें, दुःखी सुखी म्हणुनि मानुनियां अधैर्यें, ।
पाषाण[18] नूतन अहंममतार्द्रचित्तीं जोडोनि नेउनि सवें करि अन्य भिंती. ॥३५
पाषाण ते विधि[19] अहंममता[20] विभागें कांहीं तनूंत कितिएकममत्वयोगें ।
जीवासि भोगवि[21] अशा द्विविधप्रकारें दुःखें सुखें द्विविधें[22] यास्तव या विचारें॥३६

---

१. उरलेले दगड; (पक्षीं) ममतास्पद भोग. २. भिंतीस चिकटून राहतात. ३. यथाकाळीं. ४. यथाकाळीं, योग्य काळ आला म्हणजे. ५. दैहिक प्रारब्ध फळभोग. ६. फळ देऊन, सुखदुःखरूप फळ देऊन. ७. पृथ्वी, आप्, तेजस्, वायु, आकाश हीं पंचमहाभूतें. (पृथिव्यापस्तेजोवाय्वाकाशानि पंचमहाभूतानि.) ८. मृत मनुष्याचे प्रेतांत प्रारब्धभोगासाठीं जीव शरीर धारण करतो; प्रारब्धभोग संपेपर्यंत त्या शरीरांत जीव राहतो, प्रारब्धभोग संपतांच शरीर पंचत्व पावतें. पंच भूतांवांचून त्यांत कांहीं नसतें. [कीं लिंगदेह आणि चिदंश जीव । जोंवरी असे तोंचि वरी सजीव । म्हणावा अन्यथा शव । अमंगळ होतसे देह तो. ॥—यथार्थदीपिका अध्याय ७ ओवी ४०६.] ९. भिंतीस लागून (चिटकून) असणारे जे. १० त्या भिंतीवरील त्या दगडांची भोगसमाप्तीची वेळा प्राप्त झाली कीं ते दगड त्यावेळेस निराळे पडतात. ज्या भिंती ममतारूप उदकानें भिजलेल्या असतात त्या दगडांना सोडीत नाहींत. ते दगड संचितरूप होऊन नवीन भिंती करण्यास कारण होतात. ११. अध्याय १ श्लोक ४५ पहा. १२. रूपानें. अध्याय १ श्लोक ४९ पहा. १३. हा देह पडल्यानंतर. १४. दुसरा देह उत्पन्न करण्याविषयीं. १५. निमित्त होतात. १६. त्या स्थानीं (ममतार्द्र चित्तीं). १७. देहास सुख व्हावें यासाठीं. १८. पाप किंवा पुण्य कर्में हीं नूतन शरीररूप भिंत रचण्यास साधनीभूत पाषाण. १९. विधाता. (भोगवि या क्रियापदाचा कर्ता). २०. अहं आणि ममता अशा दोन विभागांनीं; दैहिक आणि अभिमानरचित अशा दोन प्रकारांनीं. २१. अहंभाग तनूंत भोगवी आणि ममताविभाग ममत्वयोगें भोगवी. २२. दैहिक आणि अभिमानरचित अशा दोन प्रकारांनीं.

जे जागरीं विषय रूपरसादि घेती संस्कार ते दगडरूप मनीं धरीती, ।
निद्रीं चराचर निर्जोनि मनीं करीतो देहांतरासि कृतकर्म असेंचि नेतो.॥ ३७
यांलागीं निश्चित सुखासुखतारतम्यें जैसीं अहंपण तसीं न ममत्वगम्यें, ।
बाहेरुनी विषय केवळ हेतु तेथें दुःखा सुखा घडति हे म्हणवे न येथें. ॥ ३८
जो अज्ञ तो द्विविध दुःखसुखा बुडाला, दैहीकमात्र न सुटे फळ योगियाला; ।
खातां स्वदैहिकसुखासुख अज्ञ भोगी, तैसें न भोगिति कदापिहि आत्मयोगी. ॥

---

१. जागृतावस्थेंत, जागा असतां, झोंपेंत नसतां. २. पांच विषय, रूप, रस, गंध, स्पर्श आणि शब्द हे पांच विषय होत. ३. ग्रहण करतात. ४. जागृतींत जे विषय सेवन केले ते. ५. स्थावरजंगम सृष्टि, स्वप्नांत निर्माण केलेली सृष्टि. ६. निद्रित असतां. ७. स्वप्नांत चराचर सृष्टि निर्माण करतो. ८. मेल्यानंतर दुसरा देह प्राप्त होतो त्या प्रसंगीं. ९. या श्लोकाच्या तीन चरणांत स्वप्नसृष्टीचा जो प्रकार सांगितला त्याप्रमाणें. १०. यालागीं (वास्तव) सुखासुख तारतम्यें (सुख आणि असुख—दुःख—यांचा तारतम्य विचार केला असतां त्यांच्या योगानें) निश्चित (असें निश्चयानें म्हणावें लागतें कीं) अहंपणगम्यें (दैहिक सुखदुःखें) जैशीं (ज्या प्रकारचीं) तसीं (त्या प्रकारचीं) ममत्वगम्यें (आभिमानरचित सुखदुःखें) न=नाहींत, या दोहोंमध्यें भेद आहे.) तेथें (अभिमानरचित सुखदुःखाविषयीं) केवळ बाहेरुनी (केवळ देहबाह्य, शरीराला लागून नाहींत अशा प्रकारें) विषय (रूपरसादि पंच विषय) दुःखा सुखा हेतु घडति (कारण होतात) तसे हे (पंच विषय) येथें (दैहिक सुखदुःखाविषयीं) म्हणवे न (तसें म्हणता येत नाहीं, केवळ देहबाह्य विषय दैहिक सुखदुःखास कारण नाहींत.) ११. अज्ञास दैहिक आणि देहबाह्य (आधि, व्याधि) अशा दोन्ही प्रकारच्या सुखदुःखांचा अनुभव घेतो, दैहिक आणि अभिमानरचित सुखदुःखें त्यास होतात. जो योगी अथवा ज्ञानी आहे तो फक्त दैहिकांचा अनुभव घेतो. १२. अध्याय २ श्लो० ३४ यांत सांगितलेलीं दैहिक सुखदुःखें. १३. अज्ञ आणि आत्मयोगी हे दोघेही दैहिक सुखदुःखास समान पात्र आहेत. परंतु त्यांच्या भोगांत भेद आहे. (श्लो० ४० पहा.) १४. योगाची व्याख्या पंडितांनीं श्रुतीच्या आधारें यथार्थदीपिकेंत केली आहे ती अशी:—"श्रुति ॥ यदा पंचावतिष्ठंते ज्ञानानि मनसा सह । बुद्धिश्च न विचेष्टते तामाहुः परमां गतिम् । तां योगमिति मन्यंते स्थिरामिंद्रियधारणाम् । अप्रमत्तस्तदा भवति योगो हि प्रभवाप्ययौ ॥ श्रुत्यर्थ ॥ जेव्हां पांचा ज्ञानेंद्रियांच्या वृत्ती । मनासहित निश्चळ राहती । बुद्धीची चेष्टा गती । राहे परमगती त्या गतीतें म्हणावें ॥ १३३ ॥ ऐसी जे परमा गती । तीतें योग म्हणोनि म्हणती । त्या योगाची हेंची स्थिती । की स्थिरा इंद्रियांची धारणा ॥ ३४ ॥ कीं प्रपंच म्हणावें तया । जो अनुभवा ये पांचां इंद्रियां । शब्द स्पर्श रूप रस गंध यां । वेगळा प्रपंच काय असे. ॥ ३५ ॥ चित्त झालें चिन्मय । तेव्हां कोण्या विषयातें कोण करवी इंद्रिय । प्रत्यगात्मस्मृतीचाच निश्चय । तन्मयत्वेंचि उरे बुद्धीसी. ॥ ३६ ॥ ऐसी धारणास्थिती । तीस योग ऐसें म्हणती । परि अप्रमत्त तेव्हां ये रीती ।

दुःखांत धैर्य सुख भोगुनिही उपेक्षा भोगूं पुढें सुख अशी न जया अपेक्षा; ।
जे दुःख भोगुनि न शोकनिमग्न होती, होणार दुःख कळल्या भय जे न घेती.॥
ऐसें ममत्व सुख दुःख न योगियांसी देहीक भोग न चुकेचि कधीं तयांसी, ।
ते भोग भोगुनिहि मागुति भोग कांहीं विश्वात्मतें करुनि केवळ ज्यासि नाहीं.॥४१
जाणोनि चिज्जडविवेकहि विश्वसाक्षी होऊनि जो निज अनंतपणास लक्षी, ।

स्थिती वागे ॥ ३७ ॥ ज्यास स्वरूपाची विस्मृती । त्यास भ्रमरु म्हणती । स्मृती जातां पदच्युती । प्रमत्तातें. ॥ ३८ ॥ ऐसा योग न वाणे । श्रुति त्यातें अप्रमत्त म्हणे । कीं योगसिद्ध म्हणावें । ते स्वचिदात्मता न विसरती. ॥ ११३९ ॥ [यथार्थदीपिका–अ० ६.]

१. ज्याला, ज्या ज्ञानी नराला, जो आत्मयोगी आहे त्याला. २. इच्छा. ३. याप्रमाणें. ४. अभिमानरचित सुखदुःखें. (अ० २ श्लो० ३३ यांत वर्णिलेली सुखदुःखें.) ५. अध्याय २ श्लो० ३४ यांत सांगितलेली सुखदुःखें. ६. दैहिक भोग. ७. ज्ञानाचे योगानें. 'आणि ज्ञान म्हणजे सम्यगवेक्षण । म्हणजे बरवें निरीक्षण । ज्या बऱ्या निरीक्षणाचें लक्षण । कमलेक्षण चतुर्थी बोलिला. ॥ १२१४ ॥ प्रस्तुतचि झालें त्याचें निरूपण । कीं ज्या ज्ञानें आपणामध्यें सर्व भूतांचें निरीक्षण । तें ज्ञान ऐसें म्हणे कमलेक्षण । 'येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि' म्हणोनी ॥ १२१५ ॥ एवं च आत्मयामध्यें सर्व भूतें । सर्वभूतीं पहावें आत्मयातें । ऐसें पाहणें त्या पाहण्यातें । म्हणावें ज्ञान. ॥ १२१६ ॥ [यथार्थदीपिका–अध्याय १२]. ८. ज्या ज्ञानी अथवा योगी पुरुषाला भोक्तृत्व नाहीं. या संबंधानें पुढील उतारा चिंतनीय आहेः–ज्ञानियास चिदात्मता । आपुली कळली तत्वतां । त्या चिच्चैतन्यास न घडे भोक्तृता । या भावें भोक्तृत्व नसे ज्ञानियातें ॥ १४७२ ॥ परंतु ज्या देहीं झालें ज्ञान । तो देह त्या कर्माचे भोगाचें स्थान । ज्या बुद्धीनें ओळखिला चिदात्मा निरंजन । तेचि बुद्धि जाणे सुखदुःख. ॥ १४७३ ॥ या कारणें ज्ञानी । प्रारब्धभोग भोगितो म्हणोनी । श्रुति वेदांसूत्रीं करुनी । निर्णय ऐसा. ॥१४७४॥ [यथार्थदीपिका–अध्याय १२.] ९. चित्+जड+विवेक=सजीव+निर्जीव+विचार. 'मी एक आहे ऐसें पाहे । प्रकाशवंत तोचि आहे । हे सत्ता ज्यास त्यास साहे । सत् म्हणवणें ॥ ३४० ॥ हें सतपण नाहीं जया । असत् जड म्हणावें तया । जाणें आपणा आणि दुजिया । सत म्हणावें तयासचि ॥ ३४१ ॥ हे दोन्ही मिळोन एक । समजणें हाचि अविवेक । जैसें दूध आणि उदक । भिन्न न दिसे ॥ ३४२ ॥ हीं दोन्ही निवडी हंस । जगद्गुरु देवाधीश । यथापि हा परमहंस । हंसाहूनी ॥ ३४३ ॥ ·········· हा जडचैतन्याचा विवेक । या ज्ञानाचें नांव व्यतिरेक ॥ ३४६ ॥ [यथार्थदीपिका–अध्याय २]. चिज्जडविवेक म्हणजे व्यतिरेकज्ञान आणि 'विश्वसाक्षी होऊनि जो निजअनंतपणास लक्षी' म्हणजे अन्वयज्ञान. अन्वयज्ञान आणि व्यतिरेकज्ञान हीं प्रथमदर्शनीं विरुद्ध आहेत. यासंबंधानें पुढील उतारे चिंतनीय आहेतः–'जडास अनित्यत्व ऐसें प्रसिद्ध । तेव्हां नित्य चैतन्यास भेद सिद्ध । भेद सिद्ध होतां, असिद्ध । अद्वैत जालें ॥ ६१८ ॥ [यथार्थदीपिका–अध्याय ६]. 'आतां ज्ञान म्हणजे जाणणें । प्रथम आपणास आपण ओळखणें । जडनिरपेक्ष देखणें । आपण आपणा. ॥ १०५ ॥ हें आवरण

हें वर्म त्यासि नकळे सुखदुःख भोगी भोक्ताचि मी म्हणुनि मानितसे कुयोगी. ॥
कोणी मृषा म्हणुनि बोलति भोग कैंचे? मिथ्या भुजंग परि ते भयकंप साचे; ।
स्वप्नी मृषा गज मृषा तनु मर्दिताहे द्रष्टा तथापिहि खरेंचि म्हणोनि पाहे. ॥
नाहींच भोग, तरि त्यास किमर्थ मुक्ती? शास्त्रें किमर्थक? किमर्थ सदुक्तियुक्ती?।

ज्ञानलाशन । जालें जड व्यतिरेकें आत्मज्ञान । परंतु जडद्वैत निरसन । जालें पाहिजे अन्वयें करूनी ॥ १०६ ॥ व्यतिरेकें नासे जें आवरण । प्रथम अविद्यास्फुरण । न कळणें स्वरूपलक्षण । कोण आपण म्हणोनी ॥ १०७ ॥ [यथार्थदीपिका—अ० १०] १०. जगतास साक्षिरूपानें पाहणारास.

१. हें तत्व. अन्वयव्यतिरेकज्ञान. (या श्लोकाच्या पूर्वार्धांत वर्णिलेलें मर्म). २. कुयोगी अज्ञानी जो त्याला. ३. कुत्सित योगी, अज्ञ. ४. कोणी 'भोग मृषा' [असें] म्हणुनि [भोग] कैंचे?' [असें] बोलति—असा अन्वय. कोणी भोग मिथ्या आहेत असें प्रतिपादन करतात, परंतु रज्जूवरील सर्प जरी मिथ्याभास आहे तरी त्याच्या भयानें होणारे देहकंप खरे आहेत. कोणी भोग मृषा आहेत तेव्हां भोगाला वस्तुत्व कोठचें असा प्रश्न करतात. या प्रश्नाचें उत्तर श्लो० ४३-४४ यांत आहे. 'तो भोग लेखावा जडा मना । तरी भोग इंद्रियां कां हो घडेना । एवं च मनास भोक्तृत्व हे कल्पना । प्रमाणविरुद्ध अनुभव विरुद्ध ॥५२३॥' [यथार्थदीपिका—अ० १५.] ५. दोरीचे ठिकाणीं सर्पभ्रांति. ६. मिथ्या सर्पभासामुळें उत्पन्न झालेले (भयकंप). ७. सत्य. 'आतां भोगचि मिथ्या म्हणावा । तरी मनास भोग कां गणावा । एवं स्वप्न मिथ्या तरी मानावा । सुखदुःखभोग स्वप्नद्रष्टयातें ॥ ५२५ ॥ स्वप्नीं दुःखी अत्यंत । त्यास जागें करी जो जागृत । तो त्याचे चरण असे वंदित । कीं सोडविलें म्हणे दुःखापासुनी ॥ २६ ॥ स्वप्नीं दुःखप्रद पदार्थ । मिथ्या इंद्रियें मिथ्या इंद्रियार्थ । परि द्रष्टा सुखी दुःखी झाला यथार्थ । जो स्मरे जागरीं ॥ २७ ॥ सुखदुःख कालचें आजी । तैसेंचि आठवे जें पावला स्वप्नामाजी । मिथ्या भुजंग देखोनि वाजी । भय मनीं कंप देहीं द्रष्टयाच्या ॥ २८ ॥ ज्यास ऐसा भोगसंबंध त्यातेंचि अनादि अज्ञानबंध । जो सुखदुःखभोक्ता अविबोध । मोक्षही त्याच भोक्तातें. ॥ २९॥ त्यास आरोग्य ज्यास रोग । त्यास मोक्ष ज्यास भोग । मनास भोग तरी मनास योग । अंगीकारावा मोक्षाचा ॥ ३० ॥ मोक्ष मानावा ज्यास । नाश न घडावा त्यास । नाश बोलावा मनास । कैवल्य मोक्ष निर्गुण जे समर्थी ॥ ३१ ॥ प्रकृतीचे अवघे भोग । आणि भोक्ताही असतां प्रकृतिभाग । तरी अंश माझा भोक्ता ऐसा प्रसंग । कां श्रीरंग मुखपद्मीं प्रकटिला? ॥ ३२ ॥ प्रकृति विवर्त जडरूप । अंश चित्स्वरूपाचा चिद्रूप । तो बद्ध तो द्रष्टा पावे भयकंप । जडभोग मिथ्या सर्व देखोनी ॥ ३३ ॥ तो द्रष्टा स्वप्नप्रकृती । भोगी स्वप्नदेहाकृती । जो गुरुकृपें पावे जागृती । मुक्ति त्यास जो बद्ध ॥ ५३४ ॥ [यथार्थदीपिका—अ० १५]. ८. गुढवीत आहे. ९. श्लो० ४३ यांत जी शंका घेतली आहे तीच जर खरी असती (म्हणजे 'भोग नाहींच' ही गोष्ट खरी असती) तरी (तर) 'त्यास किमर्थ मुक्ती?'—मुक्तीची काय गरज होती? ज्यास बंधन नाहीं त्यास मुक्तीची गरज नाहीं हें स्पष्ट आहे. मग शास्त्रें 'किमर्थक?'—शा-

कर्तृत्व तें [1]प्रकृतिचेंचि [2]चिदंश [3]भोक्ता [4]गीतेंत निर्णय करी हरि वेदवक्ता. ॥
भोक्तृत्व हें न म्हणवे परमात्मयासी, आत्मत्व तें अनुभवाप्रति ये [5]जयासी, ।

त्यांशी गरज काय? 'सदुक्तियुक्ती किमर्थ?'=संतांचे उपदेश व मोक्षप्राप्तीविषयी युक्तिप्रद भाषणें यांची गरज काय होती? सारांश ही शंका व्यर्थ आहे. वेदवक्ता हरि गीतेंत निर्णय करी (करता झाला):-तें कर्तृत्व प्रकृतिचेंचि [आहे] [आणि त्याचा] भोक्ता चिदंश [आहे].

१. प्रकृति='कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते। पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २० ॥' कार्य म्हणजे शरीर, आणि कारणें म्हणजे सुखदुःखादिकांची साधनें जी इंद्रियें तीं, यांना 'प्रकृति' उत्पन्न करिते, असें म्हटलें आहे। आणि 'पुरुष' हा सुखदुःखांचा अनुभव घेणारा म्हटला आहे. 'कार्य म्हणजे प्रयोजन। जे वासना संकल्पें करी जन। त्यांचीं कारणें बुद्धि इंद्रियें मन। कर्तृत्व अहंबुद्धीचें ॥ ४७ ॥ हीं अवघीं जडपणें। वृथा एका पुरुषाविणें। परंतु त्यांच्याठायीं स्फुरणें। होती निमित्तें प्रकृतीच्या ॥ ४८ ॥ म्हणुनी जे प्रकृती। धर्मादि बोलिली तुजप्रती। तीस हेतु म्हणती। या कार्य कारणकर्तृत्वीं अर्जुना ॥ ४९ ॥ [यथार्थदीपिका–अ० १३]. सुखदुःख मोहात्मक तीन्ही गुणें। सत्त्व गुण होय सुखाचें कारण। रजोगुणें होय दुःख दारुण। मोहातें तमोगुण विस्तारितसे ॥ ९३ ॥ हे इंद्रिय द्वारा घेई जरी। म्हणोनि करणाश्रयत्वें कारण घेई जरी। तयां कार्यकारणांची कर्तृत्वस्थिती। परिणमती तदाकारें ॥ ९४ ॥ पंचमहाभूतें देहाकारें परिणमती। आणि विषयही तत्तद्रूपेंचि वर्तती। गुण ते सुखदुःख मोहाकारें होती। यांचें सर्वांशीं प्रकृती कारण ॥ ९५ ॥ ऐसे महर्षि थोर थोर। तेहीं केला असे हा निर्धार। अथवा षोडश जे कीं विकार। कार्य चतुर यातें म्हणती ॥ ९६ ॥ आणि ज्या कीं प्रकृती विकृती। तयातें कारण ऐसें म्हणती। इहुकियांचें कारण मुख्य प्रकृती। आणि सर्वांशीं ऐसें एक ॥ ९७ ॥ (चित्सदानंदलहरी). २. चित्+अंश=चैतन्याचा अंश (जीव.) ३. चिदंश भोक्ता='मुंडासा दुखविला अचेतन। परि भोग जाणें मस्तक सुचेतन। तैसा देहीं भोग भोगी मन। परि तें अचेतन भोग पुरुषातें ॥ ५६ ॥ 'ममैवांशो जीव' म्हणोनी। पंचदशी या श्लोकापासूनी। भोक्तृत्व आपल्या चिदंशातें स्फुट करूनी। भगवंत बोलिले ॥ ५७ ॥ परंतु भोग देहाविना। अर्जुना सर्वथा घडेना। केवळ आत्मया निरंजना। न घडती भोग ॥ ५८ ॥ आंगास लावावें चंदन। तैसे भोग इंद्रियद्वारा घेतें मन। तथापि देह जड तैसें मन अचेतन। भोग पुरुषा आत्मयातें ॥ ५९ ॥ भोग आत्मयातें परी। भोग घडती अवघे शरीरीं ॥ त्यास हेतु म्हणे श्रीहरी। बोलिजे तो पुरुष हा ॥ १०६० ॥ चंदनें चर्चिलें शव। परि भोगवेणें निर्जीव। जीव असतांही भोग निभव। त्याच देहीं ॥ ६१ ॥ एवं पुरुषाचा योग। तोंचि वरी देहास भोग। म्हणुनि भोक्तृत्वीं हेतु बोले श्रीरंग। कीं तत्त्वता भोक्तृत्व पुरुषातें ॥ १०६२ ॥ [यथार्थदीपिका–अ० १३] ४. 'प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः। अहंकार विमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥ २७ ॥' कर्मांच्या ठायीं ज्यांची आसक्ति आहे, अशा अज्ञजनांच्या बुद्धीचा भेद विद्वानानें करूं नये। स्वतः योग्य रीतीनें कर्में आचरून, त्यांच्या ठायीं सर्व कर्मांची आवड उपजेल असें करावें ॥ [सुबोधचंद्रिका–गीता अ० ३ श्लो० २७.] ५. चिदंश सुखदुःख भोगितो असें सांगितलें (श्लो० ४४) यावरून चित्स्वरूपास (परमात्म्यास) भोक्तृत्व

त्याला विटाळ म्हणवे न सुखासुखाचा सर्वात्मयोगनिपुणासहि भोग कैंचा?॥४५

[2]जेथें चिदंश [3]मन [4]इंद्रियभोग तेथें हा [5]धर्म [6]वर्णिति [7]जडाजड सर्व जेथें, ।

[8]ऐशास दुःखसुखभोग घडेल कैसा? श्रीसूर्य[9] हा मृगजळांत बुडे न जैसा.॥४६

प्रारब्धकर्म फळ तें तरि सर्व भोगी, [10]साक्षी तथापिहि अहो! जगदात्मयोगी, ।

हा निर्णय [11]प्रकरणीं पुढिल्या [12]मुरारी बोलोनियां हरिल संशय [13]दुःखहारी.॥४७

अध्याय हा रचियला तिसरा [14]परेशें [15]आत्मैक्यवांचुनि न [16]लिंपति [17]भोगलेशें, ।

अध्यायनाम इतुक्यास्तव **'भोगतत्व'** ज्ञानी अलिप्त कळतां जगदात्मकत्व.॥४८

आहे कीं काय अशी शंका उद्भवते, तिचें निवारण ४५ व्या श्लोकांत केलें आहे. ६. आत्मानुभव आहे ज्यास त्याला.

१. चिदंशास भोक्तृत्व आहे असें ४४ व्या श्लोकांत सांगितलें व चित्स्वरूपास भोक्तृत्व नाहीं असें ४५ व्या श्लोकांत प्रतिपादिलें आहे. यांतील भेद या श्लोकाच्या प्रथम पादांत स्पष्ट केला आहे. २. चिदंश मन इंद्रिय यांचा संयोग जेथें आहे तेथें भोग आहे—अर्थात् जीवाला भोग आहे. 'प्रथम भोग इंद्रियातें । मग इंद्रियद्वारा मनातें । तथापि हीं जड म्हणोनि अंशातें । भोग म्हणे गीताकर श्रीकृष्ण ॥ ५२० ॥ अंश म्हणतां नारायणें । प्रतिबिंबांश बोलिला ॥ ४७३ ॥ एवंच अंशास बंधत्व । तो प्रतिबिंबांश भोक्ता बोलावा ॥ ४५८ ॥ तो अंश पावला जीवत्व । जीवोपाधींत भगवंत बोलतो ॥ ४५९ ॥ [यथार्थदीपिका–अ० १५]. ३. 'मन इंद्रियें मिळोनी । लिंगदेह होतो त्यांतूनी । * * * * ॥ ४८३ ॥ मन म्हणतां चित्त बुद्धी । त्यांचीही झाली अर्थसिद्धि । एवंच जीवोपाधि प्रसिद्धी । देहाकृतींत असे ॥ ४८४ ॥ [यथार्थदीपिका–अ० १५]. ४. जीवोपाधि आणि जीव यांचा संयोग. ५. चिदंश, मन व इंद्रियें यांचे संयोगाची स्थिति; या श्लोकाचे प्रथम पादांत वर्णिलेला धर्म. ६. वर्णिता यांचें कर्म 'धर्म.' ७. जड (मन+इंद्रियें)+अजड (चैतन्य) जडाजड हा 'वर्णिती' या क्रियापदाचा कर्ता. ८. ज्या परमात्म्यांचे ठिकाणी, ज्या परमात्म्याचे ठायीं. ९. परमात्म्यास. १०. सुखदुःखानें लिप्त न होतां ४० व्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें त्यांचा अनुभव घेणारा. ११. पुढच्या अध्यायांत (भोक्तृत्व अध्यायांत). १२. अध्याय १ श्लो० ५ पहा. १३. दुःखापासून मुक्त करणारा (मुरारि). १४. परमेश्वरानें. (अध्याय १ श्लो० २-६ पहा.) १५. जीवात्म्याचें आणि भोगाचें ऐक्य मानिल्याशिवाय. १६. लिप्त होत नाहींत. आत्म्यानें आणि भोगानें ऐक्य न मानिल्यास सुखदुःख भोग नाहीं—असें तात्पर्य. १७. अल्प सुखदुःखानें. या तृतीय अध्यायाचें शेवटीं 'इति श्रीकर्मतत्वे भोगतत्वं नाम तृतीयोऽध्यायः' असा लेख आहे.

अध्याय चवथा.

भोक्तृत्व.

(श्लोक.)

आत्मा [1]अलिप्त [2]सुख दुःख तया न जेव्हां, प्रारब्धभोग घडती कवणासि तेव्हां ? ।
हा देह नित्य [3]शव तो सुखदुःख नेणें या गोष्टिचा [4]उकल एक हरीच जाणें. ॥
जों [5]ज्ञानियासि [6]जगदात्मकता कळेना [7]संसारबंध हृदयांतुनि तों [8]ढळेना; ।

---

१. आत्मा=कूटस्थ असें ज्यास म्हणतात तो. "कीं आत्मा होय चित्स्वरूप । त्याचेंचि या देहीं द्विविध रूप । एक सर्वां रूपीं व्यापक अरूप । एक प्रतिदेहीं वेगळें ॥ ३८५ ॥ सर्वां घटीं एक आकाश । परी घटजळीं प्रतिबिंबें दुजे अवकाश । तैसा सर्वेच चिदात्मा अनंत स्वप्रकाश । सत्त्वजळीं प्रतिबिंबांश वेगळें ॥ ८६ ॥ एक सर्वां घटीं आकाश । परि घटीं त्यास म्हणती घटाकाश । तैसा प्रतिशरीरीं व्यापक स्वप्रकाश । कूटस्थ म्हणती प्रतिदेहीं तयातें ॥ ८७ ॥ आणि घटीं जळीं प्रतिबिंबलें । प्रतिबिंबांश म्हणती त्याला । 'ममैवांशो जीवलोके' म्हणूनि ज्याला । पंचदशी भगवंत भोक्ता म्हणेल ॥ ८८ ॥ प्रस्तुतीं सर्वगत चित्स्वरूप उपासिती । म्हणूनि म्हणे श्रीपती । तो कूटस्थ म्हणतां उडती । संदेह भोक्तृत्वाचे तयाचे ॥ ८९ ॥ कीं कूटस्थ चैतन्य अचळ । न चळे होतां देह चंचळ । घट हालतांही निश्चळ । घटीं जैसा घटाकाश ॥ ९० ॥ कीं घट हालतां हाले जळ । तैसें अंतःकरण देहयोगें होतां चंचळ । चिदंश प्रतिबिंब त्याचीच डळमळ । सुखदुःख भोगाची ॥ ९१ ॥ चंचल नव्हे घटाकाश जैसा । सुखदुःख भोग वर्जित कूटस्थ तैसा । अनुभवी जाणती सिद्धांत ऐसा । श्रुति पुराणें गीता बोलती ॥ ९२ ॥ [यथार्थदीपिका—अध्याय १२]. २. लेपरहित, निराळा, भिन्न, संगरहित. 'यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते । सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ ३२ ॥ जसें आकाश सर्वत्र पसरलेलें असतांही कशालाही चिकटलेलें नाहीं, म्हणून त्याला डाग नाहीं, तसाच आत्मा देहामध्यें सर्वत्र व्यापून राहिलेला असतांही, निःसंग आहे, म्हणून त्याला कशाचाही लेप नाहीं ॥ ३२ ॥ [सुबोधचंद्रिका—अ० १३ श्लो० ३२]. 'जैसा सर्वगत आकाश । लिप्त नव्हे कोठें लेश' । इत्यादि ओव्या (यथार्थदीपिका—अ० १३ ओव्या १३४९-१३५५) वाचकांनी अवश्य पहाव्या. ३. शव=ज्यास ज्ञान (जाणीव) नाहीं असा जड. यथार्थदीपिका—अध्याय २ ओव्या ३३८-३४१ ह्या अवश्य पहा. तसेंच अध्याय ८ ओव्या ८१३-८१९ पहा. ४. उलगडा. ५. आत्मा ज्यांस कळला आहे ते. "मैत्रेयीप्रति याज्ञवल्क्य निगमीं विस्तार हा बोलिला, कीं ज्यालागि समस्तही प्रिय असा आत्माच हा आपला; । जो कां आवडतो निमित्त नसतां तो जाणसी तेथवां, कांहीं हा तुज जाणणेंचि न उरे सर्वेश तूं तेधवां. ॥ २७ ॥" ६. अद्वैतबोध, अनन्यबोध. [यथार्थदीपिका—अ० १२ ओव्या ५२०-५३५ पहा.] ईश्वर हाच जगताचा आत्मा (उपादान कारण) आहे ही गोष्ट. ७. भवबंध, जन्ममरणांचा फेरा. [यथार्थदीपिका—अ० १२ ओव्या ५४४-५४७ अ० १४ ओवी ३०६-३०८] ८. निघेना, सरेना.

चैतन्य[1] जें वेळखिलें[2] चिदचिद्विवेकें[3] तें तों फिरे जड[4]शरीर[5]पुरें अनेकें. ॥ २
चैतन्य केवळ शवासहि[6] जें प्रकाशी तें देखिल्यावरि[7] नव्हे मग एकदेशी; ।
त्यालागीं[8] देखति[9] तदात्मकतें[10] करोनी त्याला[11] न भोग जगदात्मक[12] तें म्हणोनी. ॥ ३
विश्वात्मता[13] अनुभवी[14] मग भोग त्याला[15] संसारदुःखसुख केंवि घडेल बोला? ।
प्रारब्धभोग[16] तरि त्यासहि तो सुटेना संदेह कृष्णकरुणेविण हा फिटेना. ॥ ४

---

१. चैतन्य त्रिविध आहे असें प्रतिपादन केलेलें आहे. या तीन भेदांतून प्रतिबिंब भेदास उद्देशून येथें चैतन्य शब्द योजिला आहे. तें एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत असें अनेक शरीरांत फिरतें. 'आकाशस्थ यथा भेदस्त्रिविधो दृश्यते महान्। जलाशये महाकाशः स्यादवच्छिन्न एव हि ॥ १ ॥ प्रतिबिंबाख्यमपरं दृश्यते त्रिविधं नभः । बुद्ध्यवच्छिन्नचैतन्यमेकं पूर्णं तथा परम् ॥ २ ॥ आभासस्त्वपरं बिंबभूतमेव त्रिधा चितिः । आभासबुद्धेः कर्तृत्वमविच्छिन्नेऽविकारिणि ॥ ३ ॥ [ब्रह्मांडपुराण.] टीका='त्रिभेद आकाशाचा । त्यांत महदाकाश एक साचा । मल जळास व्यापूनि असे जळाचा। प्रसर जेथवरी असे त्या आकाशी ॥ ११८ ॥ प्रतिबिंबला त्या जळीं । तो तिसरा जो डळमळी । ऐसें चित्स्वरूपीं केवळी । त्रिविध भेद ॥ ११९ ॥ बुद्धीमध्यें प्रतिबिंबालाचि देश । त्या बुद्धिजळीं व्यापक जो बिंबांश । तें बुद्ध्यवच्छिन्न चैतन्य जैसा जळीं आकाश । तैसें बुद्धीत चैतन्य कूटस्थ तो जाणावा ॥१२०॥ तेंचि चैतन्य सर्वगत । महदाकाश जैसा सर्वत्र । आणि घटीही अनुगत । तें पूर्ण चैतन्य वेदविहित । प्रतिबिंब जैसें बुद्धिजळीं ॥ ॥ १२१ ॥ [यथार्थदीपिका—अ० १३]. "सुषुप्तिकाळीं आणि जागरीं । प्रथम मन इंद्रियें प्रगटवी बरीं । मग जो सत्त्वांश तदंतरीं । त्यांत चिदंश प्रतिबिंबतो ॥ ४८२ ॥ हा अंश मन इंद्रियें । आकर्षितो स्वयें । हा अर्थ न घडे निश्चयें । देहांतरासि आकर्षितो हाचि अर्थ ॥४८३॥ एवं देहांतरास जातो । तेव्हां बंध आपला आपणासवें नेतो । तोंपर्यंत मन इंद्रियादि बंध घेऊनि असतो । प्रकृतींत म्हणिजे देहाकृतींत ॥ ४८४ ॥ [यथार्थदीपिका—अ० १५.] २. कळलें, ज्ञात झालें. [यथार्थदीपिका—अ० १८ ओवी ३११६.] ३. चित्+अचित+विवेकें=चैतन्य आणि जड यांच्या विचारानें, व्यतिरेकज्ञानानें. जडचैतन्यविवेकाचें विवरण पंडितांनी यथार्थदीपिका अ० २ ओव्या २९०-३४७ यांत केलें आहे. ४. श्लो० १ यांतील 'शव' शब्दावरील टीप पहा. ५. देह. ६. जड देहाला. ७. चैतन्य देखिल्यावर तो ज्ञानी एकदेशी (सर्वात्मबोधरहित असा) नसतो; तर विश्वात्मतेचा अनुभव आहे असा होतो. [यथार्थदीपिका—अ० १५ ओव्या २८२-२८७.] ८. त्या चैतन्यास. ९. ज्ञानी देखति (पाहती)—असा अर्थ. १०. अभिन्नभावानें, चैतन्य आणि आपण भिन्न अशा दृष्टीनें. ११. चैतन्याला, सर्वगत जें चैतन्य त्याला, आपण चैतन्यरूप आहों—असा बोध ज्यास झाला त्याला. १२. सर्वगत, सर्वव्यापी. (श्लो० २ पहा.) १३. जगदात्मता. (श्लो० २ टीपा पहा.) १४. [ज्ञानी] विश्वात्मता अनुभवी (अनुभव घेतो—असा प्रयोग समजावा.) १५. ज्ञानी पुरुषाला. १६. प्रारब्धभोग याविषयीं पुढील उतारा पहाः—"संचितांतूनि अपजीवन । आरब्ध करी नूतन । तें मक देह जन्ममरण । तोंवरि भोग तो सुखदुःखाचा ॥ ११४० ॥ स्वप्न जीव शंकित ।

विश्वात्मते करुनि दे स्वजनासि मोक्षीं श्रीकृष्ण तो हरिल हा दृढ पूर्वपक्ष. ।
विश्वात्मता हरिस बिंबसुखस्वरूपें त्यालाचि जीवपण चित्प्रतिबिंबरूपें. ॥ ५

अपंच ईश्वर शक्तिरक्षित । प्रपंच फल भोगणें निश्चित । प्रारब्ध कर्में ॥ ११४१ ॥. तेव्हां ईश्वरशक्तिकृत । प्रारब्धफल निश्चित । न टळे भोगिल्याविरहित । शास्त्र सन्मतीं म्हणोनी ॥ ११४२ ॥ [यथार्थदीपिका–अध्याय २].

१. अद्वैतबोधानें, आत्मज्ञान देऊन. २. देतो. ३. स्वभक्तांला. ४. मुक्ति. मुक्तिलाभाला विश्वात्मतेचा बोध होणें अवश्य आहे. हा बोध ईश्वरकृपेनेंच भक्तांस व्हावयाचा असें येथें दर्शविलें आहे. 'भक्तस्तुति.' आत्मा प्रकाशक जडासि असें कळावा, आयास काय परि जो वरि देवराया ! । नारायणा न भजती, स्थिति त्यांस नाहीं, हा शब्दबोधचि, न सिद्धि तयांत कांहीं ॥ ५५ ॥ अतर्क्य महिमा जरी, तरिहि तूं निजात्मा हरी ! प्रकाशक मनीं स्फुरे, मन मुरे तथा भीतरीं; । तथापि तव भक्तिनें तव अनुग्रहें या पदा, प्रपन्नजन पावती, इतर भोगिती आपदा. ॥ ८१ ॥. ५. ग्रंथरचनाकार. हें कर्तृत्व पंडितांनी ईश्वराकडे संपविलें आहे. [अ० १ श्लो० २१५६.] ६. हें तृतीय पुरुषी क्रियापद असून त्याचा कर्ता 'श्रीकृष्ण.' ७. निःशेष हें क्रियाविशेषण आहे. 'पूर्वपक्षा'चें विशेषण नव्हे. ८. कोणत्याही वादांत दोन पक्ष असतात–पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष. दुसऱ्यानें उत्तर देऊन समाधान करावें अशा हेतूनें प्रथम केलेला जो प्रश्न तो पूर्वपक्ष. यांत शंकारूप प्रश्न असतो हा पूर्वपक्ष या अध्यायाच्या पहिल्या चार श्लोकांत संनिविष्ट केला आहे. आत्म्यास अलिप्तपणामुळें व देहास जाणीव नसल्यामुळें सुखदुःखभोग संभवत नाहीं, तेव्हां भोक्तृत्व कोणास आहे ? तसेंच चिदचिद्विवेकानें कळणारें जें चैतन्य तें जगदात्मक असून त्या चैतन्यास आत्मस्वरूपानें पाहणारे (अतएव विश्वात्मतेचा अनुभव घेणारे) जे ज्ञानी त्यांस सुखदुःखभोग संभवत नाहीं. हें जर खरें आहे तर ज्ञान्याहीं प्रारब्धभोग आहे असें म्हणतात हें कसें ? याप्रमाणें येथें पूर्वपक्ष आहे. ९. श्लो० ५ उत्तरार्ध यापासून तों श्लो० १९ यांत जें प्रतिपादन केलें आहे त्याचा सारांश असा:–विश्वात्मा (ईश्वर) बिंबस्वरूप असून तोच प्रतिबिंबरूपानें 'जीवात्मा' झाला आहे. (श्लो० ५). सत्वगुणी बुद्धि हा 'जीवोपाधि' उदकरूप होय. त्यांत हें प्रतिबिंब प्रकट होतें. हा उपाधि प्रलयकालीं नसतो, यास्तव प्रलयकाळीं जीवपणें निराळीं नसतात. तसेंच सुषुप्तिकालीं (झोपेच्या वेळीं) तें उदक तमोगुणरूप चिखलानें गढूळ होतें यामुळें त्यांत प्रतिबिंब वठत नाहीं. याप्रमाणें प्रलयाचे आणि सुषुप्तीचे वेळीं बिंबाचें आणि प्रतिबिंबाचें ऐक्य असतें. सृष्टिकालीं उपाधि उठतो त्यावेळीं आणि झोपेंतून जागा झाल्यावर जलरूप बुद्धि नितळ (स्वच्छ) होते, त्यावेळीं तीं प्रतिबिंबें वेगळीं प्रकट होतात. (श्लो० ६.) त्या प्रतिबिंबास सुखदुःखभोग घडतो. (श्लो० ७.) त्या प्रतिबिंबरूपानेंच ज्ञानी पुरुष प्रारब्धभोग अनुभवतो (श्लो० ८.) सुखभोगाचे वेळीं ज्ञान्यास जीवपणा नसतो, तथापि त्यास दुःखभोगाचे वेळीं 'मी दुःखी' अशी प्रतीति असतेच (श्लो० १५-१६). परंतु 'विश्वात्मता अनुभवीं स्थिरता' असल्यामुळें ज्ञान्यास भोक्तृपण नाहीं. (श्लो० १९.) १०. चैतन्यस्वरूप जो ईश्वर त्याला. 'वाईट वितर्क परिहरी । म्हणूनि हरितो हरी । त्यातें

जीवासि त्या प्रलय आणि सुषुप्तिकाळीं बिंबैक्य केवळ न जीवपणें निराळीं; ।
तीं वेगळीं प्रगटती उठतां उपाधी कीं जागरीं नितळतां जळरूपबुद्धी. ॥ ६
बुद्धी अनेक उदकें घटरूप देहीं भासे अनेकजळिं एकचि बिंब तेंही, ।
बिंबीं मिळोनिहि पृथक् प्रतिबिंब होतें, प्रारब्धभोगसुखदुःख घडे तयातें. ॥ ७ ॥
प्रारब्धभोग निजपूर्विल पुण्य पापें आत्मत्व मीपण तई प्रतिबिंबरूपें, ।

देव अनुसरती ऐशी हरी । टीका श्रुतिच करी हरिनामाची. ॥ ५७९ ॥ हरितो जो तो हरी। श्रुति इतकेंच बोले परी । वाईट तितकें परिहरी । ऐसें तो न बोले जरी म्हणावें ॥ ५८० ॥ तरी वाईट की बरें । हरायास नसे तिसरें । तेव्हां वाईट तितकें हरी सारें । हें स्वयेंचि साधतें ॥ ५८१ ॥ आतां बरेंही हरितो । ऐसें म्हणतां अर्थचि न घडे तो । कीं सूर्य तमातेंचि संहरितो । प्रकाशही हरितो न म्हणवे ॥ ५८२ ॥' [यथार्थदीपिका—अध्याय ८.] ११. बिंबरूप चिदात्मा विश्वाचें कारण आहे आणि तोच उपाधियोगानें प्रतिबिंबरूपानें जीवात्म्याचें कारण आहे. प्रलयकाळीं आणि सुषुप्तिकाळीं जीवात्मा आणि चिदात्मा अभिन्न नसतात, प्रतिबिंब जीवात्मा बिंबरूप चिदात्म्याशीं ऐक्य पावतो. ज्याचें प्रतिबिंब उठतें तें बिंब होय. १२. यथार्थदीपिका—अ० ८ ओंव्या ५८३-५८५ पहा. १३. जीवस्वरूपाची प्राप्ति. 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' गीता—अध्याय १५ श्लो० ७ पहा. १४. चैतन्य हें बिंब आहे आणि त्याचें जें बिंब पडतें तें शुद्ध प्रतिबिंब आहे. यथार्थदीपिका—अध्याय १२ ओंव्या १४४९-१४५५.

१. प्रलय=सृष्टिसंहार, ब्रह्मदेवाची रात्री. [यथार्थदीपिका—अ० ८ ओंव्या ८१५-८२०.] २. सुषुप्ति=निद्रा. 'अतिनिर्मळ सत्वजळ । तमकर्दमीं होय गढळ । त्यास म्हणावें सुषुप्तिकाळ बिंबैक्य तेव्हां प्रतिबिंबा ॥' [यथार्थदीपिका—अ० २ ओंवी ११७३.] ३. काळीं=प्रलयकाळीं आणि सुषुप्तिकाळीं. ४. बिंब आणि प्रतिबिंब यांचें ऐक्य, परमात्मा आणि जीवात्मा यांचें ऐक्य. [यथार्थदीपिका—अ० २ ओंवी ५५५.] ५. अत्यंत. ६. जीवरूपें. जीवपणें निराळीं न (नाहींत)—असा अन्वय. ७. तीं जीवपणें. ८. उत्पन्न होतात. सृष्टिकाळाचे आरंभीं जेव्हां सत्वोपाधि प्रकट होतो तेव्हां. ९. गीता—अध्याय ७ श्लो० ४-५ टीका पहा. [यथार्थदीपिका—अ० ७ श्लो० २५८.] १०. झोंपेंतून जागा झाल्यावर. ११. स्वच्छ, निर्मळ होते तेव्हां. [यथार्थदीपिका—अ० १५ श्लो० ४७८-४८०.] १२. घटरूप शरीरांत बुद्धि ही जळरूप आहे. १३. अनेक घटरूप देहीं बुद्धी उदकें (ज्यांच्या योगानें) एकचि बिंब (चैतन्य) अनेकजळीं भासे, तेंही प्रतिबिंब (प्रलयकाळीं, सुषुप्तिकाळीं आणि ज्ञानी बिंबात्मतेचा अनुभव घेत असण्याच्या काळीं) बिंबीं मिळोनिहि पृथक् होतें, तयातें प्रारब्धभोग सुखदुःख घडे—असा अन्वय. १४. 'चिदंश पूर्वीच ब्रह्मभूत परी । प्रारब्धभोगाची होती उरी । म्हणूनि भोक्ता चिदंश संसारी । भोगकाळीं जळीं प्रतिबिंबे बुद्धीच्या ॥ ९६ ॥ जेव्हां सुखदुःखभोग । तेव्हां बुद्धीतचि प्रतिबिंबयोग । कीं चिदंशा वांचुनि भोगसंयोग । न घडे जडांशा मन आदिकां ॥ ९७ ॥ होता प्रारब्धें देह जिवंत । तेव्हां ही ब्रह्मांशला होताच तरी ब्रह्मभूत । परंतु भोगकाळीं बुद्धींत । प्रगट होत होता चिदंश तो ॥ ७ ॥ तरंग सागरीं मुरे । ऐसी लक्षीं वृद्धि शिरे ॥

बिंबात्मता अनुभवी सकलात्मयोगी, भोगासि तो प्रतिमुखात्मपणेंचि भोगी. ॥ ८
सर्वां घटीं गगन तें सहसा न हाले, त्याचेंचि त्या घटजळीं प्रतिबिंब डोले; ।
आत्मा असा द्विविध बुद्धिजळांत देहीं एकासि भोगफळ, सर्वगतासि नाहीं.॥९
आधीं जडाजडविवेक कळे जयासीं, चैतन्य हें द्विविधही उमजे तयासीं; ।
व्यापोनि मीपण असे प्रतिबिंब देहीं सर्वत्र बिंबचि तसें प्रतिबिंब नाहीं. ॥ १०
बिंबात्मता गुरुमुखें समजोनि योगी होऊनि, भोगसमयीं प्रतिबिंब भोगी; ।
प्रारब्धवायु करि चंचल बुद्धि जेव्हां पाण्यांत त्या डळमळी प्रतिबिंब तेव्हां.॥ ११

परंतु प्रारब्धवायु जेव्हां संचरे । तेव्हां तरंग उठे मागुतीं बुद्धीचा ॥ ८ ॥ उठे बुद्धीची लहरी । तेव्हां प्रतिबिंबे चिदंश तीभीतरी । भोग सरे तोंवरी । चिदंश पडे वेगळा ॥ ९ ॥ ज्ञान दृष्टी ज्ञानी । ये वेळे भोक्ता प्रगटला म्हणोनी । जाणती हें वर्म अज्ञानी । न जाणती ऐसें पंचदशीं देव म्हणे ॥ १० ॥ पंचदशाध्याय श्लोक—'उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥' मागें या श्लोकाची टीका । विशद समर्पिली श्रीशेषपर्यंका । प्रस्तुत प्रसंग हाच इतुका । कीं भोक्त्यातें न देखती मूढ देखती ज्ञानी ॥११॥ भोग आतां भोगितो । आतां गुणान्वित तो । जैसा जैसा असतो । तैसा तैसा ज्ञानदृष्टी पाहती ॥ १२ ॥ म्हणे भगवंत ये रीति । एवं ज्ञानियातें भोगितां पाहती । मूढ देहात्मता मानूनि भोगिती । प्रारब्ध फळें ॥ १३ ॥ प्रस्तुतीं ऐसा प्रसंग । कीं प्रवेश अंतररहित बोले श्रीरंग । कीं सरतां प्रारब्ध तो निःसंग । प्रवेशतो ऐसा कीं अंतर नसे ॥ १४ ॥ प्रारब्ध असतां जो प्रवेश । तो भोगकाळीं चिदंशास लेश । अंतर करी म्हणूनि हा गुह्योपदेश । प्रारब्ध सरल्यानंतर प्रवेशाचा ॥ १५ ॥ अंतर नसे जैसें । तें प्रवेशणें अर्जुना तैसें । बोले भगवंत ऐसें । म्हणतां विशते तदनंतर ॥ १६ ॥ एवं ततो म्हणजे त्या उपरी । प्राप्तीची सीमा जालियावरी । प्रवेशतो ऐसा तदंतरी । कीं जैसें निरंतर ॥ १७ ॥ जे क्षणीं प्रारब्ध सरे । भोगणें कांहीं नुरे । तेव्हां चिदंश कां संचरे । उपाधींत ॥ १८ ॥ [यथार्थदीपिका—अ० १८ ओंव्या २०९६-२११८.] १५. प्रारब्धभोगरूप निजपूर्विल पुण्यपापें (जी त्यामुळें) तई (भोगाचे वेळीं) प्रतिबिंबरूपें (रूपानें) आत्मत्व मीपण (प्राप्त होत्साता) बिंबात्मता अनुभवी (असा जो) सकलात्मयोगी तो प्रतिमुखात्मपणेंचि (प्रतिबिंबरूपानेंच) भोगासि भोगी (भोगितो)—असा अन्वय.

१. आकाश. २. हाले. ३. चैतन्य. ४. दोन प्रकारच्या. (कूटस्थ आणि जीवात्मा.) ५. जीवात्म्यास. जसें घटांतील आकाशास चंचलतेचा भोग असतो, तसें देहगत प्रतिबिंबरूपानें असणाऱ्या आत्म्यास भोग असतात. ६. जडचैतन्यविवेक. (श्लोक २ यावरील टीपा पहा.) ७. कूटस्थ आणि जीवरूप. ८. कळतें. ९. प्रतिबिंब सर्वत्र नाहीं—असा अन्वय. १०. बिंबैक्य, परमात्मा आणि जीवात्मा यांचें ऐक्य. ११. ज्ञानी. 'चित्तचैतन्ययोग । तो मुख्यत्वें म्हणावा योग । ज्या योगीं वियोग । अन्यपणाचा ॥' [यथार्थदीपिका—अ० १३ ओ० ६९७.] १२. प्रतिबिंब होऊनि—असा अन्वय. १३. यथाकालीं. १४. हें 'भोगी' या क्रियापदाचें कर्म. १५. नीर.

बिंबात्मता अनुभवि स्वसुखांत जेव्हां प्रारब्ध दुःखसुखभोग न त्यास तेव्हां; ।
चांचल्य बुद्धिस घडे सुखदुःख भोगें तेव्हां सचेतनपणें प्रतिबिंबयोगें. ॥ १२
बुद्धीमधें प्रतिमुखें जगदादिकाळीं भोगानिमित्तचि जशीं निघती निराळीं; ।
बिंबात्मबुद्धिजळ चंचळ होय जेव्हां भोगार्थ हें डळमळी प्रतिबिंब तेव्हां. ॥ १३
प्रारब्धवायु करि बुद्धि जळांत ऊर्मी त्या मीपणीं गमतसे असुखी सुखी मी; ।
नाहींच यद्यपि अहंकृति योगियाला दुःखांत मीपण अवश्य दिसे तयाला. ॥ १४
वाटे न मीपण तया सुख भोगरूपीं, पाहे सुखें सकळही स्वसुखस्वरूपीं, ।
दुःखें मृषा परि न भोग चुकेचि ते मी, दुःखी म्हणोनि करि बुद्धिजळांत ऊर्मी. ॥ १५

---

१. बिंबात्मतेचा अनुभव घेतो. २. आत्मानंदांत. ३. ज्ञान्यास, योग्यास. ४. जेव्हां बुद्धीस चांचल्य घडे, तेव्हां प्रतिबिंबयोगें सचेतनपणें सुखदुःख भोगें (भोगतें). ५. बुद्धिरूप उदकामध्यें. ६. प्रतिबिंबें. ७. सृष्टिकाळीं. ‘अगा ब्रह्मांडाच्या दिवसाचा आगम । होतां सकळां भूतां उगम ।’ [यथार्थदीपिका–अ० ८ ओ० ८०८.] ८. बिंबात्मा ज्या बुद्धीनें जाणला आहे म्हणजे सर्वात्मबोध ज्या बुद्धीला झाला आहे, जी बुद्धि बिंबीं प्रवेशिली आहे. ‘तरी बुद्धि प्रवेशतां बिंबीं । प्रतिबिंब बिंबास अवलंबी । कीं सत्त्वोपाधि जळकदंबीं । असणें प्रतिबिंबांशा जीवाचें ॥ १ ॥ नदीजळीं नदीतीर । प्रतिबिंबे परंतु तेंची नीर । तीर बुडवूनि जेव्हां धरी पसर । प्रतिबिंब जळीं तीराचें दिसेना ॥ २ ॥ ते स्वयें तीरींचें कडेच दिसती जळीं । तेव्हां प्रतिबिंब त्यांचें जळीं न डळमळी । तैसें चित्प्रतिबिंब निर्मळीं । सत्त्वीं समाधीं गमसेना ॥ ३ ॥ जेव्हां बिंबीं बुद्धिप्रवेश । तेव्हां प्रवेशेच प्रतिबिंबांश । ‘निवसिष्यसि अत ऊर्ध्वं’ म्हणे हृषीकेश । तरी बुद्धि प्रवेशींच प्रवेश त्याचा देखिला ॥ ४ ॥ बुद्धि जड तिचा होतां प्रवेश । काय न प्रवेशतां वेगळा राहों शके चिदंश । परि बुद्धि निघतां प्रारब्ध भोगीं प्रकाश । चैतन्य प्रतिबिंबाचा ॥ ५ ॥ बुद्धि सोडी बिंब । तेव्हां बुद्धीमध्यें प्रतिबिंब । तीर उघडें पडतां विलंब । नसे प्रतिबिंब तटाचें पडावया ॥ ६ ॥ जडास भोग न घडे । भोग लागला चैतन्याकडे । भोगीं ज्ञानियाच्याही बुद्धीत पडे । प्रतिबिंब ॥ ७ ॥ तैसी प्रवेशतां बुद्धी । प्रतिबिंबातें प्रवेश सिद्धी । बुद्धी निघतां भोगाची समृद्धी । बुद्धींत घडे प्रतिबिंबातें ॥ ८ ॥’ [यथार्थदीपिका–अ० १९ ओवी ६२६-६३३.] ९. लाट, तरंग. १०. जरी. ११. अहंकार. १२. आत्मानंदांत, समाधिसुखांत, विषय आणि इंद्रियें या व्यतिरिक्त जें सुख आहे तें आत्मसुख (आत्मानंद). ‘विषय इंद्रियांरहित । सुख आहे निश्चित । हें जाणती पंडित । अनुभवी जे ॥ २३७ ॥ सुषुप्तीसारखें सुख । प्रपंची नसे आणिक । इंद्रियविषयांचें सुख । न मिळे तया सुषुप्तींत ॥ २३८ ॥’ [यथार्थदीपिका–अ० २]. १३. मिथ्या. सुखें आणि दुःखें हीं दोन्हीं ज्ञान्याच्या दृष्टीनें मिथ्याच होत, यास्तव सुख होत असतां ज्ञानी पुरुष आपल्या बुद्धीला चंचळ होऊं देत नाहीं, परंतु दुःखभोग होत असतां ‘मी दुःखी’ असें त्याच्या बुद्धीस वाटतें आणि ती चंचळ होते. १४. परंतु १५. लाट.

वाटे सुखी म्हणुनि त्यास सुखीं तथापी पाहे सुखें सकळ [1]आत्मसुखस्वरूपीं; ।
दुःखी सुखी [2]म्हणुनि हे न चुके प्रतीती नाहीं प्रतीति तरि भोगचि ते न होती. ॥ १६
भोगीं प्रतीति न चुकेचि [3]अहंकृतीची तेंव्हां उठे [5]अवचितें लहरी [6]मतीची; ।
त्या [7]मीपणासि अवलंबुनि पूर्वपापें योगी अहो अनुभवी प्रतिबिंबरूपें. ॥ १७
त्या मीपणेंकरुनि ज्या प्रतिबिंबरूपें जन्मांतरीं रचियलीं बहु पुण्यपापें, ।
त्या मीपणें सकळ तें प्रतिबिंब भोगी, बिंबात्मतेंकरुनि आतळती न योगी. ॥ १८
बिंबात्मता अनुभवीं स्थिरता जयासी [8]आत्मा गमे, न मग [9]चित्प्रतिबिंब त्यासी, ।
भोगोनि भोक्तृपण वास्तव त्यासि नाहीं देहीं असोनिहि अखंडचि तो [10]विदेही. ॥ १९
झालाचि बिंब [11]मग [12]हे प्रतिबिंबरूपें दुःखें सुखें अनुभवी जरि [13]पूर्व[14]पापें, ।
[15]बिंबात्मतेंतुनि निघे [16]प्रतिबिंब जेंव्हां जो बिंब ईश्वर तयासहि भोग तेंव्हां. ॥ २०
हा [17]पूर्वपक्षहि [18]उडे कळतां [19]उपाधी बिंबात्मता अनुभवी [20]परि [21]पूर्वबुद्धी ।

---

१. मी दुःखी किंवा मी सुखी—अशी प्रतीति (अनुभव) होते म्हणून. २. प्रतीति नाहीं तर ते भोगच नव्हत, जर भोग आहेत तर त्यांची प्रतीति असणारच. ३. अहंकाराची. हा अहंकार तीन प्रकारचा आहे, तामस, राजस आणि सात्विक. 'मी कृश मी स्थूल । इत्यादि तामस अहंकार कल्लोळ । मी पाहतों चाखतों हुंगतों हे खेळ । राजस अहंकाराचे ॥ २५६ ॥ मी ऐसें सर्व कल्पितों । मी ऐसा निश्चय करतों । विलास इत्यादि पाहतों । सात्विक अहंकार ॥ २५७ ॥' [यथार्थदीपिका—अ० ७.] ४. भोगकाळीं. ५. अकस्मात. ६. बुद्धीची. ७. अहंकारयुक्त बुद्धीनें. ८. सर्वांरूपीं व्यापक असून अरूप असें जें चैतन्य त्याला आत्मा म्हणतात. हा आत्मा स्वस्वरूपानें गम्य असतो. ९. चित्प्रतिबिंब न गमे—असा अन्वय. १०. जीवन्मुक्त, मुक्त होऊन जीवदशेचा अनुभव घेणारा असा, देह असून मुक्त असा. 'मुक्त जनकही देहीं विदेही । परी सुख दुःख भोगी देहीं । मुक्त होऊनि कांहीं । जीवदशेतें तो स्पर्शे ॥ ८५८ ॥' [यथार्थदीपिका—अ० ७.] ११. नंतर, बिंबस्वरूप झाल्यानंतर. १२. बिंबात्मता. 'अनुभवी' या क्रियापदाचा कर्ता. १३. पूर्वजन्मकृत, संचितरूपी. १४. पापाच्या योगानें. १५. सर्वगत जें चैतन्य त्यांतून. १६. जीवरूप चैतन्य. १७. श्लोक १० यांत दर्शविलेला पूर्वपक्ष. तो असा:— 'बिंब झाला असूनही जर ज्ञानी सुखें दुःखें अनुभवतो आणि बिंबात्मतेंतूनही प्रतिबिंब निघतें, तर बीजरूप जो ईश्वर त्यास सुखदुःखभोग आहे असें कां म्हणूं नये?' या शंकेचें निरसन श्लोक २१-२३ यांत पंडितांनीं केलें आहे तें असें:—'जीवोपाधि आणि ईश्वरोपाधि यांतील भेद कळला म्हणजे या शंकेचें निरसन होतें. जगदीशउपाधि नित्य मुक्त आणि सत्वगुणी आहे. (श्लो० २१.) त्यांत रजोगुण आणि तमोगुण यांचा योग नाहीं, म्हणून त्यास सुखदुःखभोग नाहीं. (श्लो० २१-२४.) चैतन्य आणि सत्वगुण या दोहोंमुळें 'जीवोपाधिवृत्ति' आणि 'जगदीशउपाधिवृत्ति' निर्माण झाली आहे हें खरें, परंतु या दोहोंत स्पष्टपणें भेद आहे (श्लो० २५.) 'ईशवृत्ती' सात्विक आणि विद्यामय अशी आहे आणि 'जीववृत्ती' त्रिगुणमिश्रित

[1]तो नि[2]त्यमुक्त [3]जगदीश उपाधिभेदें [4]लिंपे [5]कदापि न सुखें अथवा न [6]खेदें.॥ २१
[7]ज्ञानासि भोक्तृपण भोग जडासि नाहीं, तो भोग त्यासहि उपाधिविना न कांहीं;।
[8]जीवास [9]त्यांतहि [10]गुणत्रय भोग देती, [11]शुद्धा उपाधिकरितांचि न भोग [12]होती.॥ २२
[13]सत्वैकमात्र जगदीश उपाधि त्याला, कैसा घडे रजतमाविण भोग बोला? ।
बिंबासि भोक्तृपण याकरितांचि नाहीं, चैतन्य तों सहज केवळ होय तेंही.॥ २३
सर्वज्ञ [14]मात्र जगदीश उपाधिसत्वें [15]तोही अचेतन सचेतन [16]बिंबें [17]तत्वें, ।
त्याला रजोगुणतमोगुणयोग नाहीं, या दोंविणें न म्हणवे जड भोग कांहीं.॥ २४

असून अविद्यामय आहे. (श्लो० २६.) अविद्येचे भेद दोन, एक विक्षेप आणि दुसरा आवरण. अविद्या जरी नष्ट झाली म्हणजे तमोगुणरजोगुणरहित अशा शुद्ध सत्वरूप बुद्धीला ब्रह्मात्मता जरी कळली, तरी देहेंद्रियें असल्यामुळें प्रारब्धवायु त्या बुद्धीला चंचल करतो. त्यासमयीं रजोगुण आणि तमोगुण हे दोन्ही त्या सत्वांत मिसळतात. याप्रमाणें तमोगुण आणि रजोगुण 'जीवोपाधी'स विटाळ करतात. पण ते 'ईश्वरोपाधी'स स्पर्श करूं शकत नाहींत. (श्लो० २७-३३.) १८. खंडित होतो, नष्ट होतो. १९. उपाधिभेद कळला म्हणजे, जीवोपाधि आणि जगदीशोपाधि यांतील भेद कळला म्हणजे पूर्वपक्ष उडतो (खंडित होतो). उपाधि. (यथार्थदीपिका–अ० ७ ओंवी २२७-२७४.) मायेच्या योगानें ब्रह्माच्या ठिकाणीं दोन भेद झाले—एक 'अपराप्रकृति' व दुसरा 'पराप्रकृति'. ईश्वराची शुद्ध सत्वप्रकृति हीच पराप्रकृति होय. २०. तथापि ज्ञानी बिंबात्मता अनुभवी (अनुभव घेतो) तथापि–असा अन्वय. २१. ज्ञान होण्यापूर्वीची बुद्धि ज्ञानी बिंबात्मता अनुभवी परि. (तथापि पूर्वबुद्धिही तो अनुभवी-असा अन्वय. [यथार्थदीपिका–अ० ३ ओ० ५२१–५२५.]

१. जगदीश. २. ज्यास सत्व, रज आणि तम हे गुण बद्ध करूं शकत नाहींत तो अथवा ज्यास केलें नाहीं तो. ३. जीवोपाधीहून भिन्न असा जो जगदीशउपाधी त्यानें. ४. लिप्त होत नाहीं. ५. कधींही. ६. दुःखानें. ७. चैतन्य जें त्याला, आणीव जी तिला.' [यथार्थदीपिका–अध्याय १३–ओवी १६०-१६०.] ८. जीवरूप चैतन्यास. चैतन्य त्रिविध आहे. त्यांतून प्रतिबिंबरूप जें चैतन्य ती जीव होय. ९. उपाधींतही. येथें 'हि'शब्दानें जीवोपाधींत मात्र असें सुचविलें आहे. १०. सत्व रज तम हे तीन गुण [यथार्थदीपिका–अध्याय १४ ओंवी २९५-२९६.] ११. केवळ शुद्ध सत्वगुणी उपाधीला. १२. शुद्ध उपाधींला सुखदुःखभोग होऊं शकत नाहींत–असें तात्पर्य. १३. एक सत्वगुणीच, शुद्ध सत्वगुणी. १४. जगदीशउपाधि मात्र सत्वें सर्वज्ञ असा आहे, तसा जीवोपाधि नाहीं. १५. तो जगदीशउपाधी अचेतन जड आणि सचेतन चैतन्यस्वरूप असा दोन स्वरूपांनीं आहे. व्यतिरेकज्ञानानें जड आणि चैतन्य यामध्यें भेद आहे; परंतु अन्वयज्ञानानें त्यांत भेद नाहीं. [यथार्थदीपिका–अ० १८ ओं० ३१८०.] १६. जीव हें ज्याचें प्रतिबिंब तो बिंबरूप म्हणावयाचा. १७. वास्तविकपणानें.

चैतन्य तत्व परि वृत्ति न त्यासि कांहीं सत्वेंचि वृत्ति परि चित्पण त्यासि नाहीं;।
वृत्तीस दोनहि सचेतनता करीती शुद्धा तथापि जगदीशउपाधिवृत्ती. ॥ २५
विद्यामयें सकळ सात्विकवृत्तिरूपें बिंबें सचेतन अनंतसुखस्वरूपें, ।
आविद्यका त्रिगुणमिश्रित जीववृत्ती तीचा प्रकाश करि चित्प्रतिबिंब चित्तीं.॥२६
विक्षेप आवरण दोंपरिंची अविद्या ते नाशते प्रगटतां हृदयांत विद्या, ।
विद्याबळें अनुभवी निजबिंब आत्मा ते शुद्धसत्वमयवृत्ति भवाब्धिसीमा. ॥ २७
विक्षेप इंद्रियगणें विषयांसि जाणे तैसेंचि आवरण आपण कोण नेणे, ।
ऐसे रजोगुण तमोगुण शुद्धसत्वें टाकोनि बिंब धरिलें जगदात्मकत्वें. ॥ २८
विक्षेपआवरणरूप जरी अविद्या गेली मनीं प्रगटतां परमात्मविद्या ।
देहेंद्रियें असति तत्कृत पुण्यपापें सत्वासि आतळति तीं फळभोगरूपें. ॥ २९

---

१. निर्गुण ब्रह्म. [यथार्थदीपिका—अ० ४ ओ० २४९-३६२.] २. आत्मतत्व. [यथार्थदीपिका—अ० ५ ओं० ७९-८२.] ३. परंतु. ४. स्थिति, आत्मत्वाचा प्रत्यय, अखंडानंदानुभव. [यथार्थदीपिका—अ० १० ओं० ५६१.] ५. चैतन्याठीं. ६. यथार्थदीपिका—अध्याय ३ ओंव्या ३१८-३२१ पहा. ७. चैतन्याचा धर्म. ८. चैतन्याला. ९. जगदीशउपाधिवृत्ति आणि जीवोपाधिवृत्ति अशा दोन भेदांनीं दर्शित जी उपाधिवृत्ति तिला. १०. चैतन्य आणि सत्व. ११. चैतन्ययुक्त. १२. कैवल्य ब्रह्म आणि सत्व या दोहोंच्या योगानें सगुणस्वरूप ईश्वरोपाधि झाला आहे. १३. चैतन्य आणि सत्व या दोन वस्तु उपाधिवृत्तीस सचेतनता करतात (जागृत—उत्पन्न करतात), तथापि जगदीशउपाधिवृत्ति शुद्ध आहे आणि जीवोपाधिवृत्ति त्रिगुणमिश्रित आहे असें तात्पर्य. १४. ज्ञानानें युक्त. १५. सत्वगुणी. १६. अज्ञानरूपा. १७. जीववृत्तीचा, जीवोपाधिवृत्तीचा. १८. जीवात्मा. या २६ व्या श्लोकाचे पूर्वार्धांत ईशवृत्तीचें आणि उत्तरार्धांत जीववृत्तीचें वर्णन केलें असून त्यांतील भेद दाखविला आहे. १९. अज्ञानामुळें कोणत्याही पदार्थाचें वास्तविक ज्ञान न होतां भलतीच भ्रांति होणें. २०. ज्ञानाचें आच्छादन करणारें आवरण (पडदा). [यथार्थदीपिका—अ० ४ ओंव्या १११४-१४२७; अ० ८ ओं० १२९-१३४; अ० १२ ओं० १०५७-१०७५.] २१. संसारसागरापलीकडे जन्ममरण ज्या वृत्तीस नाहीं अशी. २२. इंद्रियगणें दोन प्रकारचीं आहेत, ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें. ज्ञानेंद्रियें पांच='श्रोत्रं त्वक्चक्षुषी जिव्हा नासिका चैव पंचमी।' कर्मेंद्रियें पांच='पायूपस्थं हस्तपादं वाक्चैव दशमी स्मृता।' २३. पंच विषयांस. रूप रस गंध, स्पर्श आणि शब्द हे पांच विषय आहेत. २४. विक्षेपरूप आणि आवरणरूप. २५. यथार्थदीपिका—अ० १३ ओवी ५२५ व ३३८. २६. ब्रह्मावर भ्रमाचें किंवा मायेचें आच्छादन पडून ब्रह्मापासून सर्व जगताची उत्पत्ति होते. या आच्छादनाला आवरण म्हणतात, आणि या जगताच्या उत्पत्तीला विवर्त असें नांव आहे. २७. यथार्थदीपिका—अ० ३ ओंव्या ५१९-५२५ पहा. यथार्थदीपिका—अ० २ ओं० ९७८ पहा. २८. स्पर्श करतात.

सत्वासि जोंवरि विटाळ रजस्तमाचा [1]नाहींच तोंवरि कुभोग फळागमाचा; ।
प्रारब्धवायु करि चंचळ [2]मीपणासी, हे क्षोभतां मग [3]गुणद्वय त्या [4]गुणासी.॥ ३०
[5]सत्वासि मिश्रित गुणद्वय होति जेव्हां तीहीं गुणीं डळमळी प्रतिबिंब [6]तेव्हां ।
दुःखी सुखी म्हणुनि एकतनू प्रतीती; [7]ते [8]तों न सर्वगत बिंब न शुद्धवृत्ती.॥ ३१
ऐसी न ईश्वरउपाधिस पुण्यपापें [9]जो कां [10]सचेतन [11]अनंतसुख[12]स्वरूपें ।
ज्याला विटाळ न कदापि रजस्तमाचा सूर्यास लेप न जसा [13]रजनीतमाचा.॥ ३२
झालाचि बिंबहि पुन्हा प्रतिबिंबयोगीं होऊनियां रजतमें सुखदुःख भोगी ।
पाण्यांत बिंब [14]निघतां प्रतिबिंब नाहीं [15]बिंबात्मतेंतुनि [16]दिसे प्रतिबिंब [17]तेंही. ॥ ३३
[18]येथें म्हणाल जरि बिंब अनंत जेव्हां बाहेर आंत निघणें [19]रिघणें न तेव्हां ।
हें तों खरें परि अहो! उपमेसि कांहीं सर्वत्र साम्य निज घेउनि येत [20]नाहीं. ॥ ३४
ब्रह्मीं [21]प्रपंच [22]कळशादिविकार जैसे मातीमधें म्हणुनि बोलति वेद ऐसें, ।

---

१. जोंवरि (जोंपर्यंत) सत्वास रजस्तमांचा विटाळ (स्पर्श) नाहींच तोंवरि (तोंपर्यंत) सत्वास फळागमाचा (प्रारब्धफळाचा, कर्मफळाचा) कुभोग (सुखदुःखभोग) नाहीं—असा अन्वय. येथें 'नाहीं' हें क्रियापद दोहींकडे अन्वित केलें पाहिजे. २. अहंकारयुक्त बुद्धीला. ३. रजोगुण व तमोगुण. ४. शुद्ध सत्वाला. ५. यथार्थदीपिका—अ० १५ ओंव्या ४५३-४५५ पहा. ६. तेव्हां दुःखी सुखी म्हणुनि एकतनू प्रतीति—असा अन्वय. जीव आणि शुद्धसत्वात्मक ब्रह्म एकच आहे, परंतु अविद्या, माया आणि गुण यांच्या उपाधिमुळें ते भिन्न असे दिसतात, गुणांच्या उपाधीमुळें त्यांत डळमळितपणा येतो. ७. ती वृत्ति. ते शुद्ध वृत्ति न—असा अन्वय. ८. तोंपर्यंत, त्या काळीं. (श्लोक १० चतुर्थपाद पहा.) ९. ईश्वरोपाधि. १० अनंतसुखस्वरूपें ईश्वरोपाधि सचेतन होतो आणि एकदेशी प्रतिबिंबरूपें जीवोपाधि सचेतन होतो असें येथें सुचविलें. ११ आदि व अंत यांनीं रहित. [यथार्थदीपिका—अ० १५ ओंव्या १९३-२४९.] १२. यथार्थदीपिका—अ० ८ ओं० ५८३ पहा. १३. रात्रीसंबंधी अंधकाराचा. १४. पाण्यांत ज्या वस्तूचें प्रतिबिंब पडतें त्या वस्तूचाच पाण्यांत प्रवेश झाला असतां. १५. योगी आत्मानुभव घेत असतां. १६. योग्याला प्रतिबिंब (जीवात्मा) दिसे—असा अन्वय. [यथार्थदीपिका—अ० १५ ओंव्या ६८६-६८८.] १७. भोगकाळीं उत्पन्न होणारें. १८. बिंबप्रतिबिंब, मृत्तिका आणि घट इत्यादि दृष्टांत सर्वांशीं चैतन्यास योग्य नाहींत, या शंकेवर उत्तर श्लोक ३४-४३ यांत दिलें आहे. १९. आत्म्याचें स्वरूप अनंत असल्यामुळें त्याचें प्रतिबिंब पडलें व तें नाहींसें झालें असा पूर्वपक्ष करणें संभवत नाहीं. आतां कोणीं पूर्वपक्ष केलाच त्यास उत्तर असें कीं बिंबप्रतिबिंब हें बोलणें केवळ दृष्टांतादाखल आहे. उपमेंतील साधारण धर्म समान आहे इतकेंच पहावयाचें आहे. २०. यथार्थदीपिका—अध्याय १८ ओंव्या ५७२-५७८ पहा; अध्याय १८ ओं० १०२६-१०२७ पहा. २१. सृष्टि. २२. घटादिक भांडीं, मृन्मय पात्रें. [यथार्थदीपिका—अ० २ ओं० ६५९.]

चैतन्य जें [1]अचल आणि [2]अनंत त्याला मातीसमानहि कसें वदवेल बोला ?[3]॥३५
मातीच सत्य, कलशादि असत्यरूपीं, माती तथापिहि यथास्थित तत्स्वरूपीं; ।
ब्रह्मीं प्रपंचघडमोडि घडोनियांही [4]ब्रह्मत्वहानि अणुमात्र तथापि नाहीं. ॥ ३६
होऊनिही कलश [5]हानि न [6]मृत्पणाची ब्रह्मत्वहानिहि असी न घडे [7]प्रपंचीं, ।
तें ब्रह्म तों अचळ नित्य अनंत जेव्हां [8]दृष्टांतिंही मग [9]विलक्षणता न तेव्हां. ॥३७
[10]हें क्षुद्र बिंब [11]रिघतें उदकांत जेव्हां पाण्यामधें मग न तत्प्रतिबिंब तेव्हां, ।
दृष्टांत [12]ऐकेपणमात्रनिरूपणीं हा, दृष्टांत याउपरि आणिक एक पाहा. ॥ ३८
जैशा विशाळ [13]दरडी [14]सरितादितीरीं [15]त्यांचें नदींत दिसतें [16]प्रतिबिंब [17]नीरीं; ।
येऊनि पूर दरडीवरि जाय पाणी, तेव्हां न देखति जळीं [18]प्रतिरूप कोणी. ॥३९
[19]तें [20]ओहटोनि जळ ये [21]सरितेंत जेव्हां, भासे पुन्हा दरडिचें प्रतिबिंब तेव्हां; ।
पाणी नदीमधिल बुद्धि तसी शरीरीं [22]जीवात्मता[23]दरडिचें प्रतिबिंब [24]नीरीं. ॥ ४०
सर्वत्रही [25]धरणिबिंब अनंत जैसें मिथ्या शरीर सरितादिकरूप तैसें; ।
मातीच सत्य कलशादि असत्यरूपें, पृथ्वी खरी, नदितटाक [26]मृषास्वरूपें. ॥ ४१
आधार एक धरणी उदकासि जैसी चैतन्य भूमि उदकोपम बुद्धि तैसी; ।
आधार होउनि जळीं प्रतिरूपरूपें पृथ्वी तसी द्विविधें[27] [28]बुद्धिस [29]चित्स्वरूपें. ॥४२
दृष्टांत येरिति तथापिहि [30]ऐकदेशी चैतन्य [31]सर्वगत बुद्धिजळीं [32]प्रकाशी, ।

---

१. स्थिर, अविनाशी. २. सर्वव्यापि, आद्यंतरहित. (श्लो० ३२ टीपा पहा.) ३. यथार्थदीपिका—अ० २ ओंव्या २९८-३१० पहा. ४. कितीही घडामोडी झाल्या तरी ब्रह्मत्वाला उणेपणा येत नाहीं, ब्रह्मत्व जशाच्या तसेंच अढळ राहतें, जसें घट झाला तरी त्यांतून मातीपण गेलें असें होत नाहीं. ५. नाश. ६. मातीच्या स्वरूपाची. ७. सृष्टिरचनेंत. ८. ब्रह्मास मातीचा दृष्टांत देण्यांत. ९. विसंगतपणा, असदृशता. १०. हें उदाहरणार्थ कल्पिलेलें बिंब. ११. शिरतें. १२. बिंबप्रतिबिंब यांचें ऐक्य. १३. कडे. १४. नदी इत्यादि जलाशयांच्या तटांवर. १५. दरडीचें. १६. पडछाया. १७. पाण्यांत. १८. प्रतिबिंब. १९. पुराचें पाणी. २०. उतरून. २१. नदींत. २२. जीवात्मा हेंच प्रतिबिंब. २३. चैतन्यरूप बिंबाचें. २४. बुद्धिरूप उदकांत. २५. पृथ्वीचें बिंब. २६. मिथ्या, असत्य. २७. दोनप्रकारची. (हें बुद्धीचें विशेषण नव्हे) २८. बुद्धीला. २९. चैतन्यस्वरूपें द्विविध होत—एक बुद्धीला आधारभूत आणि दुसरें प्रतिबिंबरूप. [यथार्थदीपिका—अ० २ ओंव्या १५५६-१५५७.] ३०. हें दृष्टांताचें विशेषण. हा दृष्टांत योग्य आहे तथापि त्यांत सर्वथैव सर्वत्र साम्य नाहीं असें सांगण्याचें तात्पर्य. ३१. सर्वव्यापक. [यथार्थदीपिका—अ० १३ ओं० १२१-१२२.] ३२. प्रतिबिंबतें.

बिंबावरी प्रसरते शुभ[1] बुद्धि जेव्हां बिंबैक्य[2] पावत असे प्रतिबिंब[3] तेव्हां. ॥ ४३
देहावलंबन[4] तिला[5] सुखदुःखभोगीं[6] भोगार्थ होय मग[7] हा प्रतिबिंब योगी ।
भोगी तथापि मज भोग असें न मानी बिंबात्मता वळखिली निजराजवानी.॥४४
अज्ञान[8] बाळ निजदेश[9] विदेशीं[10] नेणे देशांतरांत[11] निजदेश सुबुद्धि जाणे; ।
भोगासि होउनि जरी प्रतिबिंब भोगी बिंबात्मतेसि विसरे न तथापि योगी.॥४५
बुद्धीस जोंवरि विवेक[12] असा[13] कळेना तों हें अभोक्तपण केवळ आकळेना; ।
बिंबास भोग न घडे प्रतिबिंब भोगी देखे समाधिसमयांत[14] तदैक्य[15] योगी.॥ ४६
चैतन्य[16] भोगित असे म्हणवे न ऐसें तें भोगणें मज जडास[17] घडेल कैसें ? ।
चिद्ब्रह्म[18] केवळचि भोगितसे म्हणावें[19], तेव्हां[20] चिदैक्य सुखदुःख समान[21] व्हावें.४७

---

१. रज आणि तम यांनी रहित अशी बुद्धि. [यथार्थदीपिका–अ० १८ ओं० ८२४.] २. बिंबरूपी जो ईश्वर त्याचें ऐक्यत्व, आत्म्याशीं ऐक्य. ३. जीवात्मा. ४. देहाचा आश्रय, देहात्मभाव. ५. शुद्ध बुद्धीला. (श्लोक ४३ यांत वर्णिलेल्या शुद्ध बुद्धीला.) ६. सुखदुःखाच्या भोगाच्या वेळी, प्रारब्धभोगाच्या समयीं. ७. प्रारब्धभोगप्रसंगीं, बुद्धीला देहावलंबन होतें त्यासमयीं. ८. यथार्थदीपिका–अ० ३ ओं० ७३७-७४२ पहा. ९. स्वदेश. १०. परदेश. ११. परदेशांत राहत असतां. १२. विचार. १३. श्लोक ४४-४५ यांत दर्शविलेला; बुद्धीस देहावलंबन असतें त्यावेळीं सुखदुःखभोगार्थ योगी प्रतिबिंबरूप होतो आणि प्रतिबिंबरूपानें भोग भोगितो,–तथापि आपण बिंबात्मक असल्यामुळें हे भोग आपणास होत नाहींत असें तो मानितो आणि बिंबात्मकेस विसरत नाही–असा विवेक. १४. यथार्थदीपिका–अध्याय ४ ओंव्या ८६१-८८२; अध्याय १८ ओं० ११२३-११५६ पहा. १५. बिंबप्रतिबिंबांचें ऐक्य, परमात्मा आणि जीवात्मा यांचें ऐक्य. १६. सर्वगत जें चैतन्य तें, बिंबरूप जें तें. १७. शवरूप देहाला. १८. आत्म्यास सुखदुःखादि भोग घडतात असें जर म्हणावें तर एका जीवाला दुःख झालें असतां सर्व जीवांला एकदम दुःख होईल, पण असें होणें असंभव म्हणून बिंबरूप आत्म्यास भोग घडत नाहींत हेंच खरें. सूर्य एक आहे आणि त्याचें प्रतिबिंब अनेक घटांत पडलें आहे. आतां एखाद्या घटांतील पाणी हालल्यामुळें त्या घटांतील प्रतिबिंब हालेल, पण बाकीच्या घटांतील हालणार नाहीं व सूर्यही बदलणार नाहीं. १९. तर मग. २०. जीवेश्वराचें सुखदुःख–असा अन्वय. २१. सर्वांस सारखें–एका जीवाला जें सुखदुःख तें सर्वा जीवाला असें समान. श्लोक ४७-५३ यांचें तात्पर्यः—सर्वव्यापक जें चैतन्य ब्रह्म त्यास सुखदुःखादि भोग घडतात, अशी गोष्ट असती तर एका व्यक्तीस दुःख झालें म्हणजे सर्वांसच दुःखाचा अनुभव घडला असता (श्लो० ४७-४९). परंतु तसा अनुभव घडत नाहीं, यावरून सर्वात्मक शाश्वत असा जो आत्मा त्यास दुःखसुखादि भोग घडत नाहींत असें सिद्ध होतें (श्लो० ५०-५२). आणि हें वर्म ज्यास कळतें त्या ज्ञात्यासही भोग घडत नाहीं (श्लोक ५३).

एकासि जे समयिं दुःखसुखप्रतीती जीवेश्वरांस सकळांसहि भोगें होती; ।
नाना उपाधि तरि वस्त्र जळेल जेव्हां मूर्ती तयावरिल वांचति कैंवि तेव्हां? ४८
नासे व्रणंकरुनि अंगुळिमात्र कांहीं चैतन्य दुःखित तथापिहि सर्वदेहीं; ।
चैतन्य एक असतें तरि एकदेहा होतांचि दुःख करितें जन सर्व हा! हा!॥४९
त्याकारणें वदति वेदें अनेककुंभीं एक प्रभाकर दिसे बहु भिन्न अंभीं; ।
ज्या ज्या घटीं डळमळी जळ सूर्य तेथें हाले; न चंचळ दिसे घट भिन्न जेथें ५०
ऐसींच सत्वउदकीं प्रतिबिंबरूपें तें ब्रह्म कैंवि म्हणवेल निजस्वरूपें? ।
ब्रह्मात्मता कळलियाउपरीच योगी प्रारब्धभोग मग तत्प्रतिबिंब भोगी. ॥ ५१
बिंबास तों न म्हणवे सुख दुःख कांहीं, सर्वात्मताअनुभवीं प्रतिबिंब नाहीं; ।
ज्याला न भोक्तृपण शाश्वत तोचि आत्मा, झाल्यासि भोग न अशा कळतांचि वर्मा.॥
भोगप्रतीतिसमयांत अभोक्तृता हें योगेश्वरासिहि अहो! म्हणणें न साहे; ।
भोगीं नसोनिहि अभोक्तृपणप्रतीती भोगोनि भोगहि तयासि कसे न होती? ॥ ५२

---

१. सुखदुःखाचा प्रत्यय. २. प्रत्यय आला असता. ३. चैतन्य जरी एक तथापि उपाधि भिन्न असल्यामुळें सर्वांस एकाकाळीं सुखदुःखप्रत्यय नसतो असें म्हणावें तर. ४. वांचिल्या जातील, वाचतां येतील. ५. कशा. वस्त्र जळलें म्हणजे त्या वस्त्रावरील काढलेलीं चित्रेंही जळावयाचीं, तीं वस्त्र जळाल्यावर राहावयाचीं नाहींत–असें तात्पर्य. या श्लोकांत 'वांचति' या स्थळीं 'वांचति'=टिकतात–असा पाठही आढळतो. ६. सर्वव्यापि असें जें चैतन्य त्याचे एका भागास दुःख झालें तर बाकीच्या भागास दुःख कां व्हावें, या शंकेला उत्तररूप श्लोक ४९ (पूर्वार्ध) आहे. देहांत एका भागास झालेलें दुःख जर सर्व भागास कळतें, तर सर्वव्यापि चैतन्यासही सर्वत्र सुखदुःख कळावें–असें तात्पर्य. ७. देहांत दुःखप्रतीति ज्या चैतन्यास घडते तें चैतन्य. ८. प्रत्येक देहांत सुखदुःख भोगणारें चैतन्य वेगवेगळें नसतें, सर्वव्यापक जें चैतन्य तेंच सुख दुःख भोगणारें असतें, तर. ९. यास्तव. १०. श्रुति. [यथार्थदीपिका–अ० १५ ओं० ४६७-४६९.] ११. पात्रांत; (पक्षीं) देहांत. १२. सूर्य; (पक्षीं) जडप्रकाशक चैतन्य. १३. अनेक प्रतिबिंबरूपानें वेगवेगळ्या उदकांत. १४. उदकीं; (पक्षीं) बुद्धींत. १५. कुंभीं, पात्रांत. १६. चंचळ होतें, हालतें. १७. उदक. १८. सूर्याचें प्रतिबिंब. १९. त्या डळमळणाऱ्या उदकांत. २०. चंचळ दिसे. २१. दुसरा, अन्य. ज्या घटांतील जळ डळमळत नाहीं तो घट. २२. जीवोपाधि जो त्यांत. २३. जीवरूपानें. २४. जीवस्वरूप. २५. ब्रह्मानें जें 'स्वरूप' तें आणि जीवस्वरूप हीं दोन्ही एकाच असें कसें म्हणवेल? त्यांत भेद आहे–असें तात्पर्य. २६. शाश्वत जें ब्रह्म तोच आत्मा असें. २७. स्वस्वरूपी चैतन्यास. २८. जीवस्वरूप.